उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी



◀◀ मखमलाबाद ग्रीन फील्ड योजना अखेर रद्द ◀◀ नाशिक आज



◀◀ अमरनाथ, काश्मीरची तीस टक्के बुकिंग रद्दची शक्यता ◀◀ नाशिक आज

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २०९ ■ नाशिक, शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

# कल्पनेपलीकडील शिक्षा दहशतवाद्यांना देण्यात येईल

## पंतप्रधान मोदी : आता जमिनीत गाडण्याची वेळ आली

**नवी दिल्ली :**
**पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने आक्रमक भूमिका घेतली असून, पाकिस्तानची सर्व बाजूने कोंडी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठिंबा मिळवण्याचेही प्रयत्न सुरू केले आहेत. परराष्ट्र खात्याने अमेरिका, चीन, रशिया, कॅनडा, इंग्लंडसह विविध देशांच्या राजदूतांशी चर्चा सुरू केली आहे. यावरून भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध हे युद्धाच्या दिशेने जात असल्याची चर्चा आहे.**



दिल्लीच्या साऊथ ब्लॉकमध्ये परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्यांची विविध देशांच्या राजदूतांशी चर्चा सुरू आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताच्या भूमिकेची माहिती या राजदूतांना देण्यात येत आहे. दहशतवाद्यांना त्यांच्या भाषेतच उत्तर दिले जाईल, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानच्या नागरिकांसाठी व्हिसा बंदी केली आहे. तसेच ४८ तासांमध्ये भारत सोडण्याचे आदेशही दिले आहेत. एकीकडे या गोष्टी घडत असतानाच, दुसरीकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. यावेळी अमित शाहांच्या हातामध्ये दोन लाल फाइल्स होत्या. त्यामुळे भारताची वाटचाल ही युद्ध घोषणेच्या दिशेने सुरू आहे का, अशी चर्चाही यावेळी केली जात आहे.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यावर पंतप्रधान मोदींनी पहिल्यांदा जाहीर भाष्य केलं. हा हल्ला करून भारतीय आत्म्यावरच हल्ला करण्याचे दुःसाहस करणाऱ्या दहशतवाद्यांना जोरदार दणका मिळेल, कल्पनाही करता येणार नाही अशी शिक्षा दहशतवाद्यांना देण्यात येईल, असे मोदींनी बिहारच्या मधुबनी येथील सभेत केले. दहशतवाद्यांची उरलीसुरली आश्रयस्थानेही नष्ट करण्याची वेळ आली आहे. पहलगाम येथील हल्ला हा भारतमातेच्या आत्म्यावर झालेला हल्ला आहे. ज्या हल्लेखोरांनी हा हल्ला केला, त्यांना कल्पनेतही येणार नाही अशी शिक्षा देणार, आता त्यांची शिल्लक राहिलेली जमीनही मातीत गाडण्याची वेळ आली आहे, अशा शब्दात मोदींनी पाकिस्तानला थेट इशारा दिला आहे.

दरम्यान, भारताने घेतलेल्या कठोर निर्णयांना प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने दोन्ही देशांमधील सर्व द्विपक्षीय करार स्थगित करण्याची चर्चा केली आहे. यामध्ये १९७२ च्या शिमला कराराचाही समावेश आहे. हे निर्णय गुरुवारी (दि. २४) पाकिस्तानच्या राष्ट्रीय सुरक्षा समितीमध्ये घेण्यात आले. त्याचे अध्यक्षपद पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्याकडे होते. भारताने सिंधू पाणी करार थांबवला तर तो युद्धाचा गुन्हा मानला जाईल. पाकिस्तानच्या सार्वभौमत्वाला आणि सुरक्षेला येणाऱ्या कोणत्याही धोक्याला सर्व प्रदेशात जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल, असे पाकिस्तानने म्हटले आहे. हा करार जागतिक बँकेच्या मध्यस्थीतून केलेला बंधनकारक आंतरराष्ट्रीय करार आहे आणि त्यात एकतर्फी स्थगितीची कोणतीही तरतूद नाही. आंतरराष्ट्रीय अधिवेशने, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे ठराव आणि आंतरराष्ट्रीय दायित्वे दुर्लक्ष करणाऱ्या भारताच्या बेपर्वा आणि बेजबाबदार वर्तनाची दखल घेत, पाकिस्तान भारतासोबतचे सर्व द्विपक्षीय करार स्थगित ठेवण्याचा अधिकार वापरेल, असे पाकिस्तानने म्हटले आहे.

### भारताची समुद्रात क्षेपणास्त्राची चाचणी

भारतातील हालचाली पाहून घाबरलेल्या पाकिस्तानने काही घडण्याआधीच ग्वादर बंदराजवळ क्षेपणास्त्र डागण्याचा सराव सुरू केला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनंतर भारतीय नौदलानेदेखील स्वदेशी आयएनएस विक्रांत समुद्रात तैनात केले आहे. आयएनएस विक्रांतवर मिग-२९ फायटर जेट आणि अटॅक हेलिकॉप्टर सज्ज आहेत. पहलगामच्या घटनेनंतर भारताच्या कारवाईने घाबरलेल्या पाकिस्तानने ग्वादर बंदराजवळ क्षेपणास्त्र डागण्याचा सराव सुरू केल्यानंतर त्याला उत्तर म्हणून भारताने हे पाऊल उचलले आहे. विशेष म्हणजे, नौदलाने स्वदेशी मार्गदर्शित क्षेपणास्त्र विनाशकाची यशस्वी चाचणीदेखील केली आहे.

### अबीर गुलाल सिनेमावर बंदी

पाकिस्तानी सेलिब्रिटींनाही केंद्र सरकारने जोरदार झटका दिला आहे. पाकिस्तानी अभिनेता फव्वाद खान याचा आगामी चित्रपट अबीर गुलाल सिनेमावर भारतात बंदी घातल्याचे माहिती-प्रसारण मंत्रालयातील सूत्रांनी सांगितले आहे. हा सिनेमा येत्या ९ मे रोजी रिलीज केला जाणार होता. या सिनेमात फवाद खानसोबत बॉलिवूड अभिनेत्री वाणी कपूर स्क्रिन शेअर करणार होती.

### पाकिस्तानची व्यापार बंदीची घोषणा

भारताने पाकिस्तानची कोंडी करण्यासाठी पाच मोठे निर्णय जाहीर केल्यानंतर भारताच्या या कृतीला प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न पाकिस्तानने केला आहे. सर्व भारतीय मालकीच्या किंवा भारतीय संचालित विमान कंपन्यांसाठी पाकिस्तानचे हवाई क्षेत्र तत्काळ बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अटारी वाघा बॉर्डर पोस्ट तत्काळ बंद करून भारतासोबत होणारा व्यापारही बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. भारताच्या माध्यमातून इतर कोणत्याही देशासोबत व्यापाऱ्यास बंदी घातली आहे. भारतीय उच्चायुक्तालयातील लष्कर सल्लागारांना भारतात परत जाण्यास सांगितले आहे.

### कराची निर्देशांक २५०० अंकांनी कोसळला

पंतप्रधान मोदी यांच्या या इशाऱ्यानंतर पाकिस्तानच्या भांडवली बाजारात मोठी उलथापालथ झाली. कराची शेअर बाजाराचा निर्देशांक कराची १०० (१००) तब्बल अडीच हजारांनी गडगडला आहे. यामुळे पाकिस्तानी गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताकडून पाकिस्तानवर पाच मोठे निर्बंध लादण्यात आले आहेत. या सगळ्याचे पडसाद पाकिस्तानच्या भांडवली बाजारात उमटले आहेत. भारत-पाकिस्तान यांच्यातील वाढत्या तणावामुळे गुंतवणूकदारांनी हात आखडता घेतला आहे. पाकिस्तानी रुपयाची पडझड, राजकीय अस्थिरता आणि पाकव्याप्त काश्मिरातील असुरक्षितता या सर्वांचा परिणाम गुंतवणूकदारांवर होताना दिसत आहे.

### पाकिस्तानी सोशल अकाउंटवर बंदी

भारताने पाकिस्तानविरुद्ध आणखी कठोर पाऊल उचलत डिजिटल स्ट्राइक सुरू केला आहे. भारत सरकारने पाकिस्तानशी असलेले सर्व राजनैतिक संबंध संपवणे, भारतातील पाकिस्तानच्या फेसबुक आणि यूट्यूब चॅनलवर बंदी घालणे असे निर्णय घ्यायला सुरुवात केली आहे. भारताने पाकिस्तान सरकारच्या सोशल अकाउंटवर बंदी घातली आहे. देशाच्या आयटी मंत्रालयाने एक्स कंपनीला भारतातील पाकिस्तानी सरकारचे खाते ब्लॉक करण्यास सांगितले होते. दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयाबाहेरील पोलीस सुरक्षा काढून टाकण्यात आली आहे. हल्ल्यानंतर दिल्ली पोलिसांनी तीनस्तरीय सुरक्षा व्यवस्था पाकिस्तान आणि उच्चायुक्तालयाबाहेर वाढवली होती.




## महत्त्वाचे ▶▶▶▶

### गौतम गंभीरला जीवे मारण्याची धमकी

**नवी दिल्ली :** भाजपचे माजी खासदार आणि भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना आयसिस काश्मीरकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. त्यांनी दिल्ली पोलिसांकडे तक्रार दाखल करत कुटुंबासाठी सुरक्षेची मागणी केली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर गौतम गंभीरने त्याचा तीव्र शब्दात निषेध केला होता. भारत या कृत्याला प्रत्युत्तर देईल. यासाठी जबाबदार असलेल्यांना त्याची किंमत मोजावी लागेल, असे गंभीर यांनी म्हटले होते. गंभीर कुटुंबासह युरोप दौऱ्यावर गेला होता. पहलगाम हल्ल्याच्या एका दिवसानंतर त्याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे.



### रूपाली ठोंबरे सुखरूप पुण्यात

**पुणे :** काश्मीरमधून सुखरूप पुण्यात परतल्यानंतर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या नेत्या रूपाली ठोंबरे पाटील यांना अश्रू अनावर झाले. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी काश्मीरमधून परत येताच विमानतळावरच रूपाली ठोंबरे पाटील यांची भेट घेतली. परिस्थिती खूप भयानक होती, असे एकच वाक्य रूपाली ठोंबरे म्हणाल्या आणि सुषमा अंधारे यांना बिलगल्या. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार करून भ्याड केला. या घटनेदरम्यान, रूपाली ठोंबरे जम्मू-काश्मीरमध्ये होत्या.

### मुस्लिम बांधवांना ओवैसींचे आवाहन

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर एमआयएम पक्षाचे सर्वेसर्वा तथा खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी देशातील समस्त मुस्लिम बांधवांना शुक्रवारची नमाज पठण करताना या हल्ल्याचा निषेध करावा, असे आवाहन केले आहे. ओवैसी यांनी एक व्हिडिओमध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा कठोर शब्दांत निषेध केला आहे. तसेच आम्ही इस्लामचा सहारा घेऊन कुणालाही खून करण्याची परवानगी देणार नाही, असेही म्हटले आहे. त्यांनी समस्त मुस्लिमांना आवाहन करत उद्या नमाज पठण करताना आपल्या दंडाला काळी पट्टी बांधून जावे. आम्ही तुमच्या या हीन कृत्याचा निषेध करतो, असे आपण त्यांना या माध्यमातून सांगूया, असा संदेश दिला आहे.

### राज्यात उर्दूसुद्धा शिकवली पाहिजे

**बुलढाणा :** हिंदी भाषेला विरोध करून काही पक्ष राजकारण करत आहेत. मात्र, हिंदी ही राष्ट्रीय भाषा आहे. मी तर म्हणेन आतंकवाद्यांचे मेसेज समजण्यासाठी हिंदीच काय तर राज्यात उर्दू भाषासुद्धा शिकवली गेलीच पाहिजे, असे वक्तव्य शिवसेना शिंदे गटाचे बुलढाण्यातील आमदार संजय गायकवाड यांनी केले. राज्यात काही दिवसांपूर्वी शाळेत इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्यात आल्यावरुन चांगलाच वाद निर्माण झाला होता. त्याचा संदर्भ आमदार गायकवाड यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याशी जोडल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे.



त्र्यंबकेश्वर : श्रीसंत निवृत्तिनाथांच्या संजीवन समाधीला उटी लावण्यात आली. त्याप्रसंगी संस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष ॲड. सोमनाथ घोटेकर, पुजारी हभप जयंत महाराज गोसावी, महामंडलेश्वर डॉ. रघुनाथ महाराज फरशीवाले बाबा आदी.

## केंद्र सरकारने संसदेत बोलावली सर्वपक्षीय बैठक

**नवी दिल्ली :**
पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने दिल्लीत संसद भवनात गुरुवारी (दि. २४) सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. या बैठकीत सर्व पक्षांसोबत चर्चा करून केंद्र सरकार मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे. या बैठकीला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह खासदार राहुल गांधी हे देखील उपस्थित होते.




केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हे देखील उपस्थित होते. पण तरीही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा एकही खासदार उपस्थित नसल्याचे समजते. बैठकीत बोलताना केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी या हल्ल्यानंतर सरकारकडून /-...४

### सरकारच्या प्रत्येक कृतीला पाठिंबा : गांधी

आम्ही सरकार सोबत आहेत, या प्रकरणात आम्ही सरकारच्या प्रत्येक कृतीचे समर्थन करू, असे यावेळी बोलताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सांगितले. आम्ही सर्व विरोधी पक्ष सरकारसोबत ठामपणे उभे आहोत, असे टीएमसीचे नेते सुदीप बंद्योपाध्याय यांनी म्हटले आहे.

बागलाणच्या तताणीतील घटना

## लाचेचे ८ हजार टेबलावर ठेवून मुख्याध्यापकाने ठोकली धूम

**नाशिक: प्रतिनिधी**
खात्यावर जमा झालेल्या बिलाच्या मोबदल्यात ८ हजार आणि मार्च महिन्याचे बिल मंजूर करून देण्यासाठी १३०० असे ९३०० रुपयांच्या लाचेची मागणी करून आठ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या तताणी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. विशेष म्हणजे लाचलुचपतचे पथक पाहून मुख्याध्यापकाने शाळेच्या दुसऱ्या गेटने धूम ठोकली.

जितेंद्र खंडेराव सोनवणे, वय ४५, रा. शासकीय /-...४

## जे लोक कधीच विमानात बसले नाहीत त्यांना एकनाथ शिंदेंनी आणले

### पर्यटकांच्या मदतीवरून मस्केंचे बालिश भाष्य

**ठाणे :**
काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना राज्यात परत आणण्यासाठी सरकारने मोहीम सुरू केली आहे. त्यावर शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश मस्के यांनी भाष्य करत जे लोक कधीही विमानात बसले नाहीत, त्यांना एकनाथ शिंदेंनी विमानात बसवून आणले, असे विधान करत टीकेची झोड अंगावर ओढून घेतली आहे.

पहलगाममध्ये राज्यातील अनेक पर्यटक अडकले आहेत. त्यासाठी राज्य सरकारकडून विशेष विमानाची सोय करण्यात आली आहे. त्याचवेळी शिवसेनेची एक टीमही त्या ठिकाणी /-...४

# साहेब, कादर खान यांचा बंगला असूनही घंटागाडी येईना !

## फोनवरून तक्रार; शहानिशा करताच सिडकोत समोर आले दिवंगत अभिनेत्याचे घर

**नाशिक : प्रतिनिधी**
सिडकोतील केवल चौक परिसरातून मनपाच्या घनकचरा विभागात फोन खणखणला, त्यावेळी समोरील व्यक्तीने, साहेब, आमच्या येथे दिवंगत अभिनेते कादर खान यांचा बंगला असूनही येथे घंटागाडी येत नसल्याची तक्रार करत घंटागाडी पाठवण्याची मागणी केली. खरोखरच सिडकोत खान यांचा बंगला आहे का? की, कोणी मुद्दामून खोडसाळपणा केला, याची खातरजमा पालिका कर्मचाऱ्यांनी केली असता, सिडको परिसरात दिवंगत अभिनेते कादर खान यांचा बंगला असल्याचे समोर आले.






त्यामुळे पालिका अधिकारीदेखील काहीसे आश्चर्यचकित झाले.

नाशिक जिल्ह्यात चित्रपटाच्या शूटिंगसाठी अनेक ठिकाणे निसर्गसौंदर्याने नटलेले आहेत. त्याची भुरळ चित्रपट व मालिका निर्मात्यांना पडल्याने अनेकांनी नाशिक परिसरात फार्महाऊस, बंगले खरेदी केली आहेत. नाशिकमधील सिडकोत कादर खान यांचा बंगला असेल हे अनेकांना माहिती नव्हते. घंटागाडी येत नसल्याच्या तक्रारीमुळे ही बाब प्रकाशझोतात आली. कादर खान यांचा बंगला असूनही परिसरात घंटागाडी येत नाही, अशी तक्रार स्थानिक नागरिकाने फोनद्वारे केली. खरंच कादर खान यांचा बंगला येथे आहे का? याची उत्सुकता घनकचरा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही लागली. त्यानुसार त्यांनी याबाबत अधिक माहिती घेतली असता कादर खान यांचा बंगला असल्याचे तपासात समोर आले. त्यानंतर तातडीने येथे घंटागाडी पाठवण्याची व्यवस्था करण्यात आली.

दरम्यान, बॉलिवूडच्या अनेक चित्रपटांचे शूटिंग यापूर्वी देवळाली कॅम्प, गोदाघाट, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, त्र्यंबकेश्वरच्या कसारा घाट या ठिकाणी झाले असून, काही अभिनेते नाशिकच्या प्रेमात पडले. काहींनी जागा, फार्महाऊस, बंगले खरेदी करत गुंतवणूक केल्याचे समजते आहे.

> कादर खान यांचा सिडकोतील केवल पार्क येथे बंगला आहे. मात्र, तरीही येथे घंटागाडी येत नसल्याची तक्रार फोनद्वारे आली. याबाबतची शहानिशा केली असता कादर खान यांचा सिडकोत बंगला असल्याचे समोर आले असून, सदर ठिकाणी घंटागाडी पाठविण्यात आली.
> **-अजित निकत,** संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, मनपा

## सात महिन्यांच्या बाळाचा आईच्या हातातून निसटल्याने मृत्यू

**मुबई :**
सात महिन्यांचं बाळ ज्याने जेमतेम जग बघायला सुरुवात केली होती, त्याचा २१ व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाल्याची भयंकर घटना विरार परिसरात घडली आहे. आईच्या कडेवरून हे बाळ खाली पडले.

घराची खिडकी बंद करत असताना आईचा तोल गेला आणि तिच्या कडेवरील सात महिन्यांचे बाळ एकविसाव्या मजल्यावरून खाली पडले. यात त्या सात महिन्यांच्या बाळाचा मृत्यू झाला. विकी सदाने आणि त्यांची पत्नी पूजा सदाने हे दाम्पत्य विरार येथे बोळींज परिसरातील जॉय विले नावाच्या निवासी संकुलात वास्तव्यास आहे. सदाने दाम्पत्य सात महिन्यांपूर्वी आई-बाबा झाले होते. लग्नाच्या सात वर्षांनी त्यांना हे बाळ झाले होते. त्याचं नाव व्रिशांक ठेवण्यात आले होते.

बाळाला बघण्यासाठी घरात त्यांचे काही नातेवाईक आले होते. पूजा सदाने बाळाला खांद्यावर घेऊन त्या खोलीतील खिडकी बंद करण्यासाठी गेल्या. खिडकीजवळ लादीवर पाणी असल्याने त्यांचा पाय घसरला. पाण्यावर पाय घसरून तोल गेल्यामुळे त्यांच्या कडेवर असलेले त्यांचे सात महिन्यांचे बाळ २१ व्या मजल्यावरून खाली पडले. बुधवारी (दि. २३) दुपारच्या सुमारास ही घटना घडली.

## महत्त्वाचे

### 'माती मागते पेनकिलर' कवितासंग्रहाला पुरस्कार जाहीर

**पिंपळगाव बसवंत : प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील नामवंत कवी संदीप जगताप व शिवव्याख्याते प्रा. जावेद शेख यांच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट कवितासंग्रहासाठीचा लोककवी विठ्ठल वाघ राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार यावर्षी चांदवड येथील कवी सागर जाधव यांच्या 'माती मागते पेनकिलर' या कवितासंग्रहाला जाहीर झाला आहे. कवी लक्ष्मण महाडिक यांच्या निवड समितीने यावर्षी या पुरस्काराची निवड केली. अकरा हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अंतिम फेरीमध्ये मोठी चुरस निर्माण झाली होती. परंतु, नव्या काळाचे खेड्यातील प्रश्न घेऊन, नव्या प्रतिमा असलेली कविता माती मागते पेनकिलर या कवितासंग्रहात बघायला मिळते. तंत्रयंत्रकाळातील कविता या संग्रहात आली आहे. शेतकऱ्यांपुढे उभे राहिले नवे प्रश्न या कवितेने सशक्तपणे मांडले आहे. म्हणून हा कवितासंग्रह या पुरस्कारासाठी पात्र ठरला, असे निवड समितीने सांगितले. मान्यवरांच्या हस्ते लवकरच या पुरस्काराचे वितरण मॅग्नस फार्म येथे होणार आहे. सागर जाधव यांना महाराष्ट्रातील अतिशय सन्मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल साहित्य क्षेत्रातले अनेक मान्यवर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



### संभाजी ब्रिगेडतर्फे हल्ल्याचा निषेध

**मनमाड :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथील घटनेचा संभाजी ब्रिगेड व फुले-शाहू-आंबेडकर मुस्लिम विचारमंचतर्फे निषेध करण्यात आला. या घटनेचा तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदन देऊन करण्यात आली. निवेदनावर संभाजी ब्रिगेड जिल्हा समन्वयक फिरोज शेख, फुले-शाहू-मुस्लिम विचारमंच अध्यक्ष मिर्झा अहमद बेग हाजी शफी बाबूजी, हाजी रफिक बाबूजी, जावेद शेख, अप्पा सांगळे, इस्माईल पठाण, सद्दाम अत्तार, मोईज अत्तार, आकाश जाधव, बब्बूभाई बेग यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

### जिजामाता शाळेचे मंथन परीक्षेत यश

**लासलगाव :** येथील जिजामाता प्राथमिक शाळेतील इयत्ता तिसरी व चौथीतील १०० विद्यार्थी मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षेत प्रविष्ट झाले होते. इयत्ता तिसरीमधून ज्ञानदा गिते हिने राज्य गुणवत्ता यादीत ३० वा, जिल्हास्तरावर २१ वा तर केंद्रात प्रथम क्रमांकाचा मान पटकावला. इयत्ता तिसरीमधून साहिल पाबळकर हा राज्य गुणवत्ता यादीत ३१ वा, जिल्हास्तरावर २२ वा तर केंद्रात द्वितीय क्रमांकाचा मान पटकवला. इयत्ता चौथीमधून जयेन काद्री याने राज्य गुणवत्ता यादीत ४८ वा, जिल्हास्तरावर ४२ वा तर केंद्रात प्रथम क्रमांकाचा मान पटकावला. इयत्ता चौथीमधून श्रावणी आवारे हिने राज्य गुणवत्ता यादीत ४९ वा, जिल्हास्तरावर ४२ वा तर केंद्रात द्वितीय क्रमांकाचा मान पटकावला. वरील विद्यार्थ्यांना उपशिक्षक अनिस काजी, समीर देवडे, राजाराम जाधव, केदूबाई गवळी यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब पाटील, सचिव संजय पाटील, उपाध्यक्ष निवृत्ती गायकर, संचालिका नीता पाटील, संचालक शंतनू पाटील, अभय पाटील, सीताराम जगताप, संचालिका पुष्पा देरेकर, संचालक लक्ष्मण मापारी, कैलास ठोंबरे, शाळेचे मुख्याध्यापक मोहन निकम यांनी सर्व मार्गदर्शक शिक्षक व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### वरखेड्यात हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**दिंडोरी :** वरखेडा (ता. दिंडोरी) येथे हनुमान मंदिर जीर्णोद्धार व नूतन मूर्ती प्राणप्रतिष्ठानिमित्ताने हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दि. ३० रोजी अक्षयतृतीयेला कलशारोहण होणार असून, दि. २८ रोजी प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. सप्ताहांतर्गत श्रावण महाराज आहिरे (कुकाणेकर), एकनाथ महाराज (चत्तर), विश्वनाथ महाराज वारिंगे (मुंबई), बाळू महाराज गिरगावकर (बीड), शिवा महाराज बावस्कर (बुलढाणा), श्रावण महाराज जगताप (येवला), पांडुरंग महाराज गिरी (वावीकर) यांची कीर्तने होणार आहे. सोमवारी (दि. ५) प्रभाकर नाना झोलकर यांचे सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविकांनी या हरीकीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन भजनी मंडळ, स्वाध्याय परिवार, जय बाबाजी भक्त परिवार, गणेश मित्रमंडळ व ग्रामस्थांनी केले.



### के. के. वाघ विद्याभवनात इंग्लिश लँग्वेज डे

**कसबे-सुकेणे :** के. के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज, भाऊसाहेबनगर येथे २३ एप्रिल हा इंग्लिश लँग्वेज डे म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शाळेचे मुख्याध्यापक यशवंत ढगे यांची इंग्लिश क्लबच्या मार्फत संदीप खिस्ते, नीलेश पाटील आणि माया पवार यांनी इंग्रजीमध्ये मुलाखत घेतली. डॉ. कांचन बागूल यांनी सूत्रसंचालन केले तर गायत्री वाघमारे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापक दिवाकर शेजवळ, पर्यवेक्षिका सुनीता वडघुले, ज्येष्ठ शिक्षक गांगुर्डे, मनोज तुसे, चंद्रकांत गंगावणे, राजेंद्र उगले, बाजीराव वाघ, धनगर उपस्थित होते.



### उपसरपंच नलिनी निरभवणे यांचा सत्कार

**लासलगाव :** उगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंच रूपाली पानगव्हाणे यांनी रोटेशन पद्धतीने राजीनामा दिल्यानंतर उपसरपंचपदी नलिनी निरभवणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उगाव येथील केजीएन ग्रुपचे अध्यक्ष नौशाद सय्यद यांच्या हस्ते त्यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक पाटील, भास्कर पानगव्हाणे, जामा मशीदचे अध्यक्ष हाजी शरीफभाई, विश्वस्त अब्दुलभाई शेख, इमरान सय्यद, बालमभाई तांबोळी, पंढरीनाथ सोनवणे, महेश परदेशी, संतोष साबळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# पीककर्ज वाटपात चांदवड तालुक्यावर अन्याय

## जिल्ह्यात पीककर्ज वसुलीत तालुका अव्वल असतानाही दुजाभाव

**चांदवड : वार्ताहर**



जिल्ह्यात पीककर्ज वसुलीत अव्वल असूनही जिल्हा बँकेकडून चांदवड तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्जवाटपात अन्याय होत असल्याचा आरोप होत आहे. पावसाळा तोंडावर असताना भांडवलासाठी शेतकऱ्यांना कर्ज मिळत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी (दि. २४) सकाळी चांदवड येथील जिल्हा बँकेच्या मुख्य शाखेसमोर आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.

जिल्हा बँकेने नियमित कर्जदार सभासदांना पीककर्ज वाटपात जाचक अटी घातल्या आहेत. ज्या येथील सभासद आणि सोसायटी पदाधिकाऱ्यांना मान्य नाहीत. विशेष म्हणजे, इतर तालुक्यांमध्ये याच अटी शिथिल करून कर्ज वाटप सुरू आहे. त्यामुळे चांदवड तालुक्यावर जाणीवपूर्वक अन्याय होत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. यासंदर्भात चार दिवसांपूर्वी वडाळीभोई आणि धोडांबे परिसरातील सोसायटी पदाधिकाऱ्यांनी जिल्हा बँकेला निवेदन दिले होते. त्यानंतर सोमवारी (दि. २१) धोडंबे येथे कर्ज विभागाचे व्यवस्थापक, वरिष्ठ मुख्याधिकारी आणि चांदवड विभागीय अधिकाऱ्यांसोबत बैठक झाली. मात्र, या बैठकीनंतर तीन दिवस उलटूनही बँकेकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. यामुळे तालुक्यातील कर्जधारक आणि संचालक मंडळ अधिक संतप्त झाले आहे.

चांदवड वगळता इतर काही तालुक्यांमध्ये वजनदार नेते आणि मंत्री असल्याने तेथे मोठी थकबाकी आणि कमी वसुली असूनही कर्ज वाटप होत असल्याचा आरोप होत आहे. याउलट, चांदवड तालुक्याची रोख वसुली राज्यात प्रथम क्रमांकाची आहे आणि थकबाकीचे प्रमाणही कमी आहे. असे असतानाही कर्जवाटपात दुजाभाव का केला जात आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दुष्काळी परिस्थितीतही संचालक मंडळ आणि सचिवांनी शेतकऱ्यांना कर्ज भरण्यास प्रवृत्त केले आणि लोकांनी उधारी करून कर्जाची परतफेड केली. आता त्यांना तातडीने कर्ज मिळणे अपेक्षित असताना, बँकेच्या भूमिकेमुळे शेतकरी भविष्यात कर्ज भरण्यास कचरतील, अशी चिंता व्यक्त होत आहे. सन २०२४-२५ च्या हंगामात चांदवड तालुक्यात केवळ २७ कोटी ३२ लाख रुपयांचे कर्ज वाटप झाले आहे. तालुक्यातील ३३ विकास सोसायट्यांची १०० टक्के वसुली आहे. तालुक्यातील सर्व संस्थांचे भागभांडवल एकत्रित केल्यास, जवळपास ४५ कोटी रुपये जिल्हा बँकेकडे जमा आहेत. असे असताना, केवळ २० ते २५ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले जात आहे. याचा अर्थ, जमा ठेवींच्या ५० टक्क्यांपेक्षाही कमी कर्ज वाटप होत आहे. जनतेच्याच ठेवी घ्यायच्या आणि त्यांना गरजेच्या वेळी पुरेसे कर्जही द्यायचे नाही, यामुळे या ठेवींचा तालुक्यातील जनतेला काय फायदा, असा प्रश्न विचारला जात आहे.

**व्याजाच्या परताव्याची माहिती गुलदस्त्यात**

शेतकऱ्यांनी वेळेत पीककर्ज भरल्यास केंद्र आणि राज्य शासनाकडून प्रत्येकी तीन टक्के, असा एकूण सहा टक्के व्याज परतावा मिळतो. मात्र, मागील दोन वर्षांपासून या परताव्याची माहिती सोसायट्यांना मिळत नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना व्याज परतावा मिळाला की नाही, हे समजू शकत नाही.

| चांदवड तालुक्यातील संस्थांची एकत्रित आर्थिक स्थिती (जिल्हा बँकेकडे असलेली रक्कम) | |
|---|---|
| चालू खाते | ६ कोटी ८५ लाख रुपये |
| बचत खाते | ३ कोटी ४४ लाख रुपये |
| बँक शेअर्स | १२ कोटी ३९ लाख रुपये |
| राखीव निधी | ९ कोटी ४७ लाख रुपये |
| मुदत ठेवी | १२ कोटी ५७ लाख रुपये |
| एकूण रक्कम | ४४ कोटी ७४ लाख रुपये |

धोडंबे चांदवडचे सभापती नितीन उशीर म्हणाले, जिल्ह्यात चांदवड तालुक्याची वसुली एक नंबर आहे आणि तीही रोख स्वरूपात. असे असताना जिल्हा बँक पीककर्ज वाटपात अडथळे का आणत आहे? गेल्या चार दिवसांपासून बँकेशी पत्रव्यवहार सुरू आहे, पण प्रतिसाद मिळत नसल्याने आज चांदवड शाखेत जाब विचारणार आहोत.

# निफाड तालुक्यातील ६० ग्रामपंचायतींत महिला आरक्षण

## चांदोरी, लासलगाव, सायखेडा, उगाव, कसबे-सुकेणे, म्हाळसाकोरे, कोठुरे, साकोरे, पिंपळस, रानवड या गावांचा समावेश

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

तालुक्यातील ३२ ग्रामपंचायतींच्या निवडणुका या आरक्षणानुसार झालेल्या नाहीत. त्यामुळे ते आरक्षण कायम ठेवून उर्वरित ग्रामपंचायतींचे आरक्षण २१ एप्रिल रोजी काढण्यात आले आहे.

ग्रामपंचायतींचे सरपंचपदाचे आरक्षण निश्चित झाले असून, (३२ ग्रामपंचायतींचे आरक्षण कायम ठेवून) तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली महिलांसाठीचे सरपंच आरक्षण सोडत गुरुवारी (दि.२३) मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे झाली. तालुक्यातील ६० ग्रामपंचायतींचे सरपंचपद आरक्षित झाले असून, ६० गावांतील विकासाची चावी महिलांच्या हातात देण्यात येणार आहे. त्यात लासलगाव, उगाव, म्हाळसाकोरे, सायखेडा, कोठुरे, साकोरे, पिंपळस, रानवड, चांदोरी या मोठ्या ग्रामपंचायतींचा समावेश आहेत.

**जानेवारी २०२५ मध्ये काढण्यात आलेले आरक्षण कायम ठेवण्यात आलेले महिला सरपंच आरक्षण पुढीलप्रमाणे :** कानळद -अनु. जमाती स्त्री, कुंभारी- अनु. जमाती स्त्री, पंचकेश्वर- अनु.जमाती स्त्री, पाचारे खु.- अनु. जमाती स्त्री, कुंदेवाडी- नामाप्र स्त्री, सारोळेथडी- नामाप्र स्त्री, तामसवाडी -नामाप्र स्त्री, शिंपीटाकळी-सर्वसाधारण स्त्री, नारायणटेंभी -सर्वसाधारण स्त्री, सारोळे खुर्द- सर्वसाधारण स्त्री, वेळापूर- सर्वसाधारण स्त्री, कुरुडगाव- सर्वसाधारण स्त्री, हनुमाननगर-सर्वसाधारण स्त्री, थेरगाव- सर्वसाधारण स्त्री, गोरठाण- सर्वसाधारण स्त्री, दिंडोरी तास-सर्वसाधारण स्त्री.

**अनुसूचित जाती महिला सरपंचपदाच्या ग्रामपंचायतींची नावे :** कसबे-सुकेणे (सोडतीने), दिक्षी (सोडतीने), नांदगाव (सोडतीने), ओणे (सोडतीने).

**अनुसूचित जमाती महिला सरपंचपदाच्या ग्रामपंचायतींची नावे :** दावचवाडी (सोडतीने), धारणगाव वीर (सोडतीने), गोंदेगाव (सोडतीने), खेडे (सोडतीने).

**नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला सरपंचपदाच्या १३ ग्रामपंचायतींची नावे :** चांदोरी (नागापूर), थेटाळे (सोडतीने), खानगावथडी, भरवस (मानोरी खु.), रानवड (सोडतीने), चापडगाव, साकोरे (सोडतीने), पिंपळस (सोडतीने), शिरवाडे वणी, कोकणगाव (सोडतीने), भुसे, अंतरवेली (सोडतीने), बोकडदरे.

**सर्वसाधारण प्रवर्ग महिला सरपंचपदाची गावे :** शिरसगाव, पिंपळगाव नजीक, लासलगाव, महाजनपूर, उगाव, वाहेगाव / दहेगाव, गाजरवाडी, दारणासांगवी, पिंपळगाव निपाणी (सावळी), रौळस, बेहेड, रसलपूर, रामनगर, म्हाळसाकोरे, सायखेडा, करंजी खु./ब्राह्मणवाडे, शिरवाडे वाकद, मुखेड, नांदुर्डी (सोडतीने), तारुखेडले (सोडतीने), मांजरगाव (सोडतीने), कोटमगाव (सोडतीने), कोठुरे (सोडतीने).



# सुरगाणा तालुक्यातील ३१ ग्रामपंचायती अनुसूचित महिलावर्गासाठी राखीव

**सुरगाणा : प्रतिनिधी**

पंचायत समिती सुरगाणा येथे तालुक्यातील ६१ ग्रामपंचायतींमधील सरपंचपदासाठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. यामध्ये ३१ ग्रामपंचायत अनुसूचित महिला राखीव झाल्या असून, उर्वरित ३० ग्रामपंचायतींमध्ये सरपंचपदासाठी अनुसूचित जमाती सर्वसाधारण आरक्षित झाल्याने महिला व पुरुष दोघांना संधी मिळणार आहे.

एक ग्रामपंचायतीसाठी तिसरीच्या वर्गातील विद्यार्थी पार्थ सागर सोनवणे याच्या हस्ते चिठ्ठी सोडत काढण्यात आली. यामध्ये पळसन ग्रामपंचायत अनुसूचित जमातीमध्ये महिला राखीव झाली आहे. यावेळी उपजिल्हाधिकारी नरेश अनुकूरी व निवासी नायब तहसीलदार मोहन कुलकर्णी उपस्थित होते.

अनुसूचित जमाती खुले आरक्षण : बाऱ्हे, भवाडा, भवानदगड, भोरमाळ, बिवळ, चिंचपाडा, घोडांबे, गोंदुणे, हरणटेकडी, हट्टी, जाहुले, काठीपाडा, कोठुळा, लाडगाव, मांगधे, म्हैसखडक, माळेगाव, माणी, मनखेड, मोहपाडा, नागशेवडी, पोहाळी, प्रतापगड, रगतविहीर, राहुडे, रोकडपाडा, रोगाने, ठाणगाव, वाघधोंड, वरंभे.

अनुसूचित जमाती राखीवमध्ये अलगुण, आंबाठा, आंबोडे, बेडसे, भदर, बोरगाव, बुबळी, चिकाडी, डोल्हारे, हस्ते, हतगड, हातरुंडी, हेमाडापाडा, कळमणे, करंजूल (सु.), खिर्डी, खोबळा, खुंटविहीर, खोकरी, कुकुडणे, कुकुडमुंडा,मांधा, मालगव्हाण, राशा, साजोळे, सराड, शिंदेदिगर, उंबरठाण, डांगराळे, पळसन.

# दिंडोरी तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत

**दिंडोरी : प्रतिनिधी**

दिंडोरी तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींसाठी आरक्षण प्रक्रिया पार पडली. यामध्ये सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग (ना.मा.प्र.) यांच्यासाठी आरक्षण निश्चित करण्यात आल्याची माहिती प्रांताधिकारी आप्पासाहेब शिंदे, तहसीलदार मुकेश कांबळे यांनी दिली आहे.

दिंडोरी तहसील कार्यालय येथे खालीलप्रमाणे सरपंचपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. त्यानुसार तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींमध्ये खालीलप्रमाणे आरक्षण काढण्यात आले आहे.

लोखंडेवाडी- ना. मा. प्रवर्ग, वलखेड सर्वसाधारण, मातेरेवाडी- ना. मा. प्रवर्ग, पाडे - सर्वसाधारण, जऊळके वणी - अनुसूचित जाती, आंबेवणी - सर्वसाधारण, शिंदवड - सर्वसाधारण, परमोरी -सर्वसाधारण, तळेगाव वणी- सर्वसाधारण, सोनजांब- सर्वसाधारण, म्हेळुस्के- सर्वसाधारण, बोपेगाव - ना. मा. प्रवर्ग, अवनखेड - सर्वसाधारण ओझरखेड - ना. मा. प्रवर्ग स्त्री तिसगाव - ना. मा. प्रवर्ग, खेडगाव -अनुसूचित जमाती लखमापूर- अनुसूचित जमाती.

# मंथन परीक्षेत मविप्र होरायझन शाळेच्या विद्यार्थ्यांचे यश

**येवला : प्रतिनिधी**

राज्यस्तरीय मंथन जनरल नॉलेज २०२५ परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, या निकालात येवला येथील होरायझन स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

शिवतेज शिंदे याचा राज्य पातळीवर चौथा क्रमांक तर गार्गी लोखंडे ही राज्य पातळीवर नववा रँकने उत्तीर्ण झाली तसेच कार्तिकी घुले, अद्वय भावसार, शिवम बडदे, सिया लोणारी, अभिनंदन गायके, आर्यन पिंपळे, सोजस मोरे, अद्विका जोंधळे, मृणालिनी काळे, अपूर्व काकडे, अभिज्ञा काळे, विराज गुंजाळ, शिवप्रिया शिंदे, आदी विद्यार्थ्यांनी या परीक्षेत नेत्रदीपक अशी कामगिरी करून यश संपादन केले आहे. याबद्दल संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, नंदकुमार बनकर, डॉ. कैलास शिंदे, मुख्याध्यापिका सुनीता हिंगडे आदीनी अभिनंदन केले.

# नांदगाव शिवसेनेतर्फे हल्ल्याचा जाहीर निषेध

**नांदगाव : वार्ताहर**



पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा नांदगाव शिवसेनेतर्फे जाहीर निषेध करण्यात आला. याविरोधात सरकारने कठोर कारवाई करावी, अशा आशयाचे निवेदन नांदगाव पोलिस ठाणे अंमलदार गोसावी यांच्याकडे देण्यात आले. हुतात्मा चौक येथून घोषणा देत पोलिस स्टेशनपर्यंत निषेध रॅली काढण्यात आली. सरकारने कठोर पाऊल उचलावी, असे मत सुनील जाधव यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी विष्णू निकम, माजी नगराध्यक्ष अरुण पाटील, युवासेना तालुकाप्रमुख सागर हिरे, शहरप्रमुख सुनील जाधव, दीपक मोरे, अय्याज शेख, रमेश काकळीज, भैयासाहेब पगार, संतोष शर्मा, मधुकर मोरे, संजय सानप, शरद उगले, मुस्ताक शेख, बापू जाधव, भिकन खटके, सुनील सर, शरद आयनोर, तानसेन जगताप, भगीरथ जेजुरकर, भारती बागोरे, सद्दाम शेख, महेंद्र गायकवाड, दिनेश ओचानी, जय खरोटे, सूरज पाटील आदींसह शिवसैनिक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षकांसाठी गणवेशाचा निर्णय झाल्यास ग्रामीण भागातून स्वागतच...!

## निर्णय घेताना शिक्षक संघटनांना विश्वासात घेण्याची रास्त मागणी

**निफाड : अण्णासाहेब बोरगुडे**



भारत हा देश संस्कृती प्रधान आहे. या देशातील व राज्यातील प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या डॉक्टर आणि वकील व विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयांतील सेवकांसाठी जसा विशिष्ट गणवेश असतो, तसाच गणवेश शिक्षकांसाठीही असायला हवा, असे मत व्यक्त करून शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शिक्षकांसाठीही गणवेशाचे संकेत दिले आहे. शिक्षकांनी शाळेच्या स्तरावरच आपसात ठरवून एक गणवेश निश्चित करावा, असेही भुसे यांनी सूचित केले आहे. पालकांनी गणवेशासंदर्भातील निर्णय योग्य राहील, अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहे.

मागील महायुती सरकारमधील शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी घेतलेला 'एक राज्य, एक गणवेश' हा निर्णय बासनात गुंडाळणाऱ्या दादा भुसे यांनी मालेगावमध्ये एका कार्यक्रमात शिक्षकांच्या गणवेशाबाबत भाष्य केले. या कार्यक्रमासाठी आलेल्या संबंधित जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिकांनी एकसारखीच साडी नेसली होती. त्यांची ती वस्त्रांमधील एकवाक्यता आपल्याला प्रचंड भावली असून, राज्यभरातील शिक्षक बांधवांनी त्यातून प्रेरणा घ्यायची गरज असल्याचे आपल्याला जाणवले, असे मत शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी व्यक्त केले होते. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी यांनी कोणते कपडे घालावेत, याबाबतची वस्त्रसंहिता याआधीच लागू केली आहे. त्यामुळे आताचा मुद्दा शिक्षकांच्या गणवेशाचा आहे. शिक्षकांसाठी राज्यस्तरावर एकच एक गणवेश निश्चित केला जाणार नाही. त्याऐवजी प्रत्येक शाळेतील शिक्षकांनी एकत्र येऊन त्यांना कोणता एकसमान गणवेश योग्य वाटतो, याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य शाळेला असेल; पण त्या शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर येताना एकसमान असल्याचे जाणवले पाहिजे. ज्याप्रमाणे डॉक्टर, वकील यांना समाजात त्यांच्या गणवेशावरून लोक ओळखतात आणि मान देतात, तसाच मान शिक्षकांना त्यांच्या शाळेच्या गावात गणवेशामुळे मिळावा, अशी अपेक्षाही दादा भुसे यांनी व्यक्त केली आहे. याबाबत ग्रामीण भागात संमिश्र प्रतिक्रिया उमटत असून, होणाऱ्या निर्णयाचे स्वागतच राहील, असे पालक व शिक्षकांनी सांगितले आहे.

> शिक्षकांसाठी वस्त्रसंहिता आहे. त्याचे भान बाळगूनच शिक्षक पोशाख करतात. त्यात आता महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या गणवेशासंदर्भातील निर्णय स्वागतार्ह राहील. मात्र, गणवेशासंदर्भातील अंतिम निर्णय घेताना राज्यातील शिक्षक संघटनांना विश्वासात घ्यायला पाहिजे.
>
> **-प्रकाश आहिरे,** जिल्हाध्यक्ष, प्राथमिक शिक्षक समिती

> जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षकांसाठी योग्य अशा गणवेशाचा निर्णय होत असेल तर तो निर्णय स्वागतार्ह राहील. अशा निर्णयाने विद्यार्थ्यांचे पालक समाधानी असतील. योग्य पोशाखात / गणवेशात भारतीय संस्कृतीचे दर्शन होते. शिक्षकांना शिस्त म्हटल्यावर तीच विद्यार्थ्यांना राहणारच! शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी गणवेशाचा निर्णय घेतल्यास ग्रामीण भागातून स्वागत राहील.
>
> **-दत्तात्रेय भवर,** अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, नैताळे, ता. निफाड

## महत्त्वाचे



### जि.प.च्या नवीन इमारतीच्या कामाची मित्तल यांच्याकडून पाहणी

**नाशिक :** जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीची मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी पाहणी केली. नवीन प्रशासकीय इमारतीचे पाच मजल्यांचे आरसीसी बांधकाम पूर्ण झाले असून, सहाव्या मजल्याचे आरसीसी बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे. प्रारंभीच्या तीन मजल्यांवरील फर्निचरचे कामदेखील सुरू असून, त्या कामाचीही पाहणी मित्तल यांनी केली. इमारतीतील आतील प्रांगणामधील फरशीचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच प्रारंभीच्या चार मजल्यांमध्ये लिफ्ट बसविण्याचे कामदेखील गतीने करून लवकरात लवकर पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी संबंधित बांधकाम ठेकेदारास दिले. यावेळी आशिमा मित्तल यांनी सांडपाणी व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या कामांकडेही लक्ष सूचना केल्या असून, पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने इमारतीत योग्य सांडपाणी व्यवस्थापन यंत्रणा बसविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगून हे काम त्वरित पूर्ण करण्याचे आदेश दिले. या पाहणीदरम्यान इमारत व दळणवळण विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता संदीप सोनवणे, वास्तुविशारद तसेच संबंधित बांधकाम ठेकेदार उपस्थित होते.




### केटीएचएम महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शन

**नाशिक :** पुस्तकांचे वाचन केल्यामुळे आपला शब्दसंग्रह वाढतो, भाषा आणि संवाद कौशल्य सुधारतात. पुस्तक वाचनामुळे आपल्याला एकाग्र होण्यास मदत होते. त्यामुळे तणाव कमी होतो व आपल्या ज्ञानातही वाढ होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांनी केले. जागतिक पुस्तक दिनानिमित्त केटीएचएम महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे आयोजित पुस्तक प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सहाय्यक ग्रंथपाल स्मिता पिंगळे, एस. पी. पवार, दीपाली निरगुडे, प्रा. स्मिता घोरपडे, प्रा. कीर्ती देवरे उपस्थित होते. जागतिक पुस्तक दिवस ज्याला कॉपीराइट दिवस किंवा आंतरराष्ट्रीय पुस्तक दिवस म्हणूनही ओळखले जाते. हा वाचन, प्रकाशन आणि कॉपीराइटला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्र शैक्षणिक वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनांद्वारे आयोजित केलेला वार्षिक कार्यक्रम आहे. पहिला जागतिक पुस्तक दिन २३ एप्रिल १९९५ रोजी साजरा करण्यात आला. २०२३ मध्ये घानाची राजधानी अकराळाला जागतिक पुस्तक राजधानी म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यामुळे दरवर्षी २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन भारतातही साजरा केला जातो, असे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांनी अखेरीस सांगितले. यावेळी महाविद्यालयाच्या आवारात भरविण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शनाचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

# जिल्ह्यात पाच हजारांहून अधिक शाळांचे जिओ टॅगिंग

## पेठ तालुक्याची बाजी, मालेगावची सुमार कामगिरी

**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्ह्यात शाळा टॅगिंग अहवाल जाहीर करण्यात आला असून, त्यात पेठ तालुका अव्वल तर मालेगावची कामगिरी सर्वांत सुमार असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे.**

जिल्ह्यातील शाळा टॅगिंग अहवाल नुकताच जाहीर झाला असून, त्यानुसार पेठ तालुक्याने ८४.५३ टक्के टॅगिंग करून संपूर्ण जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकावला आहे. शाळा टॅगिंग हा शैक्षणिक व्यवस्थापनाचा एक महत्त्वाचा भाग असून, यामध्ये शाळांची संख्यात्मक व स्थानिक नोंदणी, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक सुविधा इत्यादी गोष्टींचे बारकाईने निरीक्षण केले जाते.

जिल्ह्यात एकूण ६८५८ शाळा असून, त्यापैकी ५५८६ शाळांचे टॅगिंग पूर्ण झाले आहे. ८१.४४ टक्के शाळांचे टॅगिंग पूर्ण झाले आहे. १७७२ शाळा अद्याप टॅगिंगपासून वंचित आहेत.

मालेगाव महापालिकेतील शाळा मॅपिंग सर्वांत कमी असून, फक्त ३३.०९ टक्के शाळांचे मॅपिंग झाले आहे.



**तालुकानिहाय शाळा मॅपिंग स्थिती**

पेठ- २३५ पैकी १९८, चांदवड : २७८ पैकी २२७
नाशिक URC-१ २९१ पैकी २३१ शाळा
नाशिक URC-२ - २६१ पैकी २००
बागलाण -३३७ पैकी २४९
**कमी कामगिरी करणारे तालुके :**
इगतपुरी - ३३६ पैकी १७०. नाशिक URC-२ - २६१ पैकी १३७
नांदगाव - ३४१ पैकी १८९. मालेगाव मनपा - ३८१ पैकी फक्त १२६

ग्रामीण भागातील काही तालुक्यांनी शहरांच्या तुलनेत चांगली कामगिरी बजावली आहे. यामध्ये पेठ, चांदवड आणि बागलाण यांचा समावेश आहे.

अजूनही १७५५ शाळा मॅपिंगपासून वंचित असून, यावर तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शाळा मॅपिंग प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी शिक्षण विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शाळा व्यवस्थापन समित्यांमध्ये समन्वय वाढवणे गरजेचे आहे. डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करून प्रक्रिया सुलभ केली जाऊ शकते.

कमी टक्केवारी असलेल्या तालुक्यांमध्ये विशेष मोहीम हाती घेण्याची गरज आहे.

सर्व माध्यमांच्या शाळा आणि अंगणवाडी केंद्राचे छायाचित्रासह जिओ टॅगिंग करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. या माहितीचा उपयोग विविध योजनांची आखणी व अंमलबजावणीसाठी होणार आहे.

राज्यभरातील सर्व शाळांबाबतची माहिती केंद्र शासनाच्या युडायस या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. एमआरएसएसीकडे उपलब्ध विविध विभागांची माहितीह व युडायस संकेतस्थळावरील शालेय शिक्षण विभागाची माहिती यांचे एकत्रीकरण करून स्वतंत्र डॅशबोर्डवर उपलब्ध करून दिली जाणार आहे. यामध्ये विविध विभागामार्फत कार्यरत सर्व शाळांची माहिती संकलित केली जाणार आहे. शिक्षण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेच्या अंमलबजावणीसाठी या माहितीचा उपयोग होणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.



समीर रकटे
सेक्रटरी



हेमंत देशपांडे
खजिनदार



योगेश मुन्ना
जॉइंट सेक्रेटरी १



चंद्रशेखर दंदणे
जॉइंट सेक्रेटरी २



सतीश गायकवाड
निवड समिती सदस्य



फैयाज गंजी फ्रॉकवाला
निवड समिती सदस्य



तरुण गुप्ता
निवड समिती सदस्य

# समीर रकटे, हेमंत देशपांडे, हिरे, दंदणे बिनविरोध

## नाशिक जिल्हा क्रिकेट संघटना निवडणूक

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीत चार पदाधिकारी व तीन निवड समितीचे सदस्य बिनविरोध निवडून आले.

सेक्रेटरीपदी समीर रकटे, खजिनदारपदी हेमंत देशपांडे जॉइंट सेक्रेटरीपदी योगेश हिरे,चंद्रशेखर दंदणे तर निवड समिती सदस्यपदी सतीश गायकवाड, तरुण गुप्ता,फैय्याज गंजी फ्रॉकवाला यांची निवड झाली. चेअरमन पदासाठी दोन व कार्यकारिणी सदस्याच्या १० पदांसाठी, १३ अर्ज राहिल्याने दिनांक ३ मे रोजी अन्नपूर्णा सभागृह, नंदनवन लॉन्स, मते नर्सरी रोड, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे सकाळी ८.३० ते ५.०० वा. पर्यंत मतदान होईल.

चेअरमनपदासाठी धनपाल (विनोद ) मोतीलाल शहा व महेश झुंजार आव्हाड यांच्यात लढत होणार आहे. तर कार्यकारिणी सदस्यपदासाठी महेंद्र कारभारी आहेर, राघवेंद्र जयंतकुमार जोशी, हेतल खेमचंदभाई पटेल, जगन्नाथ चंदु पिंपळे, शिवाजी भीमाजी उगले, अनिरुद्ध विनायक भांडारकर, निखिल रामनारायण, विक्रांत प्रकाश मते, बाळासाहेब उमाजी मंडलिक, नितीन सदाशिव धात्रक, संदीप श्रीकिसन सेनभक्त,महेश देवबा भामर, ज्ञानेन्द्र सिंग सिसोदिया हे उमेदवार रिंगणात उरले आहेत. नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या या निवडणुकीसाठी मनीष लोणारी हे निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

# पोकार कॉलनीतील उद्यानाच्या दुरुस्तीला सुरुवात

## 'गांवकरी'च्या वृत्ताचा इम्पॅक्ट; नागरिकांकडून आभार

**पंचवटी : वार्ताहर**

प्रभाग क्रमांक एकमधील दिंडोरी रोडवरील पोकार कॉलनीत साधारण १५ ते २० वर्षांपूर्वी उद्यान विकसित करण्यात आले. परंतु या उद्यानात कुठल्याही प्रकारची सुविधा नाही की खेळणी नाही. तर उद्यानात परिसरातील नागरिक पाळलेल्या श्वानांना घेऊन जात असून, हे उद्यान नागरिकांसाठी की श्वानांसाठी? असा प्रश्न उपस्थित केला जात असल्याचे वृत्त दि.२२ रोजी दैनिक गांवकरीमध्ये प्रसिद्ध होताच मनपाच्या उद्यान विभागाला जाग आल्यानंतर रात्री उशिरा गार्डनच्या गेट दुरुस्तीचे काम करण्यात आले.

दिंडोरी रोडवरील पोकार कॉलनीत गंगासरिता सोसायटीसमोर १५ ते २० वर्षांपूर्वी उद्यान विकसित करण्यात आले.



रात्री उशिरा उद्यानाच्या प्रवेशद्वाराचे गेट दुरुस्तीचे काम करताना कारागीर. (छाया : सुनील बुनगे)

**श्वानांना आवर घालण्याची मागणी**

पोकार कॉलनीत मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती असून, या ठिकाणी सुशिक्षित वर्ग राहतो. तर परिसरातील अनेक जणांकडे पाळीव श्वान असून, ते नागरिक आपल्या पाळीव श्वानांना उद्यानात फिरण्यासाठी घेऊन येतात. त्यामुळे पाळीव श्वान उद्यानाच्या आवारात घाण करतात. या भागात लहान मुले असल्याने त्यांना खेळण्या बागडण्यासाठी हे एकमेव उद्यान असून, उद्यानात फिरण्यासाठी आणणाऱ्या श्वानांना आवर घालण्याची मागणी परिसरातील नागरिक करत असून, उद्यानाच्या आवारात खेळण्या बसवून उद्यान सुशोभित करावे, अशी मागणीदेखील केली आहे.

जेव्हापासून हे उद्यान विकसित करण्यात आले तेव्हापासून या उद्यानात एकही खेळणी नाही.

केवळ पाथवे तयार करण्यात आले. उद्यानाची अवस्था बघता या ठिकाणी असलेल्या पाथवेवर बसविण्यात आलेले पेव्हर ब्लॉक देखील निघून गेले.

त्यामुळे या उद्यानाबाबत दैनिक गांवकरीमध्ये सचित्र वृत्त प्रसिद्ध झाले. त्यानंतर झोपलेला उद्यान विभागदेखील जागा झाला.

या वृत्ताची दखल घेत ठेकेदाराकडून सकाळी उद्यानाच्या आवारात पाणी मारण्यात आले. तसेच उद्यानाच्या प्रवेशद्वाराचे गेट दुरुतीचे काम मंगळवारी रात्री उशिरापर्यंत सुरू होते. परिसरातील नागरिकांनी दै. गांवकरीचे आभार मानले.

### मंथन परीक्षेत मविप्र होरायझनचा डंका

**नाशिक :** राज्यस्तरीय मंथन सामान्यज्ञान परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, यात मविप्रच्या येवला येथील होरायझन स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. शिवतेज शिंदे याचा राज्य पातळीवर ४ था क्रमांक तर गार्गी लोखंडे ही राज्य पातळीवर ९ व्या रँकने उत्तीर्ण झाली. कार्तिकी घुले, अद्वय भावसार, शिवम बडदे, सिया लोणारी, अभिनंदन गायके, आर्यन पिंपळे, सोजस मोरे, अद्विका जोंधळे, मृणालिनी काळे, अपूर्व काकडे, अभिज्ञा काळे, विराज गुंजाळ, शिवप्रिया शिंदे या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत नेत्रदीपक अशी कामगिरी केली.



### निमात उच्चस्तरीय स्किल सेंटर उभारण्याबाबत लवकरच करार

#### शिष्टमंडळाची 'टीआयआयएस'शी चर्चा

**नाशिक : प्रतिनिधी**

निमामध्ये उच्चस्तरीय कौशल्य विकास केंद्र (स्किल सेंटर) उभारून त्याद्वारे प्रगत उत्पादन क्षेत्रात कामगारांना सक्षम बनवण्याचा तसेच कौशल्य विकासात चालना देऊन औद्योगिझीकरणात नाशिकला भारतात अग्रस्थानी नेण्याबाबत टाटाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स आणि नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (निमा) यांच्यात लवकरच आपापसात सामंजस्य करार होणार आहे, अशी माहिती निमाचे अध्यक्ष आशिष नहार यांनी दिली.

टाटाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स (टीआयआयएस) चे सल्लागार श्रीनिवासन यांनी नुकताच नाशिकचा दौरा केला असता, निमाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन टाटाने निमात स्किल सेंटर सुरू करावे, अशी विनंती त्यांना केली होती. त्याबाबत श्रीनिवासन यांनी सकारात्मकता दर्शवून निमाच्या पदाधिकाऱ्यांना मुंबईतील टाटांचे कौशल्य विकास केंद्र पाहण्यासाठी निमंत्रण दिले होते.

त्याला प्रतिसाद देत लगेच निमाच्या शिष्टमंडळाने मुंबईला जाऊन या स्किल सेंटरची पाहणी केली व टाटाच्या अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

नाशिक येथील औद्योगिकीकारणाचा वेग आणि अनेक विकास प्रकल्प येऊ पाहत आहेत. यादृष्टीने येथे कुशल मनुष्यबळ असणे आवश्यक असून, उच्चस्तरीय कौशल्य विकास केंद्र असणे गरजेचे असल्याचे नहार यांनी सांगितले. निमाच्या पदाधिकाऱ्यांची टाटाच्या स्किल सेंटरला दिलेली भेट आणि तेथील अधिकाऱ्यांशी झालेली चर्चा म्हणजे टाटा संस्था आणि निमा यांच्यातील परस्पर संबंध मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणावे लागेल.

टाटाच्या आयआयएस संस्थेत विचारवंत येतात आणि आपल्या विचारांची देवाणघेवाण करतात. भविष्याच्या दृष्टीने महत्वाच्या गोष्टींची चर्चा करतात तेव्हा चांगल्या गोष्टी घडतात असा आमचा विश्वास आहे.

निमाच्या पदाधिकाऱ्यांशी झालेली भेट हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे, असे टाटा आयआयएसचे सीएफओ मयंक पलान यांनी सांगितले.

चर्चेत निमातर्फे अध्यक्ष आशिष नहार, उपाध्यक्ष के. एल. राठी, मनीष रावल, सचिव राजेंद्र अहिरे, कैलास पाटील तर टाटाआयआयएसतर्फे मयंक पलान (सीएफओ), श्रेयस पाटकर (व्यवस्थापक, प्रकल्प), विनोद कुमार (सीएनसी), सुभाष बाटे (इलेक्ट्रिक व्हेईकल), पूनम मत्सगार (औद्योगिक ऑटोमेशन), सुदर्शन मोकाशी (ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग), नितीन अवैया (वेल्डिंग),पूनम मिश्रा, सहाय्यक व्यवस्थापक (प्रशासन) यांनी भाग घेतला.


## जाहीर नोटीस टायटल व्हेरीफिकेशनसाठी

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :- पिंपळगांव बसवंत** , ता.निफाड, जि. नाशिक येथील **गट नंबर १०१** यांसी क्षेत्र ०.४९.०० हे.आर.चौ.मी. + ०.०६.०० हे.आर.चौ.मी. पोटखराबा असे **एकूण क्षेत्र ५५ आर** येणेप्रमाणे मिळकत **राजेंद्रकुमार वसंत खोडे**, रा.पिंपळगांव बसवंत, ता.निफाड, जि.नाशिक यांचे कायदेशीर मालकीचे व कब्जेवहिवाटीचे आहे,अशी खात्री देवून मिळकतीचे मालक यांनी **या मिळकतीपैकी ४० आर मिळकतीचा व्यवहार आमचे अशिलांशी ठरवुन विसारापोटी रक्कम स्विकारली आहे.**

सबब, या मिळकती संदर्भात कोणाच्याही काही हितसंबंध, गहाण, दान, लिन, लिज, वगैरे काही व्यवहार असल्यास, काही बोजे असल्यास, कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून **सात दिवसांच्या आत** आमचेशी संपर्क करुन समक्ष मुळ कागदपत्रांच्या पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे टायटल सर्टीफिकेट देण्यात येईल व त्याप्रमाणे आमचे अशिल मिळकतीचे खरेदीखत करुन घेतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती व वर्तमानपत्रात परस्पर दिलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.
कळावे, ही जाहीर नोटीस. दि.२४/०४/२०२५.

**ॲड.तुषार प्रतापराव घुमरे**
पिंपळगांव न्यायालय,पिंपळगांव (ब),ता.निफाड.,जि.नाशिक. मो.९४२२७५७४२४

## जाहीर नोटीस

निशाणी : ०६

**दिवाणी चौकशी अर्ज नं.६३०/२०२४**
**नाशिक येथील मे.सिव्हील जज्ज साहेब,ज्युनिअर डिव्हीजन,**
(**मा.खाडे साहेब**) यांचे कोर्टात ...

१) **श्रीमती तेजस्विनी विलास काळे,** )
२) **भाग्यश्री विलास काळे,** )
३) **श्री.यश विलास काळे,** ) **अर्जदार**
सर्व रा.एन-३/एल-८२, अचानक चौक, जुने सिडको, )
सिडको, गणपती मंदिराजवळ, नाशिक )

**विरूध्द**

**कोणीही नाही** ) **सामनेवाले**

ज्याअर्थी **कै.विलास वामनराव काळे** हे दि.१७/०९/२०२० रोजी **नाशिक** येथे मयत झालेले आहेत. आणि अर्जदार यांनी कोर्टात सदरहु मयत कै.विलास वामनराव काळे यांचा तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील अचानक चौक, घर क्र.एन-३/एल-८२ यांसी तळ मजला क्षेत्र ६२-३० चौ.मी. यांसी बांधीव क्षेत्र २८-४२ चौ.मी. यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे. ही मिळकत कै.विलास वामनराव काळे यांचे कब्जेवहिवाटीत व उपभोगात असल्याने व अर्जदार क्र.१ ते ३ हे कै.विलास वामनराव काळे यांचे वारस असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज हेअरशिप/वारस दाखला/सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारसदार म्हणुन वारस दाखल देण्यास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी मे.कोर्टात **दि.०५/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजेचे** सुमारास अथवा त्यापुर्वी मे.कोर्टात स्वत: अगर अधिकृत माहितगार व्यक्तीमार्फत हजर होऊन लेखी म्हणणे द्यावे. अन्यथा कुणाचीही अर्जदार यांना कै.विलास वामनराव काळे यांचे वारस म्हणुन हेअरशिप/वारस दाखला देण्यास हरकत नाही, असे समजुन तसा दाखला देण्यात येईल. कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दि.११/०४/२०२५.

सही/- **कनिष्ठ लिपिक,** सि.ज.सि.डी.सो़., नाशिक — (कोर्टाचा शिक्का) — सही/- **सहाय्यक अधिक्षक,** सि.ज.सि.डी.सो़., नाशिक

## जाहीर इशारा नोटीस

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रांवरुन तमांम लोकास या जाहीर इशारा नोटीसीने कळविण्यात येते की,

**श्री. कल्पेश ज्ञानेश्वर गौंडार यांना शिव एंटरप्राईजेस तर्फे अधिकृत इसम श्री. प्रबोधन अशोक रूद्रके, ऑफिस: २०२, रूंग्ठा बिजनेस प्लाझा, पंचवटी डेपो समोर, पंचवटी, नाशिक यांनी त्यांचे क्रेडीट कार्ड युटीलीटी सर्व्हीसेसचा व्यवसाय सांभाळण्यासाठी नोकर म्हणून नियुक्त केलेले होते. परंतु श्री. कल्पेश ज्ञानेश्वर गौंडार यांनी शिव एटरप्राईजेस यांची फसवणुक करून मागील अनेक दिवसांपासून त्यांचेकडील आर्थिक बाबींचा हिशोब दिलेला नाही. तसेच श्री. कल्पेश ज्ञानेश्वर गौंडार यांनी दि. १८/०४/२०२५ रोजी शिव एंटरप्राईजेस तर्फे अधिकृत इसम श्री. प्रबोधन अशोक रुद्रके यांची मोठ्या रकमेची आर्थिक फसवणुक केलेली आहे. त्याचे पुरावे श्री. रूद्रके यांचेकडे आहेत. श्री. रूद्रके यांनी श्री. गौंडार यांचे विरूद्ध योग्य ती फौजदारी व दिवाणी कारवाई सुरु केलेली आहे. परंतु श्री. कल्पेश ज्ञानेश्वर गौंडार हे शिव एंटरप्राईजेस तर्फे अधिकृत इसम श्री. प्रबोधन अशोक रूद्रके यांचे नावाचे गुडवीलचा वापर करून स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी शिव एंटरप्राईजेस यांचे सन्माननीय ग्राहक सदस्यांची दिशाभुल करू पाहत आहेत.**

त्यामुळे तमांम ग्राहक वर्गाला कळविण्यात येते की, शिव एंटरप्राईजेस तर्फे अधिकृत इसम श्री. प्रबोधन अशोक रूद्रके यांनी श्री. कल्पेश ज्ञानेश्वर गौंडार यांना कामावरून काढुन टाकलेले असुन त्यांचेसोबत सन्माननीय ग्राहकांनी कुठलेही आर्थिक व्यवहार करू नयेत. तसेच श्री. कल्पेश ज्ञानेश्वर गौंडार यांनी मो.नं. ७८८७६२६२५३ व ७८८७६२६२०० या नंबरवरून अथवा इतर नंबरवरून संपर्क साधल्यास त्यावर संभाषण करू नये. सदर मोबाईल नंबरासमवेत शिव एंटरप्राईजेस तर्फे अधिकृत इसम श्री. प्रबोधन अशोक रूद्रके यांचा कुठलाही संबंध नाही. यदाकदाचित तसे व्यवहार केल्यास त्याबाबत शिव एंटरप्राईजेस तर्फे अधिकृत इसम श्री. प्रबोधन अशोक रूद्रके हे जबाबदार राहणार नाहीत.
कळावे, ही जाहीर इशारा नोटीस. **नाशिक. दि. २४/०४/२०२५**

**ॲडव्होकेट, शुभम माधव पवार**
ऑफिस : बी–९, दुसरा मजला, मेघदुत शॉपिंग सेंटर, सीबीएस समोर, नाशिक

## जाहीर नोटीस (Public Citation)

निशाणी ०६ — प्रोसेस जमा

**दिवाणी चौकशी अर्ज नं.१६/२०२५** **ॲड.निता वामनराव सोनवणे**
**नाशिक येथील मे.सिव्हील जज्ज साहेब,सिनिअर डिव्हीजन,नाशिक**
यांचे कोर्टात ...

१) **श्रीमती तिलोत्तमा विजय ततार**,वय- ५३ वर्षे,धंदा- गृहिणी )
२) **सायली विजय ततार**, वय- २६ वर्षे, धंदा- नोकरी )
३) **सलोनी विजय ततार**, वय- २३ वर्षे, धंदा- शिक्षण ) **अर्जदार**
४) **अजिंक्य विजय ततार**, वय- २० वर्षे, धंदा- शिक्षण )
सर्व रा.घर नं.एन-५३/व्हीपी-१/०३/०१, पाटील नगर, )
स्वामी विवेकानंद चौक, सिडको, नाशिक. )

**विरूध्द**

**कोणीही नाही** ) **सामनेवाले**

ज्याअर्थी **विजय विश्वनाथ ततार** हे दि.१३/०३/२०२३ रोजी नाशिक येथे मयत झालेले आहेत. कै.विजय विश्वनाथ ततार यांची आई नामे **कै.पुष्पा विश्वनाथ ततार** ह्या फार पुर्वीच मयत झालेल्या आहेत. कै.विजय विश्वनाथ ततार यांचे नांवे असलेली तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील **सिडको** विभागातील पाटीलनगर, स्वामी विवेकानंद चौकातील, **सिडको घर नं.एन-५३/व्हीएफ-१/०३/०१** यांसी **प्लॉटेड क्षेत्र ४०-०० चौ.मी.** यांसी **बांधीव क्षेत्र २२-०५० चौ.मी.** यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे. अर्जदार हे कै.विजय विश्वनाथ ततार यांचे कायदेशीर वारस असल्याने वर नमुद केलेल्या मिळकतीस त्यांचे नांव लावणेकामी कै.विजय विश्वनाथ ततार यांचे पश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम VIII अन्वये हेअरशिप सर्टीफिकेट (वारस दाखला) मिळणेकामी अर्जदाराने अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदरहू अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे.कोर्टात स्वत: अगर त्यांचे वकीलांमार्फत **दि.०८/०७/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता** हजर होवून आपले म्हणणे मांडावे. अन्यथा कोणीचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम VIII अन्वये वारस दाखला देण्यात येईल. प्रस्तुतची जाहीर नोटीस मे.कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिध्द केली असे. ही जाहीर नोटीस.

सही/- **लिपिक,** सि.ज.सि.डी.साहेब,नाशिक — (कोर्टाचा शिक्का) — सही/- **अधिक्षक,** सि.ज.सि.डी.साहेब,नाशिक

## जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकांस या जाहीर इशारा नोटीसीने कळविण्यात येते की,

**आमचे पक्षकार सौ.माया शशिकांत भालेराव यांचे पती श्री.शशिकांत माधवराव भालेराव,** रा.स्वामी विवेकानंदनगर, येवलारोड, एस.टी.कॉलनीसमोर, नांदगांव, ता.नांदगांव, जि.नाशिक यांना दारू पिण्याचे व्यसन असून ते दारूचे इतक्या आहारी गेलेले आहेत की, दारूचे व्यसनापायी व दारूचे नशेसाठी ते कोणत्याही स्थराला जावू शकतात व ते कोणतेही कौटूंबिक कारण नसतांना त्यांचे व्यसनासाठी व मौजमज्जासाठी नातेवाईक, मित्र परिवार व शेजारीपाजारील लोकांकडून हातउसनवार रक्कम घेवून ते सर्व पैसे हे व्यसनावर खर्च करीत आलेले आहेत. त्यामुळे **आमचे पक्षकार व त्यांचे पतीचे दरम्यान वादविवाद होवून मतभेद निर्माण झालेले आहे**. ता.जि.नाशिक मधील म.न.पा.**नाशिक** मधील **मौजे आडगांव–२** शिवारातील **गट नं.१५३६/२** यांसी **क्षेत्र ० हे.५६.७५ आर** यांसी आकार रुपये ००=६३ पैसे, **या मिळकतीमधील त्यांचा असलेला हिस्सा व बांधीव घर मिळकतीची परस्पर त्रयस्थ इसमांशी परस्पर विक्री विल्हेवाट लावणेची दाट शक्यता आहे**. सबब, लोकांची फसवणूक होवून नये म्हणून सदरची जाहीर इशारा नोटीस प्रसिध्द करणेत आली आहे. **सबब, आमचे पक्षकारांचे पती शशिकांत माधवराव भालेराव यांचेशी आमचे पक्षकारांचे संमतीशिवाय कोणीही कोणतेही प्रकारचे आर्थिक व्यवहार करु नये** तसेच उपरोक्त मिळकतीसंदर्भाने चे हस्तांतरणाचा व तबदीलबाबतचा व्यवहार करू नये व दस्त करू नये केल्यास ते आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी व मिळकत विकत घेणारास कोणताही मालकी हक्क प्राप्त होणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच आर्थिक रक्कमेचे व्यवहाराशी त्यांचे परतफेडीशी आमचे पक्षकारांचा कोणताही हितसंबंध राहणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर इशारा नोटीस. ता.२४/०४/२०२५.

पक्षकार सही/- **सौ.माया शशिकांत भालेराव,**
रा.जयभवानी रोड, भालेराव मळा, कदम लॉन्सजवळ, नाशिकरोड,
ता.जि.नाशिक तर्फे

**श्री.बी.एल.गटकळ,ॲडव्होकेट**
रुम नं.१८, जुना बार रुम, जिल्हा न्यायालय आवार, नाशिक.

जा.क्र./ई-२५६/CR No.४२८-२५/३४०/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
व्दारका चौक, जानकी प्लाझा,
नाशिक विभाग, नाशिक.
दि.२३/०४/२०२५.

## चौकशीची जाहीर नोटीस

**चौकशी अर्ज नं.४२८/२०२५**

सार्वजनिक न्यासाचे नांव **कऱ्हाडे ब्राम्हण संघ, नाशिक**, **नोंद क्र.ई-२५६/नाशिक** याबाबत **नरेंद्र वासुदेव ताटके** अर्जदार व सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मे.धर्मादाय उप आयुक्त, सो.नाशिक विभाग, नाशिक हे वर नमुद केलेले अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.
खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) **जंगम मिळकत : (वर्णन)**
(ब) **स्थावर मिळकत :-** तुकडी व जिल्हा नाशिक, पोटतुकडी व तालुका नाशिक पैकी **नाशिक** महानगपालिका हद्दीतील **मौजे आडगांव** या गांवचे शिवारातील मिळकत यांसी **गट नंबर २९०** मधील **प्लॉट क्रमांक १** यांसी **एकूण क्षेत्र ६२६.४० चौरस मीटर** या मिळकतीच्या अंतीमरित्या मंजुर अभिन्यासापैकी पुढील वर्णनाची प्लॉट मिळकत.
पुर्वेस - लागून गट नं.२८९
पश्चिमेस - सदर अभिन्यासामधील ७.५ मि.रुंदीचा रस्ता.
दक्षिणेस - २४ मि.रुंदीचा प्रस्तावित रस्ता (शिव रस्ता)
उत्तरेस - सदर अभिन्यासामधील ६.० मिटर रुंदीचा रस्ता.
(इतर बाबी बदल अर्ज निशाणी १ प्रमाणे.)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा पुरावा द्यावयाचा असल्यास त्यांनी त्यांची लेखी कैफीयत **नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत** या कार्यालयाचे वरील पत्त्यावर समक्ष अथवा मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काहीही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाच्या निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

सदरची नोटीस माझे सहीनिशी व मे.धर्मादाय उप आयुक्त, नाशिक यांच्या शिक्क्यानिशी आज दि.२३/०४/२०२५ रोजी दिली.

(शिक्का) सही/- **अधिक्षक (न्याय)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.

# घाटघर येथे स्वप्नपूर्ती वसुंधरा महोत्सव साजरा

**नाशिक : प्रतिनिधी**

**स्वप्नपूर्ती सामाजिक संस्था, महाराष्ट्र आणि कळसुबाई हरिश्चंद्र-गड अभयारण्य (वन्यजीव विभाग, नाशिक) यांच्या संयुक्त विद्यमाने स्वप्नपूर्ती- वसुंधरा महोत्सव साजरा करण्यात आला. या निमित्ताने निसर्ग सहल, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण तसेच निसर्ग संवर्धन संबंधित पथनाट्य, भारुड, आदिवासी कविता सादरीकरण तसेच काजवा, बिबट्या आणि गिधाड यांच्या संवर्धनासाठी विशेष मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले.**



यानिमित्ताने घाटघर इकोसिटी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे सह्याद्रीच्या कुशीत ३५०हून अधिक निसर्गप्रेमी, पर्यावरण अभ्यासक, वनविभागाचे विविध अधिकारी-कर्मचारी, कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य लगतच्या मुरशेत, पांजरे, उडदावणे, लव्हाळवाडी, शिंगणवाडी, साम्रद, घाडघर, कोलटेंभे, मुतखेल, शेंडी, भंडारदरा, दर्याचीवाडी, पेंडशेत आदी गावातील सर्व सरपंच, उपसरपंच, जि. प. प्रा. शाळेतील सर्व मुख्याध्यापक, समाजसेवक, पत्रकार, आपत्कालीन बचाव कार्यसंघ सदस्य, घाटघर जि. प. प्रा. शाळेतील सर्व विद्यार्थी आणि घाटघर ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपण करून करण्यात आली.

कळसुबाई- हरिश्चंद्रगड अभयारण्य वन्यजीव विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार अध्यक्षस्थानी होते. प्रथम सत्रात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अशोक धिंदळे यांनी काजव्यावर सर्वांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात अभिजीत महाले यांनी बिबट्या आणि गिधाड संवर्धनासाठी विशेष मार्गदर्शन केले.

स्वप्नपूर्तीच्या १८ स्वयंसेवकांनी पथनाट्याचे तर घाटघरच्या विद्यार्थिनींनी आदिवासी गाण्याचे सादरीकरण केले. स्वप्नपूर्तीच्या १० स्वयंसेवकांनी पाणी हरवलं, कोणी ते चोरलं यावर भारुड सादर केले. आज तरुणाईच्या हातात संपूर्ण देशाचे भवितव्य अवलंबून आहे आणि त्यांना सोशल मीडियाच्या विळख्यातून बाहेर काढून जल- जंगल- जमीन यांच्याशी नाते जोडणे काळाची गरज आहे. आणि म्हणून अशा उपक्रमांचे आम्ही वारंवार आयोजन करत राहू. असे स्वप्नपूर्तीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सचिन काकडे यांनी यावेळी सांगितले. सूत्रसंचालन रीना काकडे पाटील यांनी केले. सामाजिक बांधिलकी म्हणून रितेश वालीया यांनी एकूण ३०० स्थानिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची वाटप केले. या उपक्रमासाठी स्वप्नपूर्तीच्या नाशिक जिल्हा समितीचे युगांत नंद्रे, कार्तिकेश बोरसे, अथर्व पाटील, अक्षय पाटील, पंकज मराठे, आयुष लोहकरे, अभिनव केशेवार, प्रगती पगार, देवयानी बिरारी, श्रावणी हिरे, श्रावणी रसकर, सांची गांगुर्डे तसेच वन विभागातर्फे रूपेश गावित, भाऊसाहेब मुठे, महेंद्र पाटील यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून....

## लाचेचे ८ हजार टेबलावर ठेवून धूम

आश्रमशाळा ततानी असे या मुख्याध्यापकाचे नाव आहे. याप्रकरणी सटाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उप अधीक्षक स्वाती पवार, हवालदार शरद हेबडे, युवराज खांडवी यांनी ही कारवाई केली. तक्रारदार हे रोजंदारी शिक्षक असून त्यांची छोटी पिठाची गिरणी आहे. धान्य दळून देण्याचा त्यांना ठेका देण्यात आलेला होता. दळणाचे एकूण बिल ८७४८० रुपये झाले होते. ते मुख्याध्यापकाने तक्रारदाराच्या खात्यावर जमा केल्याच्या मोबदल्यात बक्षीस म्हणून ८००० रुपये व मार्च,एप्रिल या दोन महिन्याच्या दळणाचे बिल मंजूर करून देण्यासाठी १३००रुपये अशी एकूण ९३०० रुपये लाचेची मागणी केली. तडजोडीअंती ८०००रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शवली. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्याने सापळा रचण्यात आला होता. लाचेची रक्कम मोजत असताना मुख्याध्यापकाला संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम टेबलावर ठेवून दुसऱ्या गेटने धूम ठोकली. या मुख्याध्यापकावर सटाणा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याच्या घराची झडती घेण्यात आली. ही कारवाई अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर-घारगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## संसदेत बोलविली सर्वपक्षीय बैठक

आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली याची माहिती दिली आहे.तर सुरक्षा व्यवस्थेमध्ये नेमकी काय चूक झाली, यावर या बैठकीमध्ये चर्चा झाली. कुठल्याही युद्धजन्य परिस्थितीत अशाप्रकारची बैठक बोलावली असता सरकार सर्वांसोबत एकत्रितपणे निर्णय घेते. तसेच आगामी परिस्थितीला एकत्रपणे देश म्हणून सामोरं जात असल्याचा मेसेज त्यातून दिला जातो. कोणतीही मोठी कारवाई करण्याआधी अशाप्रकारची बैठक घेतली जाते. किंवा आपातकालीन परिस्थितीत अशी सर्वपक्षीय बैठक बोलावली जाते.

## जे लोक कधीच विमानात बसले

पोहोचली आहे. स्वतः एकनाथ शिंदे काश्मीरमध्ये गेले आहेत आणि अडकलेल्या पर्यटकांना राज्यात परत आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अशा वेळी त्यांच्याच खासदाराने हे असंवेदनशील वक्तव्य केले आहे. खासदार म्हस्के म्हणाले की, ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी आमच पथक काश्मीरला पाठवले. एकनाथ शिंदे स्वतः त्या ठिकाणी पोहचलेले आहेत. कोल्हापूर, केरळ आणि इर्शाळवाडी या ठिकाणी एकनाथ शिंदे सर्वात आधी पोहचून मदत करत होते. सरकार तर मदत करत आहे. जे लोक कधीही विमानात बसले नव्हते त्या लोकांना एकनाथ शिंदे यांनी विमानांत बसवून आणले. ४५ लोक रेल्वेने पहलगामला गेले होते. गरीब लोक, त्यांच्या खाण्याचे वांदे होते. सीआरपीएफच्या कँपमध्ये ते लोक राहत होते. त्यांना एकनाथ शिंदे साहेबांनी विमानतळावर आणले.

# लासलगाव बाजार समिती संचालकांमध्ये फूट ?

## सभापती,उपसभापती निवडीनंतर नाराजी उफाळल्याची चर्चा

**नाशिक : प्रतिनिधी**

आशिया खंडातील सर्वांत मोठी कांद्याची बाजारपेठ म्हणून लासलगाव बाजार समितीची ओळख आहे.शिवाय राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या लासलगाव-येवला विधानसभा मतदार संघात असल्यामुळे या बाजार समितीवर कोणत्या गटाचे व कोणत्या पक्षाचे वर्चस्व आहे याबाबत मोठी चर्चा असते.निफाड तालुक्यातील जिल्हा परिषद गटात व पंचायत समिती गणात या बाजार समितीचे संचालक आपआपले वर्चस्व सिध्द करत असतात अशा या राजकारणात उलथा पालथ करणाऱ्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राजकारणाचे अनेक पैलू आहेत. सध्या बाजार समितीच्या संचालकांमध्ये एकमत नसल्याने विकासकामाना मोठा अडथळा निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.सभापती ज्ञानेश्वर जगताप व उपसभापती दरेकर यांच्या निवडीवरुन संचालकामध्ये आपापसात मतभेद झाल्याचे बोलले जात आहे.




लासलगाव बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापतींची दोन आठवड्यांपूर्वी निवड झाली. यामध्ये पंढरीनाथ थोरे यांच्या गटाचे व भाजपचे ज्ञानेश्वर जगताप सभापती झाले. तर जयदत्त होळकर गटाचे दरेकर उपसभापती झाले. छगन भुजबळ यांनी सभापती पदासाठी जगताप यांचे नाव सुचविले होते. मात्र या निवडणुकीत सर्व संचालक मनापासून एकत्र आले होते का? हा संशोधनाचा विषय आहे.सभापती व उपसभापती निवडीप्रसंगी भुजबळाचे विश्वासू दिलीप खैरे प्रत्यक्ष बैठकीला उपस्थित असल्याने सर्व संचालकांवर एक प्रकारे दबाव असल्याचे चित्र होते. तसे झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते दिसूनही आले. त्यामुळे आता.. लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत मतभेदाचे नवे राजकीय वारे वाहू लागले आहेत. लासलगाव बाजार समितीच्या संचालक मंडळाची बैठक नुकतीच झाली. या बैठकीत सभापती ज्ञानेश्वर जगताप आणि उपसभापती दरेकर यांसह त्यांचे पाच समर्थक असे सातच संचालक एका बाजूने तर १८ पैकी ११ संचालकांनी विषय पत्रिकेवरील विषया संदर्भात आपली भूमिका लेखी स्वरुपात सचिव यांच्याकडे सादर केली असल्याने आगामी काळात कारभार चालणार कसा? याची झलकच पहावयास मिळाली.

लासलगाव बाजार समितीच्या संचालक मंडळातील हा वाद आता परिसरात चर्चेचा विषय बनला आहे. त्यामुळे पडद्यामागून विविध राजकीय डावपेच आखले जात आहेत भुजबळांच्या संमतीने व होळकर यांनी सुचविलेले सभापती ज्ञानेश्वर जगताप व उपसभापती दरेकर यांच्या विषयी नाराजी म्हणून हे ११ संचालक अलिप्त असल्याची चर्चा आहे.माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी सभापती, उपसभापती निवडणुकीत थेट हस्तक्षेप केला गेला भुजबळ यांच्या व्यतिरिक्त असलेला पंढरीनाथ थोरे आणि ज्ञानेश्वर जगताप यांच्या गटात फूट पडली आहे सध्या ज्ञानेश्वर जगताप हे होळकर यांच्या समवेत आहेत. सभापती आणि उपसभापती यांची नावे निश्चित करताना पडद्यामागून मोठे राजकारण घडले. त्यामुळे भुजबळ यांनी सभापती म्हणून जगताप यांचे नाव सुचविले. उपसभापती कोण? हे मात्र भुजबळ यांनी होळकर यांच्यावर सोपविले होते. होळकर यांनी राजकीय सोय म्हणून होळकर समर्थक दरेकर यांना उपसभापती केले. सभापती व उपसभापती निवड ही बहुतांशी संचालकांना मान्य नव्हती असा अर्थ राजकीय खेळीवरुन निघतो आता सभापती आणि उपसभापती दोघांनाही यापुढे बाजार समितीचा कारभार कसा करावा ही मोठी समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. रोजच संचालकांमध्ये राजकीय डावपेच आखले जात आहेत. ११ संचालक विरोधात गेल्याने अविश्वास प्रस्तावाचा खेळ होतो की काय.? याचीही भीती सभापतींना आणि उपसभापतींना आहे.


ग्रामपंचायत धुळगाव ता. येवला जि नाशिक

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६**

**शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)**

ग्रामपंचायत धुळगाव ता. येवला जि नाशिक होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दर पत्रक द्वारे निविदा मागवत आहे. सदर च्या तांत्रिक लिफाफा मध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, व पॅन कार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफा मध्ये दर पत्रक सादर करण्यात यावे. सदर चा लिफाफा २४/०४/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक २९/०४/२०२सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्या नंतर सदर च्या निविदा संबंधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत धुळगाव ता. येवला जि नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे. व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील.

कामचे नाव :-1)PROVIDING PIPELINE AND TAB CONNECTION DHULGAON TAL. YEOLA DIST NASHIK EST 1,00,000/-

सही/- सरपंच सही/- ग्रामपंचायत अधिकारी

ग्रामपंचायत धुळगाव, ता. येवला, जि. नाशिक



ग्रामपंचायत पिंपळगाव गरुडेश्वर ता. जि नाशिक

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६**

**शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)**

ग्रामपंचायत पिंपळगाव गरुडेश्वर ता. जि नाशिक होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दर पत्रक द्वारे निविदा मागवत आहे. सदर च्या तांत्रिक लिफाफा मध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, व पॅन कार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफा मध्ये दर पत्रक सादर करण्यात यावे. सदर चा लिफाफा २४/०४/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक २९/०४/२०२सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक ३०/०४/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्या नंतर सदर च्या निविदा संबंधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत पिंपळगाव गरुडेश्वर ता. जि नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे. व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील.

**कामाचे नाव :-1)Maintenance repair and supplying pipeline at Gram Panchayat pimpalgaon (G) Tal And Dist Nashik Est. Amt. 64557/-**

सही/- सरपंच सही/- ग्रामपंचायत अधिकारी

ग्रामपंचायत पिंपळगाव गरुडेश्वर, ता. जि नाशिक



**जाहीर निवेदन**

खाली लिहिल्याप्रमाणे जाहीर निवेदन, सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, **श्री. अरविंद अर्जुन गवळी, राहणार- हनुमाननगर, पंचवटी, नाशिक, ता.जि. नाशिक** येथील रहिवासी असून ते दि. १४.३.२०२५ रोजी मयत झालेले असून त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | सरला अरविंद गवळी | ५३ | पत्नी |
| २ | राहुल अरविंद गवळी | ३३ | मुलगा |
| ३ | वैभव अरविंद गवळी | ३० | मुलगा |

हे वारस असून याव्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाहीत. तरी कोणास काही हरकत असल्यास त्यांनी मा. तहसीलदार साहेब, नाशिक यांच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी खुलासा करावा अन्यथा मा. तहसीलदार साहेब नाशिक यांच्याकडून वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रमाणपत्र हे शासकीय कामासाठी देण्यात येत आहे.

नाशिक, ता. सही /-

**तहसीलदार, नाशिक**



**जाहीर निवेदन**

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, **कै. शकुंतला रसिकलाल दोषी ऊर्फ शकुंतला वसंत सोनवणे,** रा. कपालेश्वर बंगला नं. १, हॅपीहोम कॉलनी, तुळशी आय हॉस्पिटलजवळ, नाशिक ४२२००१, येथील रहिवासी असून कै. शकुंतला वसंत सोनवणे ह्या २०.४.२०२४ रोजी नाशिक येथे मयत झाले आहेत. त्यांचे पश्चात खालीलप्रमाणे वारस आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | उमर वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | उषा वसंत सोनवणे | ५५ | मुलगी |
| २ | सुषमा वसंत सोनवणे | ५७ | मुलगी |

हे वारस असून याव्यतिरिक्त इतर अन्य कोणीही वारस नाहीत. तरी कोणास काही हरकत असल्यास त्यांनी मा. तहसीलदार साहेब, नाशिक यांच्याकडे ७ दिवसांत लेखी खुलासा करावा अन्यथा मा. तहसीलदार साहेब नाशिक यांच्याकडून वारसाला वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रमाणपत्र हे शासकीय कामासाठी देण्यात येणार आहे.

सही /-

**तहसीलदार, नाशिक**



**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क : ९२७२०९१४२५**

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क- ९८९००१३१३६**

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. **८२३७३११२११**

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७**

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

**महिला व पुरूष पाहिजेत**

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१

**एन.एन.असोसिएटस्**, तिसरा मजला, आय.डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी. रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

**जमीन विकणे आहे**

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-८७८८०९२४१५**

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**

**विकणे आहे**

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क- ७२०८४९८५२३**

---क

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क: ९९७००३९०४६**

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**



**टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

१. **मिळकतीचे वर्णन** : तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी **मौजे भगुर** येथील बिनशेती मिळकत, यांसी **भुमापन क्र.३०२/१** यांसी **क्षेत्र ३०२.९०.०० आर चौ.मी.**, यांसी **खाते क्र.३९४५ (यांसी शेवटचा फेरफार क्र. १५४८७, ता. ०९/०५/२०२२)** यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईट्सप्रमाणे.

२. उपरोक्त बिनशेती मिळकत ही **श्री. पिलू प्राणजीवन अमिन** यांच्या मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीतील मिळकत असून सदर मिळकत ही मजकूर मिळकत मालक यांनी निर्वेध व बोजाविरहित आहे, असे सांगून सदर मिळकतीच्या स्वामीत्वाबाबत व निर्वेधपणाबाबत खात्री करण्यासाठी प्रस्तुतची टायटल व्हेरिफिकेशनकामी नोटीस प्रसिध्द केली आहे.

३. सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार जसे की, गहाण, दान, लिज, लिन, अन्नवस्त्र, बक्षीस, मालकी हक्क, हितसंबंध, करार, पोटगी, तारण, कर्ज तारण, कोर्ट वाद, जामीनकी, कोर्ट जप्ती,हद्दी व रस्त्याचा वाद अथवा कोणत्याही प्रकारचा वाद, इत्यादी असल्यास अशा इसमांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत आपली लेखी हरकत आमचेकडे कागदपत्रांच्या खऱ्या नक्कला देवून आमची खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, मुदतीनंतर व दाखला दिल्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस.

**नाशिक. तारीख २१/०४/२०२५**

**पक्षकाराची सही/-**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**सही/-(ॲड. श्रीमती के. टी. मंत्री)**

**ऑफिस : ४१५/१, मारुती चेंबर्स, जिल्हा न्यायालय परिसर, नाशिक-४२२००२**



**Shri Kalika Darshan Chs. Ltd.**

**SV NO.550/3, Plot No.16, Old Agra Road Nashik 422002**

**PUBLIC NOTICE**

We received an application from the legal heir of the flat owner late **VIJAYA VIJAY PATIL,** for flat No.5, Ground Floor, in the above-named society, that they lost the original share certificate & to issue duplicate share certificate.

This is public notice issued to invite any objection from large public for any claim in the said property. If no claim is received within 15 days from the date of release of this notice, management of society shall issue a duplicate share certificate to the legal heir of the flat owner.

**श्री कालीका दर्शन को-ऑप. हौसिंग सोसा. लि.**

**Secretary/Chairman**

**Shri Kalika Darshan Chs. Ltd. Nasik**



**जाहीर नोटीस**

**राम वाळूपाटील जोपळे (ॲडव्होकेट)**

**प्रोसेस जमा निशाणी नं. १४**

**दिवाणी चौकशी अर्ज नंबर- ०५ /२०२५**

**दिंडोरी येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब,कनिष्ठ स्तर,नाशिक यांचे न्यायालयात...**

**१) काशिनाथ लक्ष्मण गायकवाड,वय-५२,धंदा- शेती... अर्जदार**

रा.श्रीभुवन,ता. सुरगाणा,जि.नाशिक

**विरुद्ध**

**कोणीही नाही ... सामनेवाले**

**अर्ज- बॉम्बे रेग्युलरेशन अँक्ट १८२७ चे कलम ८.. अन्वये.. वारस दाखला मिळणेबाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी लक्ष्मण महादू गायकवाड हे ता: २१/१२/२०२४ रोजी श्रीभुवन,ता. सुरगाणा, जि.नाशिक येथे मयत झालेले आहे,त्यांचे मृत्युपश्चात त्यांचे नावे असलेले श्रीभुवन ता. सुरगाणा येथील गट नंबर २१ व २४ आणि मोठामाळ,ता.सुरगाणा,जि.नाशिक येथील गट नंबर १० व १८ चे रेकॉर्डला वारस नोंद होणेकामी,अर्जदार यांनी लक्ष्मण महादू गायकवाडचे मृत्युपश्चात अर्जदार हे कायदेशिर वारस आहे,असा वारसदाखला मिळणेबाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे,त्याअर्थी सदर अर्जदारांना ते मयत लक्ष्मण महादू गायकवाड यांचे कायदेशिर वारस आहेत,असा वारस दाखला अर्जदारास देणेबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत ता:२० /०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात उपस्थितीत राहून म्हणणे मांडावे,आपण हजर राहीला नाही अथवा कोणाचीही हरकत आली नाही तर सदरचे अर्जदारांना त्यांचे मागणीप्रमाणे वारसदाखला देणेस कोणाची हरकत नाही,असे गृहीत धरुन सदरचे वारस दाखल्याबाबत आवश्यक ते हुकुम करेणत येतील याची नोंद घ्यावी ,आज दि: २३/०४/२०२५ रोजी मे. न्यायालयाचे आदेशान्वये व शिक्क्यानिशी दिली असे.

**सही/- का.लिपिक** (शिक्का) **सही/-सहा-अधीक्षक**

**दि.न्यायालय क.स्तर दिंडोरी** **दि.न्यायालय क.स्तर दिंडोरी**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकास कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नासिक पोट तुकडी तालुका दिंडोरी पैकी मौजे वलखेड ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत, **गट नं. १९१, यांसी क्षेत्र ०० हे. ८९ आर, यांसी पो.ख. ०० हे. ०३ आर, यांसी आकार १ रूपये ९४ पैसे, यांसी एकुण क्षेत्र ०० हे. ९२** आर नामे **सौ.सत्यभामा शिवाजी शिंदे**, रा.वलखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांचे मालकीची असून सदर मिळकत कायमची विक्री करणे बाबतचा सौदा वरील मालकांनी आमचे पक्षकाराबरोबर पक्का केला असून विसाराची रक्कम स्विकारून व्यवहार केला आहे.

मिळकत मालकांचे म्हणणेनुसार उपरोक्त मिळकतीचे क्षेत्र निर्वेध व बिनबोजाची आहे. तथापी उपरोक्त मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबध, गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, करार, मदार व अन्य बॅक कर्ज, सोसायटी कर्ज इत्यादी सारखे बोजे हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत आमच्या कार्यालयात संबधित कागदपत्र व साक्षी पुराव्यानिशी येऊन लेखी व समक्ष हरकत नोंदवाची अन्यथा सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजुन आमचे पक्षकार मिळकत मालकांबरोबर मिळकती खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागुन कोणाची तक्रार ऐकली जाणार नाही. तसेच परस्पर वृत्तपत्रातील हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**ही जाहीर नोटीस,** आज **ता. २४/०४/२०२५** रोजी अर्जदार यांचे मागणीनुसार प्रसिध्दीस दिली असे. आमचेमार्फत प्रसिध्द.

**श्री. गणेश शांताराम बोरस्ते**

**ॲडव्होकेट दिंडोरी - नाशिक न्यायालय**

**कार्यालय-कृ.उ.बा.सं.संकुल, गाळा नं. ३३, निळवडी रोड, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक मो. ७३५००१२८११**



**ग्रामपंचायत शिवडे, ता. सिन्नर, जि. नाशिक**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. १ सन २०२५/२६ (प्रथम प्रसिद्धी)**

सरपंच ग्रामपंचायत शिवडे, ता. सिन्नर, जि. नाशिक करिता एकूण ०३ कामासाठीची ब १ नमुन्यातील व साहित्य खरेदी ०१ निविदा या ई-निविदा नाशिक जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा शासनाच्या **www. mahatenders.gov.in** या संकेत स्थळावरून प्रसिद्ध केलेली असून खरेदी व दाखल दि २४/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ पर्यंत करता येतील. निविदेबाबत अधिक माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असून निविदा धारकांनी ई-निविदा भरणे बाबत कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे ह्याबाबत अंतिम अधिकार ग्रामपंचायत शिवडे, ता. सिन्नर, जि. नाशिक ह्यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही/- सरपंच सही/- उपसरपंच सही/- ग्रामसेवक**

**ग्रामपंचायत शिवडे, ता. सिन्नर, जि. नाशिक**



**ग्रामपंचायत कार्यालय कोशिंबे, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**(प्रथम प्रसिद्धी) जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६**

ग्रामपंचायत कार्यालय कोशिंबेता. दिंडोरी, जि. नाशिक येथे,१५ वा वित्तआयोग, पेसा निधीवग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई - निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक २४/०४/२०२५ पासून ते ०१/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील. ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय कोशिंबे, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**सही/-ग्रामपंचायत अधिकारी सही/-सरपंच**

**ग्रामपंचायत कार्यालय कोशिंबे, ता. दिंडोरी, जि. नाशिक**



**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांस कळविण्यात येते की, **कै. नामदेव दादा सांगळे** यांचे नावे **एफ. एल.-३** अनुमती क्रमांक **९९४ व एफ. एल. बी.आर / २** अनुमती क्रमांक २२५, **राहुरी, ता. जि. नाशिक** ही अनुमती असुन सदर अनुमती मधुन अनुमती धारक **कै. नामदेव दादा सांगळे यांचे दि. १६/०२/२०२५** रोजी निधन झालेले आहे, तसेच त्यांच्या मुलगा **श्री. सुरेश नामदेव सांगळे यांचे दि. ०९/१२/१९९४** रोजी निधन झालेले असुन तरी कै. **नामदेव दादा सांगळे** यांच्या निधनानंतर त्यांचे नाव कमी करायचे असुन त्यांच्यानंतर त्यांची **सुन श्रीमती. मंदा सुरेश सांगळे** यांचे नांवे करावयाचे आहे. सदर वारसदारबाबत काही हरकती असल्यास ०७ दिवसाच्या आत अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक या कार्यालयास संपर्क करावा. अन्यथा नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**नाशिक**

**दिनांक : २४/०४/२०२५**

**वरील नोटीस प्रसिध्द करण्यास आमची संमती आहे.**

**सही/- मिळकतीचे मालक**

**सही/-**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲड. सविता एस. बलकवडे**

ऑफिस नं. एफ-२६. पहिला मजला, संसारी नाका जवळ, देवळाली प्लाझा, देवळाली कॅम्प, ता. जि. नाशिक ४२२४०१



**जाहीर हरकत व इशारा नोटीस**

**अक्राळे,ता.दिंडोरी, जि.नाशिक येथील गट नं.३१ बाबत..**

तमाम लोकांस कळविण्यात येते कि, **मिळकतीचे वर्णन :** अक्राळे,ता.दिंडोरी,जि.नाशिक येथील **शेतजमीन मिळकत गट नं.३१,**यासी क्षेत्र **हे.११-२३,आकार रु.२२=५० पैसे,** या मिळकतीपैकी उत्तरबाजूकडील मयत **विठोबा गोविंद नाईक/बदादे** याचे मार्फत **२ आणे ८ पैसे,१७ पैशाचा हिस्सा यासी क्षेत्र हे. १-८७** आर, या मिळकत क्षेत्रापैकी आमचे पक्षकारांचे १/२ हिश्याचे क्षेत्र हे.०-९३ आर, या मिळकत क्षेत्राचे अनुषंगाने आमचे पक्षकार यांनी दिंडोरी येथील मे.दिवाणी न्यायाधीश साहेब,कनिष्ठ स्तर याचे न्यायालयात दिवाणी दावा रे.मु.न. १५/२०२३ या वत्सलाबाई मोतीराम चारोस्कर व इतर याचे विरुद्ध दाखल केलेला असून त्याचे कामकाज दिंडोरी कोर्टात प्रलंबित आहे,आमचे पक्षकार यांनी त्याचे हिस्स्याचे क्षेत्राचा तबदिलीचा अगर खरेदीविक्रीचा व्यवहार कोणाबरोबरही केलेला नाही,असे असताना सदर क्षेत्रासह गट न.३१ मधील संपूर्ण क्षेत्रासह **तारीख-१७/०४/२०२५** रोजी दैनिक देशदूत या वर्तमानपत्रात अँड.सौ.नीता रत्नाकर महाजन,अँडव्होकेट,८ रघुवीर प्लाझा पंचवटी नाशिक याचे मार्फत खरेदीचा सौदा पक्का केले बाबतची नोटीस प्रसिद्ध केलेली आहे,त्याबाबत आमचे पक्षकार याची कायदेशीर रास्त हरकत आहे,अशा परिस्थितीत सदर मिळकतीचे अनुषंगाने कोणीही कोणतेही प्रकारचा मिळकतीचे तबदिलीचा खरेदीविक्रीचा व्यवहार सदर मिळकत क्षेत्रांचे अनुषंगाने करू नये,या उप्परही कोणीही तसे केलेस तो आमचे पक्षकार व उपरोक्त मिळकती मधील आमचे पक्षकाराचे हक्क,हितसंबंध याचेवर बंधनकारक राहणार नाही,याची नोंद घ्यावी,

**ता. :२३/०४/२०२५**

**आमचे मार्फत प्रसिद्ध-**

**सही/- ॲड.श्री.रामवाळू पाटील जोपळे (दिंडोरी कोर्ट)**

**मु.पो. दिंडोरी, जि.नाशिक**



**जाहीर निविदा**

**मायगाव देवी ग्रामपंचायत, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर**

**दि.२५/०४/२०२५**

मायगाव देवी ग्रामपंचायत ता.कोपरगाव, जि.अहमदनगर यांचेकडून जिल्हा परिषद अहमदनगर यांचे नोंदणीकृत ठेकेदाराकडून तीन लिफाफे पद्धतीने सीलबंद बी-१ निविदा मागविण्यात येत आहे. निविदा फॉर्म व कामाच्या अटी व शर्ती या बाबतची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात दि.२५/०४/२०२५ ते दि.०२/०५/२०२५ या कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.

| अ.नं. | कामाचे नाव | योजनेचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मायगाव देवी येथे धोबीघाट बांधकाम करणे | १५ वा वित्त आयोग | (सन-२०२४-२५) बंधीत निधी १,३४,९४३/- | १००/- | तीन महिने | खुला |

**सदर निविदा दि.०२/०५/२०२५ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.**सदर निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा बदल करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि.०३/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता** ग्रामपंचायत कार्यालयात पार पडेल.सदर कामाचा व कामावरील मजुरांचा विमा,रॉयल्टी,जी.एस.टी.भरण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदारांची राहील.

**निविदेसोबत-१) नोंदणी प्रमाणपत्र, सा.बां./जि.प.२)जी.एस.टी.प्रमाणपत्र ३) पॅन कार्ड इ.आवश्यक आहे.**

सदर प्रत-मौजे मायगाव देवी ग्रामपंचायत कार्यालय नोटीस बोर्डावर आहे.

**सही/- सरपंच सही/-ग्रामसेवक**

**मायगाव देवी ग्रामपंचायत कार्यालय ता.कोपरगाव, जि.अहमदनगर**



**जाहीर फारकत नोटीस**

तमाम लोकास विशेषतः **सौ. प्रियंका हिरामण खंबाईत,** रा. द्वारा यशवंत महाले मु पो. आड, ता. पेठ, जि. नाशिक यास कळविण्यात येते की, तुझा व माझा **विवाह सन २०१३ मध्ये मौजे आड, ता. पेठ, जि. नाशिक** येथे आदिवासी समाजाच्या चालीरिती रिवाजानुसार संपन्न झालेला आहे. लग्न झाल्यानंतर तु माझेकडे नांदण्यास आली. सुरूवातीचे ७ ते ८ महिने तु माझे सोबत आड ता. पेठ येथे कसाबसा संसार केला. त्यानंतर नाशिक येथील अंबड येथे नांदण्यास आलात व ४ वर्षे संसार केला. लग्नसंबंधातुन आपल्याला दोन मुली नामे रक्षा व शिवन्या असे झालेले आहे. परंतु लग्नाच्या एक वर्षानंतर तु किरकोळ कारणावरून माझे सोबत वाद करत असत. व सतत माहेरी जात असे. मी तुला नांदण्यास आणण्याचे नेहमीच प्रयत्न केले. परंतु लग्नापासुनच तु नेहमी स्वमर्जीने वागत असे व किरकोळ कारणावरून सतत माहेरी जात असे व माहेरीच राहत असे. मी तुला समजविण्याचा खुपदा प्रयत्न केला व प्रामाणिकपणे तुझेसोबत संसार करून मुलींचा भविष्याचा विचार करून तुझे मनाप्रमाणे मी तुला नांदवत होतो. परंतु मागील एक वर्षापुर्वी कोणतेही संयुक्तीक कारण घडले नसतांना तु घरात माझेसोबत वाद उपस्थित करून मुलींना माझेकडे ठेवुन माहेरी निघुन गेली व त्यानंतर मी तुला नांदविण्यास आणण्याचे बरेच प्रयत्न केले परंतु तु आली नाही. तसेच मुलींना देखील भेटण्यास आली नाही व मुलींना संपर्कही करत नाही व नांदण्यासही येत नाही. मी तुला नाशिकमध्ये नांदण्यास आणण्याचे प्रयत्न केले परंतु तु नांदण्यास आली नाही. व तु मला फारकत देवुन टाक मला तुझी गरज नाही असे म्हणुन तु नांदण्यास येण्यास टाळाटाळ केलेली आहे. अशाप्रकारे तुला माझेकडे नांदायची इच्छा दिसत नाही असे दिसते. मी तुला वकीलामार्फत नांदण्यास येण्याकामी नोटीस देखील पाठविली. परंतु सदर नोटीस तुला मिळुनही तु नांदण्यास आली नाही व मला व मुलींना संपर्क करत नाही व भेटतही नाही. तसेच मी मध्यस्थामार्फत तुला नांदण्यास घेण्यास आलो असता तु माझे सोबत नांदण्यास येण्यास नकार देवुन फारकतीची मागणी करत आहे. यावरून असे दिसते की, तुझी माझेकडे संसार करण्याची इच्छा दिसत नाही. अशी परिस्थिती असतांना देखील सदर नोटीस प्रकाशित झालेपासुन ७ दिवसाच्या आत तु माझेकडे नांदण्यास यावे नाहीतर तुझे म्हणणेप्रमाणे हीच जाहीर फारकत समजुन आपण दोघेही वेगळा घरोबा करण्यास मोकळे होवु याची नोंद घ्यावी.

**कळावे. ही जाहीर फारकत नोटीस**

**ता. २३/०४/२०२५**

आमचे मार्फत प्रसिध्दीस रवाना-

**श्री. हिरामण रामदास खंबाईत,** द्वारा रामदास गंगाराम खंबाईत

**रा. मु.पो. निरगुडे, ता. पेठ, जि. नाशिक**

## महत्त्वाचे



### जिजाऊ रथयात्रेचे रेडक्रॉस परिसरात स्वागत

**नाशिक :** मराठा बहुजन जोडो अभियान जिजाऊ रथयात्रेचे स्वागत मेघवाळ समाज व रेडक्रॉस परिसरातील नागरिकांतर्फे करण्यात आले. यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्यास खा. राजाभाऊ वाजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा जयघोष करून रथयात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी रथयात्रेतील लोकांना पाणी वाटप करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे सुरेश मारू, जगदीश शेजवळ, कृष्णकुमार शेंडके, मोहन वाघमारे, कैलास महाले, बापू मोरे, अमर दरेकर, नीलेश कुसमोडे, नरेश सुमरा, जितू मारू, श्रीकांत बाबरीया, देवेन मारू, मनोज मकवाना, दिनेश चव्हाण, जितू सुमरा, आनंद चव्हाण, चेतन मारू, भावेश पडाया, अरुण आहेर, बबलू शेजवळ, वीरेन मारू, स्वामी शेजवळ, विजय परमार, रोशन टिळे, प्रवीण रेवर, पंकज परमार, कमलेश चव्हाण, गणेश भुसारे आदींसह पदाधिकारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### नाशिकरोड वाणी मित्रमंडळाचा उद्या आनंद मेळावा

**नाशिक :** नाशिकरोड वाणी मित्रमंडळ व इच्छापूर्ती महिला मंडळाच्या वतीने शनिवारी, दिनांक २६ एप्रिल दुपारी तीन ते नऊ च्या दरम्यान कदम लॉन्स, नाशिकरोड येथे आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या आनंद मेळाव्यात विविध फूड स्टॉल आणि कलाकुसरीच्या वस्तूंचे प्रदर्शन करण्यात येणार आहे, ज्याच्या योगाने लघुउद्योजकांना व्यवसायाच्या विविध संधी उपलब्ध होतील. विविध गेम्स आणि लकी ड्रॉ हे देखील या मेळाव्याचे आकर्षण असेल. अधिकाधिक नागरिकांनी या आनंद मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### प्रेमात फसवणूक झाल्याने युवतीची आत्महत्या

**पंचवटी :** लग्न झाल्यानंतरही लग्नाची माहिती लपवून युवतीशी प्रेमसंबंध ठेवल्याने युवतीने आत्महत्या केल्याप्रकरणी एका जणावर पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, संशयित राहुल दासनूर याचे लग्न झालेले असतानाही त्याने लग्नाची माहिती लपवून ठेवत त्याने एका १९ वर्षीय युवतीशी प्रेमसंबंध ठेवले. याबद्दल युवतीला समजल्याने तिने आत्महत्या केली. याबाबत नारायण राजाराम गर्दे (४५, रा. दिंडोरी नाका, पंचवटी यांनी राहुल अभिमान दासनूर, रा. कंकाळे, ता. मालेगाव, जि. नाशिक याच्याविरोधात आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा पंचवटी पोलिस ठाण्यात दाखल केला असून, पुढील तपास महिला सहाय्यक पोलिस निरीक्षक पाटील करीत आहेत.

### सिडकोत सिटी लिंक बस आणि रिक्षात धडक

**सिडको :** सिडकोतील सिटी सेंटर मॉल चौक गुरुवारी (ता. २४) पहाटे एका जोरदार धडकेने दणाणून गेला. सिटी लिंक बस व रिक्षा यांच्यात झालेल्या अपघातात तीन ते चार जण जखमी झाले. त्रिमूर्ती चौकाकडून सिटी सेंटर मॉलसमोरुन सिटीलिंक बस क्रमांक एमएच १५ जी व्ही ७७२०ही सीबीएसकडे जात असताना एबीबी सर्कलकडून गोविंदनगरकडे एमएच १५ जे ए ५९२० या क्रमांकाची रिक्षा प्रवासी घेऊन भरधाव वेगाने जात असतांना रिक्षा चालकाचे रिक्षावरील नियंत्रण सुटल्याने थेट सिटी लिंक बसवर आदळून जवळच असलेल्या सिग्नलवर जाऊन धडकला. यावेळी झालेल्या अपघातात रिक्षातून प्रवास करणारे प्रवासी गंभीर जखमी झाले आहे. जखमी प्रवाशांना उपचारासाठी तत्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी गंगापूर पोलिस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास गंगापूर पोलीस करीत आहेत.

# गंगापूर येथील खूनप्रकरणी आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

## वैयक्तिक वादातून मित्रानेच काढला काटा

**पंचवटी : वार्ताहर**
**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**गंगापूर पोलीस ठाणे हद्दीत तीन वर्षांपूर्वी झालेल्या खून प्रकरणात नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीस जन्मठेपेची शिक्षा आणि ५,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास आरोपीस तीन महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागणार आहे.**



दिनांक १ जून २०२२ रोजी सकाळी ९.५० वाजता कॅनॉल रोड, ऑकार हाइट्स समोर, गंगापूर येथे हा गुन्हा घडला होता. मृत पवन नथू पगारे (वय २२, रा. सातपूर कॉलनी) याचा त्याचाच मित्र अतुल अजय सिंग याने धारदार शस्त्राने खून केला होता. आरोपीने वैयक्तिक कारणावरून धमक्या व वादातून चाकूने वार करून पवनला ठार मारले होते. गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक रियाज शेख यांनी करत आरोपीविरुद्ध भा.दं.वि. कलम ३०२ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अंतर्गत दोषारोपपत्र दाखल केले होते.

या सुनावणीदरम्यान फिर्यादी, पंच आणि साक्षीदारांच्या ठोस साक्षी व पोलीस तपासातील परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. डी. जगमलानी यांनी आरोपीस दोषी ठरवले. या खटल्यात सरकारी पक्षातर्फे अति. सरकारी अभियोक्ता सुधीर कडवे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. तसेच पैरवी अधिकारी महिला पोलिस हवालदार रिना आहेर आणि कोर्ट अंमलदार पोलिस हवालदार एस. सी. शिंदे यांनी पाठपुरावा केला.



### मोटारसायकल चोरी प्रकरणात विधी संघर्षग्रस्त बालक ताब्यात

**पंचवटी : वार्ताहर**

पंचवटी पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने दोन दिवसांत मोटारसायकल चोरीचे गंभीर प्रकरण उघडकीस आणले असून, या प्रकरणात एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले आहे. पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पडोळकर यांच्या पथकाने दिनांक २३ ते २४ एप्रिल २०२५ दरम्यान दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांचा यशस्वी छडा लावला. एका विधिसंघर्षित बालकाकडून ३० हजार रुपये किमतीची एमएच १५ जेई ७२७९ या क्रमांकाची होंडा मोटारसायकल हस्तगत करण्यात आली आहे तर सरकारवाडा पोलीस ठाण्यातील गुन्ह्यातही त्याच बालकाकडून एमएच १५ डी.डब्ल्यू. २७२९ या क्रमांकाची होंडा कंपनीची मोटारसायकल जप्त करण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, सहाय्यक पोलिस निरीक्षक विलास पडोळकर, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक संपत जाधव, हवालदार अमोल काळे आदींच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडली.

# रस्ते खोदकामामुळे दुचाकीस्वाराचा मृत्यू

## ठेकेदारावर गुन्हा दाखल, महिला जखमी

**नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी**

नाशिक शहरात अर्धवट आणि निष्काळजीपणे केलेल्या रस्ते खोदकामामुळे एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून, एक महिला गंभीर जखमी झाली आहे. ही दुर्घटना नाशिकरोड परिसरातील ट्रॅक्शन गेटजवळ घडली. ठेकेदाराने कोणतीही परवानगी न घेता मातीचा उंच स्पीडब्रेकर तयार केल्याने अपघात घडल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. संबंधित ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ६ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास नीलेश बन्सीलाल छाजेड (वय ५१) हे त्यांच्या दुचाकीवरून एकलहरेहून नाशिकरोडकडे जात असताना ट्रॅक्शनसमोर असलेल्या मातीच्या उंच व ओबडधोबड स्पीडब्रेकरवरून गाडी घसरून पडले. डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. याच ठिकाणी काही वेळाने प्रतिभा रवींद्र वाघ या महिला आणि त्यांचे दीर सूरज वाघ यांचाही अपघात झाला. दोघेही दुचाकीवरून जात असताना स्पीडब्रेकरमुळे गाडी घसरून पडल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली.

सदर अपघातानंतर पोलीस तपासात उघड झाले की, ट्रॅक्शनजवळील सिमेंट काँक्रीट रस्त्यावर 'सनराइज कन्स्ट्रक्शन' नावाच्या ठेकेदाराने नाशिक महापालिकेच्या कोणत्याही विभागाची परवानगी न घेता रस्ता फोडून अर्धवट काम केले होते. तसेच हा रस्ता औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे यांच्या ताब्यात असून, सनराइज कन्स्ट्रक्शन यांनी औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे यांच्या कार्यालयाची परवानगी न घेता काम केले आहे. सिमेंटचा रस्ता फोडून काम केले. काम सुरू असताना कोणतीही सूचनाफलक, बॅरिकेड्स लावले गेले नव्हते. हे संपूर्ण दृश्य सीसीटीव्ही फुटेजमधून समोर आले आहे. पोलिसांनी संबंधित ठेकेदारावर नाशिक रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# 'टिप्पर'चा म्होरक्या पठाणची कार जप्त

## वादग्रस्त व्हिडीओ प्रकरणी गंभीर गुन्हे दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करणारा वादग्रस्त व्हिडीओ व्हायरल केल्याप्रकरणी सिडकोतील टिप्पर गँगचा म्होरक्या समीर नासीर पठाण (वय ३४) याच्याविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता व इतर विविध कायद्यांच्या एकूण ५० पेक्षा अधिक कलमांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

समीर पठाण हा स्काय अपार्टमेंट, मदीना नगर, वडाळा गाव, नाशिक येथे राहणारा असून त्याने सोशल मीडियावर वादग्रस्त मजकूर प्रसारित केल्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी तात्काळ पावले उचलत तपास सुरू केला.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी १५ लाख रुपये किंमतीची पांढऱ्या रंगाची टाटा सफारी (क्र. एम.एच. १२ यु.सी. ४५५५) चावीसह



जप्त केली आहे. तसेच १० हजार रुपये किंमतीचा सॅमसंग गॅलेक्झी एस२३ मोबाइल जप्त करण्यात आला असून, त्यामध्ये एअरटेल व जिओ अशा दोन सिमकार्डसह संवेदनशील माहिती असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, याप्रकरणी सखोल चौकशी केल्यानंतर यामधून प्रकरणाच्या गांभीर्याचा अंदाज येतो. पुढील तपास सुरू असून, आणखी खुलासे होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

# मनसे महिला पदाधिकाऱ्याच्या कानशिलात लगावली

## इंदिरानगर पोलिस ठाण्याबाहेर कार्यकर्त्यांचा ठिय्या

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सोशल मीडियावर वादग्रस्त व्हिडिओ व्हायरल प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात चौकशीला बोलावण्यात आलेल्या मनसे महिला पदाधिकाऱ्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी कानशिलात लगावल्याने मनसेचे पदाधिकारी चांगलेच संतापले. त्यांनी पोलिस ठाण्याबाहेरच ठिय्या देत इंदिरानगरच्या पोलिस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्यावर कारवाईची मागणी केली. न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशाराही दिला. तर संबधित महिलेविरुद्ध कारवाई करणार असल्याचे तृप्ती सोनवणे यांनी सांगितले.



मनसेच्या पदाधिकारी शैला शिरसाठ यांनी दोन समाजात तेढ निर्माण होईल, अशा प्रकारचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले होते. मात्र, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांनी कानशिलात लगावल्याचा शिरसाठ यांचा आरोप आहे. घटनेची माहिती समजताच पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांनी धाव घेत जमावाला शांत करण्याचा प्रयत्न केला. शिरसाठ यांनी दिलेल्या अर्जाच्या आधारे मारहाणीबाबत चौकशी केली जाईल, असे राऊत यांनी स्पष्ट केले. रहिवाशांच्या म्हणण्यानुसार काही दिवसांपूर्वी एका वादातून धारदार शस्त्राचा वापर करत हल्लाही झाला होता. या पार्श्वभूमीवर संबंधित व्हिडिओ प्रकरण जोडले जात आहे. मनसेचे स्थानिक नेते आणि हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने पोलीस ठाण्यासमोर जमले होते. यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# कोणासारखं होण्यापेक्षा स्वत:सारखे व्हा : रानडे

**नाशिक : प्रतिनिधी**

आयुष्यात कोणासारखं होण्यापेक्षा स्वतःसारखे व्हा, जो स्वत:सारखा होतो तो मोठा होतो, समृद्ध होतो. तुमच्याकडे स्वतःचे ज्ञान, गुणवत्ता असेल तर समाजात पुढे जाल. पुस्तकाच्या सान्निध्यात राहून समाजासाठी काही करण्यासाठी आधी स्वत:पासून सुरुवात करा, असे मत ग्रंथ तुमच्या दारीचे प्रवर्तक विनायक रानडे यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नाशिक केंद्राच्या वतीने जागतिक पुस्तक दिनानिमित्त कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या ग्रंथ तुमच्या दारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, यावेळी रानडे बोलत होते. यावेळी विनायक रानडे आणि कवी व लेखक संतोष हुदलीकर तसेच लेखक, पत्रकार गिरीधर पांडे आदी उपस्थित होते. रानडे पुढे म्हणाले, पुस्तक वाचणं हा समृद्ध होण्याचा मार्ग आहे. पुस्तक वाचनाने मेंदू सशक्त होतो. सशक्त मेंदू कुणापुढे झुकत नाही. पुस्तकाच्या सान्निध्यात राहिल्याने पुढील पिढी समृद्ध होईल, असे विचार रानडे यांनी ग्रंथसंपदा घरोघरी पोहचविण्यासाठी सुरू केलेल्या या अभिनव उपक्रमाबद्दल माहिती दिली. कवी संतोष हुदलीकर यांनी लेखक, कवी, गीतकार, कथा, पटकथा, जाहिरात या विविध क्षेत्रांत काम करतानाचे विविध समृद्ध अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. कवितेच्या माध्यमातून विचार व्यक्त केले. ज्यावेळेस आपण निःस्वार्थ भावनेने दुसऱ्यासाठी काही करतो. तेव्हा संपूर्ण समाज आपल्यासाठी उभा राहतो, असे त्यांनी नमूद केले.





**नाशिक : भाविक ठक्कर, मेरजयान पटेल, जयेश ठक्कर, अजित दान, सुनील गवादे, उदय शाह, शंतनू देशपांडे, मनोज पलोड, भूषण महाजन, अभय नेरकर.**

# नरेडको बैठकीत जीएसटी आयुक्तांचे मार्गदर्शन

**नाशिक : प्रतिनिधी**

नरेडको नाशिकच्या कार्यकारिणी समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस सीजीएसटी अतिरिक्त आयुक्त अजित दान हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

या बैठकीत विविध धोरणात्मक विषयांवर चर्चा झाली, तसेच रिअल इस्टेट क्षेत्राशी संबंधित कर प्रणाली, जीएसटीसंदर्भातील मुद्दे आणि विकासाच्या संधी याविषयी अजित दान यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी नरेडकोच्या सदस्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रशासनाच्या पातळीवर सहकार्याची ग्वाही दिली.

नरेडको नाशिकचे अध्यक्ष सुनील गवादे, सचिव शंतनू देशपांडे, कोषाध्यक्ष भूषण महाजन, मार्गदर्शक जयेश ठक्कर तसेच सर्व कार्यकारिणी सदस्यांनी अजित दान यांचे स्वागत केले. या बैठकीस नरेडको कार्यकारिणी समितीचे ३० सदस्य तसेच आयसीएआय नाशिक शाखा अध्यक्ष जितेंद्र फापड, खजिनदार विशाल वाणी, सनदी लेखापाल अनिल कोठावदे, पुष्कर डास व नरेडको पॅनलचे तुषार लोखंडे यांनी सहकार्य केले. नरेडको नाशिक नेहमीच प्रशासनाशी सकारात्मक संवाद साधून नाशिक शहराच्या आणि उद्योगाच्या प्रगतीसाठी कार्यरत राहणार असल्याचे या बैठकीतून आग्रहाने मांडण्यात आले.

# जिजाऊ रथयात्रेचे सिडकोत स्वागत



**सिडको : विशेष प्रतिनिधी**

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या सन्मानार्थ निघालेल्या ऐतिहासिक रथयात्रेचे काल नवीन नाशिकमध्ये उत्साहात स्वागत करण्यात आले. सकल मराठा समाजातर्फे त्रिमूर्ती चौक येथे रथयात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले. यावेळी जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

१८ मार्च रोजी संभाजीनगर जिल्ह्यातील भोसले गढी येथून सुरू झालेली ही रथयात्रा ३९ दिवसांत ५ हजार किलोमीटरचा प्रवास करत आहे. आतापर्यंतच्या प्रवासात ८ हजार ठिकाणी लाखो नागरिकांनी रथयात्रेचे स्वागत करून एकतेचा संदेश दिला आहे. फुलांनी सजवलेल्या ट्रकमध्ये पाच फूट उंच सिंहासनावर विराजमान राजमाता जिजाऊंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यासाठी खास पायऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

नवीन नाशिकमधील त्रिमूर्ती चौकात जिजाऊ रथयात्रेचे आगमन होताच ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी विद्या विकास माध्यमिक विद्यालय, चुंचाळे येथील विद्यार्थ्यांनी शिवकालीन प्रात्यक्षिक सादर केले तर डॉ. डी. एस. आहेर प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्यावर आधारित नाट्य सादरीकरण केले.

या स्वागत कार्यक्रमाप्रसंगी भाजपाचे नेते महेश हिरे, सुधाकर बडगुजर, डी. जी. सूर्यवंशी, नाना महाले, अण्णा पाटील, रवी पाटील, विश्राम सोनवणे, दत्ता काका पाटील, राजेंद्र जडे, जिभाऊ बच्छाव, रोहित जगताप, रवींद्र दातीर, उमेश शिंदे, संदीप बोरसे, उल्हास बोरसे, प्रशांत पाटील, आशिष देशमुख, कृष्ण काळे, अरुणा पाटील, दीपिका पाटील अर्जुन तनपुरे, नितीन रोटे, प्रफुल वाघ, विकी गायधनी, सौरभ खेडकर, डॉ. प्रसाद सोनवणे, दीपक भदाणे, राजेंद्र निंबायते, स्मिता शिंदे यांच्यासह राजमाता जिजाऊ रथ यात्रा स्वागत समितीचे पदाधिकारी अमोल पाटील, आशिष हिरे, राम पाटील, बाळासाहेब गिते, संजय भामरे, किशोर पाटील, राजेंद्र मराठे, सुधाकर टावरे, जितेंद्र पाटील, मनोज सावंत, योगेश आहिरे, शुभम महाले, हर्षद पाटील, सुजित देशमुख, मनोज वाघ, प्रशांत अहिरे, तुषार शेवाळे, संदीप हिरे, हरीश वाघ, राहुल काकळींज, गोपी पगार आदी उपस्थित होते. दरम्यान नाशिक सकल मराठा समाजातर्फे योगेश गांगुर्डे यांनी मानले. या रथयात्रेचा १ मे रोजी पुण्यातील ऐतिहासिक लाल महालात समारोप होणार आसल्याचे आयोजकांनी सांगितले.

# झळा त्या लागल्या जीवा, असह्य झाला उन्हाळा!

## उन्हाळीचा त्रास कमी करण्यासाठी करा हे उपाय

**नाशिक : प्रतिनिधी**

सध्या तापमान चाळिशीपार गेले असून, उष्णतेची लाट जाणवत आहे. यामुळे शरीरावरही उन्हामुळे त्रास सुरू झाले आहेत. घशाला कोरड, जीव घाबरा होण्याबरोबर अस्वस्थता निर्माण होत आहे. विशेषतः मुली, महिलांमध्ये याचे प्रमाण जास्त आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत मूत्रविसर्जन करताना मूत्रमार्गाची आग होण्याच्या त्रासाला उन्हाळी लागणे म्हणतात. हा एक परत परत होणारा मूत्रदाह असतो.



उन्हाळी लागते तेव्हा मूत्राची आम्लता वाढते. मूत्रमार्गातील अंतःस्थ त्वचेशी या आम्ल झालेल्या मूत्राचा संबंध आल्यावर अंतर्गत दाह निर्माण होतो आणि मूत्रमार्गाची जळजळ होते.

शरीरातील रक्त आणि पेशींमधील पाणी तसेच क्षार यापासून घाम बनतो. घाम खूप गेल्यानंतर शरीरातील पाण्याचे आणि क्षारांचे प्रमाण कमी होऊन मूत्र आम्लस्वरूप घेते, यालाच आपण उन्हाळी लागली असे म्हणतो. उन्हाळी लागली तर खडीसाखर बारीक कुटून घ्या, खडीसाखरेची पावडर आणि बडीशेप सम प्रमाणात घ्या, म्हणजेच एकेक चमचा घ्या आणि ग्लासभर पाण्यात ते रात्रभर भिजत ठेवा. दुसऱ्या दिवशी सकाळी हे पाणी गाळून घेऊन प्या. हा उपाय केल्याने उन्हाळी लागण्याचा त्रास बऱ्याच प्रमाणात कमी होईल. याशिवाय टरबूज, संत्री, द्राक्ष यांसारखी ताजी फळं, काकडी, ताक, लिंबू सरबत, नारळपाणी, सातूचे पीठ अशा पदार्थांचे आहारातील सेवन वाढवावे. उन्हाच्या झळा टाळण्यासाठी पुरेसे पाणी व योग्य आहार महत्त्वाचा आहे.

### उन्हाळी लागू नये म्हणून उपाय

उन्हाळी लागल्यास खडीसाखर आणि बडीशेप समप्रमाणात वाटून ग्लासभर पाण्यात रात्रभर भिजवून ठेवावी. सकाळी हे पाणी गाळून प्यावे. यामुळे शरीरातील उष्णता कमी होऊन शरीरातील दाह कमी होण्यास मदत होते. दिवसभरात दर तासाला १ ते १.५ ग्लास पाणी प्यावे. लिंबू सरबत, शहाळे, फळांचा ताजा रस, ताक, लस्सी प्यावी. लिंबू पाण्यात किंवा ताकात मीठ आणि खाण्याचा सोडा टाकून उन्हाचा तडाखा वाढल्यामुळे शरीराचेही तापमान वाढू लागते. ते कायम ठेवण्यासाठी मेंदूतील तापमान नियंत्रक केंद्रायोगे रक्तवाहिन्या रुंदावतात आणि घाम सुटतो.

### आग होण्याची कारणे

- पुरेसे पाणी न पिणे
- मूत्रपिंड संसर्ग
- मूत्राशयाचा दाह
- मूत्राशयामध्ये खडा

महत्त्वाचे



## महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक मागे घ्या : भाकप, कामगार संघटनेचे निवेदन

**सिन्नर :** महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक २०२४ त्वरित मागे घेऊन पूर्णतः रद्द करण्याची मागणी सिन्नर तालुका भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. नायब तहसीलदार सागर मुंदडा यांनी निवेदन स्वीकारले. महाराष्ट्र सरकारने व्यक्ती व संघटना यांच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध करण्याच्या नावाखाली नुकतेच प्रस्तावित केलेले महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक २०२४ हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे आणि भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मूलभूत हक्काचे उल्लंघन करणारे आहे. हे विधेयक बेकायदेशीर संघटना व बेकायदेशीर कृती यांच्या अस्पष्ट व्याख्या करून जनतेला संभ्रमित करीत आहे. प्रत्यक्षात जनतेचे प्रश्न घेऊन संघर्ष करणाऱ्या सर्व प्रामाणिक व्यक्ती व संघटनांचा आवाज दाबण्यासाठी या कायद्याचा वापर होणार आहे, असे भारतीय कम्युनिस्ट पक्ष व जनसंघटनांचे म्हणणे आहे. शहरी नक्षलवाद या शब्दाचे कोणतेही स्पष्टीकरण न देता शहरी नक्षलवाद संपवण्यासाठी हे विधेयक असल्याचे सत्ताधारी पक्षांकडून सांगितले जाते. प्रत्यक्षात बेकायदेशीर संघटना व त्यांची कृती यांना प्रतिबंध करण्यासाठी अनेक कायदे अस्तित्वात असताना या विधेयकाची आवश्यकता नाही. केवळ जनतेचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य व अन्यायाविरुद्ध संघटित होऊन प्रतिकार करण्याचा अधिकार संपुष्टात आणण्यासाठी राज्य शासनाद्वारे याचा वापर होणार आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी संघटनेचे जिल्हा सचिव आणि पक्षाचे जिल्हा संघटक भिमा पाटील, तालुका पदाधिकारी अनिल पठारे, कैलास मंजुळे, सोपान कातकडे, संतोष शिरसाठ, सुकदेव जोंधळे, राणी यादव, सविता क्षीरसागर, दीपक गायकवाड आदी उपस्थित होते.



## 'फोटोग्राफी स्वतंत्र महामंडळ स्थापन करा'

**सिन्नर :** फोटोग्राफी व्यवसायाला कलेचा दर्जा प्राप्त व्हावा तसेच फोटोग्राफर व्हिडिओग्राफर बांधवांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी मागणी राज्यातील फोटोग्राफर व्हिडिओग्राफर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. महाराष्ट्र राज्य फोटोग्राफर व्हिडिओग्राफर कला कौशल्य बहुद्देशीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची निवेदिता चौधरी यांच्या माध्यमातून भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. राज्यातील सर्व फोटोग्राफर्स, व्हिडिओग्राफर्स बांधवांची व भगिनींची शासन दरबारी नोंद करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसह इतर काही फोटोग्राफर, व्हिडिओग्राफर बांधवांच्या हिताच्या मागण्या मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आल्या. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक चर्चा केली. यावेळी अमरावती व नागपूर विभागातील पदाधिकारी धीरज मानमोडे, मनीष जगताप, प्रणव हाडे, मोहन कोहळे, केतन (देवेंद्र) नंदनवार आदी उपस्थित होते.



## पंचाळे विद्यालयात पुस्तक वाचन

**सिन्नर :** तालुक्यातील पंचाळे येथील सिन्नर भूषण सूर्यभानजी गडाख विद्यानिकेतन विद्यालयात जागतिक पुस्तक दिनी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एकूण चौदाशे विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षक, शिक्षिका यांनी सामूहिक पुस्तक वाचन केले. व्यासपीठावर मुख्याध्यापक विलास पवार, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र गडाख, प्राथमिक मुख्याध्यापक नवनाथ थोरात, उच्च माध्यमिक प्रमुख प्रवीण शेलार आदी उपस्थित होते. माध्यमिक लोकशिक्षण मंडळाचे सेक्रेटरी राजेश गडाख यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. वाचनाची सवय वाढवणे, पुस्तके आणि लेखन कलेचा सन्मान करणे आणि वाचन-संस्कृतीला प्रोत्साहन देणे हा पुस्तक दिनाचा उद्देश असल्याचे राजेश गडाख यांनी सांगितले. मुख्याध्यापक विलास पवार यांनी पुस्तक वाचनाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे आयोजन नितीन पाटील यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव गुरुळे यांनी केले तर आभार क्रीडा शिक्षक दिपक थोरात यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




## मनेगावला खा. वाजेंनी केले वृक्षदिंडीचे पूजन

**सिन्नर :** मनेगाव येथे वृक्षमित्र परिवाराच्या वतीने वृक्षदिंडी आणि वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले होते. खासदार राजाभाऊ वाजे, सरपंच सुनीता सोनवणे, उपसरपंच शोभा भालेराव, वृक्षमित्र परिवाराचे अध्यक्ष रत्नाकर सोनवणे यांच्या हस्ते वृक्षदिंडीचे पूजन करून वृक्षदिंडीची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी जि. प., सेमी इंग्रजी शाळा तसेच नूतन जवाहर विद्यालय मनेगावच्या विद्यार्थ्यांनी ढोल, लेझीम पथकाच्या निनादात वृक्षदिंडीला बसस्थानकापासून सुरुवात केली. शालेय विद्यार्थी तसेच तालुक्यातून आलेले वनप्रस्थ फाउंडेशन, आई भवानी वृक्षमित्र, तरुप्रीत प्रकल्प, राम कृष्ण हरी संस्था, वृक्षमित्र फाउंडेशन सिन्नर, ढग्या डोंगर वनसंवर्धन समिती सिन्नर, ग्रीन आर्मी दापूर आदी भागातून आलेले वृक्ष संवर्धक व पर्यावरण प्रेमी यांनी वृक्ष लागवडीसंदर्भात फलक हातात घेत झाडे लावा झाडे जगवा, घेऊ सर्वजण वसा राखू वृक्षांची निगा इत्यादी घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. यानंतर वड, पिंपळ, उंबर, कदंब, चिंच, सप्तपर्णी, काशीद, रिठा आदी देशी झाडांची लागवड मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी वृक्षमित्र परिवार, जय श्रीराम पतसंस्था, जय हरी पतसंस्था, विकास सोसायटी, शिक्षक, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# सिन्नरला ११४ पैकी ५८ ग्रामपंचायतींवर येणार 'महिलाराज'

### महिला सरपंचपदाची आरक्षण सोडत जाहीर, ५८ महिलांना जनतेतून सरपंच होण्याची संधी

अनुसूचित जाती ४ | अनुसूचित जमाती ८ | नामाप्र १६ | खुला गट ३०

सिन्नर : प्रतिनिधी

**तालुक्यात होऊ घातलेल्या ११४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत ५८ महिलांना जनतेतून सरपंच होण्याची संधी मिळणार आहे. शहरातील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात तहसीलदार सुरेंद्र देशमुख, नायब तहसीलदार सागर मुंदडा, अव्वल कारकून गोरक्षनाथ पवार यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि.२४) महिला सरपंचपदाची आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यात अनुसूचित जातीच्या ४, अनुसूचित जमातीच्या ८, नामाप्रच्या १६ तर खुल्या गटातील ३० अशा एकूण ५८ ग्रामपंचायती महिला सरपंचपदासाठी आरक्षित झाल्या.**



**सिन्नर : तालुक्यातील महिला सरपंच आरक्षण सोडतीची चिठ्ठी काढताना चिमुरडी हर्षिता जाधव. समवेत तहसीलदार सुरेंद्र देशमुख, नायब तहसीलदार सागर मुंदडा, गोरख पवार आदी.**

सिन्नर तालुक्यात ११४ ग्रामपंचायती असून, २०२५ ते २०३० या कालावधीत निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण २१ एप्रिल रोजी काढण्यात आले होते. त्यानंतर महिला आरक्षणासाठी गुरुवारी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी अनुसूचित जातीच्या ३ ग्रामपंचायती यापूर्वी महिला आरक्षित नसल्याने त्या थेट महिलांसाठी आरक्षित करण्यात आल्या. तर उर्वरित ५ ग्रामपंचायतीमधून चिठ्ठी पद्धतीने आडवाडी ग्रामपंचायत आरक्षित करण्यात आली.

अनुसूचित जमातीच्या एकूण १५ ग्रामपंचायतींपैकी ६ ग्रामपंचायतींना यापूर्वी महिला आरक्षण असल्याने त्या आरक्षणातून वगळण्यात आल्या.

त्यानंतर उरलेल्या ९ ग्रामपंचायतींमधून चिठ्ठी पद्धतीने ८ ग्रामपंचायतींमध्ये महिला आरक्षण जाहीर करण्यात आले. नागरिकांच्या मागास प्रवर्गात एकूण ३१ पैकी ११ ग्रामपंचायती गेल्या. पंचवार्षिकमध्ये महिला आरक्षित असल्याने त्या आरक्षणातून वगळण्यात आल्या. उर्वरित २० मधून १६ ग्रामपंचायती चिठ्ठी पद्धतीने महिला आरक्षित करण्यात आल्या.

सर्वसाधारण प्रवर्गातील ६० ग्रामपंचायतींपैकी गेल्यावेळी आरक्षित नसलेल्या २४ ग्रामपंचायतींवर थेट महिला आरक्षण टाकण्यात आले. तर उर्वरित ३६ ग्रामपंचायतींमधून चिठ्ठी पद्धतीने ६ ग्रामपंचायती महिलांसाठी आरक्षित करण्यात आल्या. त्यात जायगाव, सुरेगाव, मऱ्हळ बुद्रुक, माळेगाव, बारागाव पिंप्री, चिंचोली या ग्रामपंचायतींच्या चिठ्ठ्या निघाल्या.

#### महिला सरपंच आरक्षण पुढीलप्रमाणे–

**अनुसूचित जाती महिला -** उजनी, आडवाडी, सांगवी, डुबेरे
**अनुसूचित जमाती महिला -** धारणगाव, डुबेरेवाडी (कृष्णनगर), दोडी बुद्रुक, दातली, खंबाळे, भरतपूर, पांगरी खुर्द, शहा.
**नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला-** औंढेवाडी, हिवरे, पाथरे खुर्द, रामपूर, धोंडवीरनगर, ठाणगाव, फुलेनगर, बेलू, सावतामाळीनगर, मलढोण, कोळगावमाळ, सोनांबे, चंद्रपूर, धुळवड, वडांगळी, भाटवाडी.
**सर्वसाधारण महिला (खुले)-** कुंदेवाडी, आटकवडे, गोंदे, घोटेवाडी, चिंचोली, जायगाव, दहीवाडी, दुशिंगपूर, देशवंडी, दोडी खुर्द, नळवाडी, पिंपळगाव, पिंपळे, बारागावपिंप्री, बोरखिंड, ब्राम्हणवाडे, भोकणी, मर्हळ खुर्द, मर्हळ बुद्रुक, माळेगाव, मोह, यशवंतनगर (पिंपरवाडी), रामनगर (रामोशीवाडी), वडझिरे, वावी, शिवडे, सुरेगाव, सोनारी, सोमठाणे, हरसुले.

## सिन्नर बाजार समितीत रस्ते डांबरीकरणाचा शुभारंभ

### खा. वाजेंच्या हस्ते विकासकामांचा शुभारंभ, शेतकऱ्यांना पिण्यासाठी मिळणार शुद्ध पाणी

सिन्नर : प्रतिनिधी

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सिन्नर मुख्य बाजार आवारातील रस्त्याच्या डांबरीकरण कामाचा शुभारंभ खासदार राजाभाऊ वाजे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि.२४) करण्यात आला. त्याचबरोबर उन्हाची तीव्रता लक्षात घेता बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांसह सर्व घटकांना पिण्यासाठी शुद्ध आणि थंड पाणी मिळावे यासाठी उभारण्यात आलेल्या जलशुद्धीकरण केंद्राचा लोकार्पण सोहळाही यावेळी पार पडला.



सहाय्यक निबंधक संजय गीते, बाजार समितीचे सभापती गणेश घोलप, उपसभापती सिंधुताई कोकाटे, संचालक शशिकांत गाडे, सुनील चकोर, रवींद्र शेळके, जालिंदर थोरात, शरद थोरात, श्रीकृष्ण घुमरे, प्रकाश तुपे, ड. शरद चतुर, नवनाथ घुगे, नवनाथ नेहे, भाऊसाहेब खाडे, सचिव विजय विखे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. दरम्यान, शेतकऱ्यांना बाजार समितीकडून शेतमाल विक्रीसाठी दैनंदिन बाजारभाव ऑनलाइन बघता यावेत यासाठी बाजार समितीने अद्यावत www.apmcsinnar.com या नावाने वेबसाइट सुरू केली असून, त्यावर बाजार समिती, उपबाजारविषयी माहिती, विविध पिकांचे बाजारभाव, उपक्रम, बातम्या परवानाधारकांची माहिती आदी बाबी प्रदर्शित केल्या आहेत. विविध विकासकामांच्या भूमिपूजनाचे औचित्य साधून दोडी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमृता कटारे, विलास बोडके, राहुल शेळके, राजकुमार आणेराव, संगीता गायकवाड, प्रतिभा गोणटे यांच्या पथकाने शेतकरी, हमाल, व्यापारी यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बाजार समितीत राबवलेल्या उपक्रमांची पाहणी करून मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी संजय सानप, केशव कोकाटे, ठेकेदार सतीश ढोली, राजेंद्र जाधव, अशोक भालेराव, व्यापारी अनिल कलंत्री, शिवनारायण कलंत्री, पप्पू शेठ लड्ढा, बाळकृष्ण चकोर, सतीश चकोर, पप्पू गोळेसर, सुनील पऱ्हाळे, सुनील चोथे, सुजित भावड, दत्तात्रय नवले, तुषार नवले, उत्तम पालवे आदी उपस्थित होते.

## भारत मांडे यांना विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार जाहीर

सिन्नर : प्रतिनिधी

माळेगांव औद्योगिक वसाहतीमधील केबल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडचे कामगार भारत गोरख मांडे यांना राज्य शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून दिला जाणारा मनाचा 'विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार-२०२३' जाहीर झाला असल्याचे राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली.



राज्यभरातून ५१ कामगारांची विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. नोकरी करत असताना सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्यिक, क्रीडा व संघटन आदी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कामगारांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. रुपये २५ हजार, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून, मुंबई येथील हुतात्मा बाबू गेणू गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी येथे येत्या दि. १३ रोजी कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल भारत मांडे यांचे सिन्नर कामगार कल्याण केंद्राचे केंद्रप्रमुख विनोद पाटील, अनिल बोरसे, विजय पाटील यांच्यासह समाजातील सर्वच स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.

## सोनांबेचे सरपंच जनार्दन पवार अपात्र

### १ लाख ७० हजारांच्या अपहारप्रकरणी आयुक्तांचा निर्णय

सिन्नर : प्रतिनिधी

राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या तालुक्यातील सोनांबे ग्रामपंचायतीचे सरपंच जनार्दन लक्ष्मण पवार यांना गत पंचवार्षिक कार्यकाळातील १ लाख ७० हजार रुपयांच्या अपहारप्रकरणी अपर विभागीय आयुक्त अजय मोरे यांनी अपात्र ठरविले आहे.

यासंदर्भात योगेश पवार, विकास तुकाराम पवार, सुभाष जोरवे, विकास कचरू पवार यांनी प्रारंभी अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे अपिल दाखल केले होते. मात्र, ते फेटाळण्यात आले. त्यानंतर विभागीय अप्पर आयुक्तांकडे अपील केले. त्यांनी या प्रकरणी तक्रारदार व सामनेवाले यांचे म्हणणे ऐकून सरपंच जनार्दन पवार यांना उर्वरित कालावधीसाठी अपात्र घोषित केले.

विद्यमान सरपंच पवार हे मागील कार्यकाळातही सोनांबे ग्रामपंचायतीत सदस्य होते. त्यावेळी त्यांनी १४ व्या वित्त आयोगातील निधीतून १३ जुलै २०१८ रोजी दीड लाख व १३ ऑगस्ट २०१९ रोजी २० हजार रुपये धनादेशाद्वारे बेकायदेशीररीत्या स्वतःच्या खात्यावर जमा करून घेतले. रक्कम कोणत्या कामासाठी, कारणासाठी देण्यात आली. याबाबत कोणतीही नोंद नमूद नसल्याने या रकमेचा पवार यांनी अपहार केल्याचा निष्कर्ष अपर विभागीय आयुक्त मोरे यांनी नोंदवला आहे. अपिलार्थींच्या वतीने ॲड. धनंजय भोर व ॲड. अमोल चतुर यांनी काम पाहिले.

#### सव्वाचार वर्षांत ४ सदस्य अपात्र

सोनांबे ग्रामपंचायतीमध्ये सव्वाचार वर्षांत राजकीय ईर्षेतून वेगवेगळ्या कारणांनी चार सदस्यांवर अपात्रतेची कारवाई झाली असून, पाचव्या सदस्यावर कारवाईची टांगती तलवार आहे. आरती विकास पवार यांना तिसरे अपत्याच्या कारणास्तव, समाधान बोडके यांना सात मासिक सभांना गैरहजर राहिल्याप्रकरणी डॉ. रवींद्र पवार यांना शासकीय जागेत अतिक्रमण केल्याने, तर विद्यमान सरपंच जनार्दन पवार यांना अपहार प्रकरणी अपात्र ठरविण्यात आले आहे. या ग्रामपंचायतीत ११ सदस्य संख्या असून, ७ सदस्य उरले आहेत.

#### राजकीय द्वेषातून कारवाई : पवार

सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील सदस्य सरपंच झाल्याचे विरोधकांना बघवत नसल्याने राजकीय द्वेषातून विरोधकांनी आपल्याविरोधात अपील करून सर्वसामान्य नेतृत्व संपविण्याचा घाट घातला आहे. आगामी काळात जनता अशा प्रवृत्तींना धडा शिकवेल, अशी प्रतिक्रिया जनार्दन पवार यांनी दिली.

## दुष्काळ मोर्चातील पाच हुतात्म्यांना अभिवादन

सिन्नर : प्रतिनिधी

तालुक्यातील भीषण दुष्काळात निघालेल्या ऐतिहासिक मोर्चावर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात हौतात्म्य पत्करलेल्या पाच हुतात्म्यांना काल (दि.२२) अभिवादन करण्यात आले. या पाच हुतात्म्यांच्या बलिदानाला ५२ वर्षे पूर्ण झाली.

खासदार राजाभाऊ वाजे, माध्यमिक लोकशिक्षण मंडळाचे अध्यक्ष अण्णासाहेब गडाख, पोलिस निरीक्षक संभाजीराव गायकवाड, नगरपरिषदेचे दीपक बंगाल, योगेश मुळे, प्रमोद पाटील, कैलास चव्हाण, रवींद्र देशमुख, अनिल जाधव, हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष अरविंद गुजराथी, दत्ता वायचळे यांच्या हस्ते हुतात्मा चौकातील स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करण्यात आले.




हुतात्मा स्मारक समितीने स्मारकासाठी केलेल्या पाठपुराव्याची माहिती हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष अरविंद गुजराथी यांनी दिली. दत्ता वायचळे यांनी मोर्चाबाबतची माहिती दिली. १९७२ च्या भीषण दुष्काळानंतर स्वाभिमानी सिन्नरकरांनी शासनाकडून भीक नको तर हाताला काम द्या, प्यायला पाणी द्या, खायला धान्य द्या अशी मागणी करत ऐतिहासिक असा मोर्चा काढला होता. या मोर्चाला हिंसक वळण लागल्यानंतर संतप्त मोर्चेकऱ्यांनी सिन्नर न्यायालय पेटवून दिले होते तर सध्याच्या नगरपरिषदेच्या कार्यालयासमोरील चौकात पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ज्ञानेश्वर विठोबा साठे, अशोक रामभाऊ पगार, चिंतामण रामचंद्र क्षत्रिय, गणपत गंगाधर वासुदेव, अशोक गणपत कवाडे या पाच हुतात्म्यांना वीरमरण आले होते. आज सिन्नर तालुका जो काही आहे तो याच पाच हुतात्म्यांच्या बलिदानामुळे असून त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी दरवर्षी सिन्नरकर येत असल्याचे वायचळे म्हणाले. नामदेव कोतवाल यांनी आभार मानले. तत्पुर्वी नगरपरिषदेने स्मारकाची स्वच्छता केली. बारा वाजून दोन मिनिटांनी नगरपरिषदेने भोंगा वाजवत हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. यावेळी मोर्चात सहभागी असलेले पांडुरंग मुंडे, हरिभाऊ तांबे, मुकेश गुजराथी, पोलिस कर्मचारी अंकुश दराडे, नगरपालिका कर्मचारी ताहीर शेख, सौरभ गायकवाड यांच्यासह नगरपरिषदेचे सेवक, अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# शिवडेकर अन् नगरपालिकेच्या वादात टळला लिकेज काढण्याचा मुहूर्त

### दिवसभर चालले चर्चेचे गुऱ्हाळ, आज पुन्हा जाणार

सिन्नर : प्रतिनिधी

**शिवडे गावाच्या गावठाणातून गेलेली नगरपालिकेच्या कडवा योजनेची जलवाहिनी स्थलांतरीत केल्याशिवाय जलवाहिनीची गळती काढू न देण्याची भूमिका शिवडे ग्रामस्थांनी घेतल्याने गुरुवारी (दि.२४) पोलिसांच्या फौजफाट्यासह लिकेज काढण्यासाठी गेलेल्या नगरपालिकेच्या पथकाला रिकाम्या हाती परतावे लागले.**

दिवसभर केवळ चर्चेचे गुऱ्हाळ सुरू राहिले. त्यामुळे आता पुन्हा आज (दि.२५) फौजफाट्यासह नगरपालिका प्रशासन गळती काढण्यासाठी शिवडेत जाणार असून त्यावर तोडगा निघणार की, सिन्नरकरांना नगरपालिका प्रशासन आणि शिवडे ग्रामस्थांच्या वादात पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. कडवा धरणातून सिन्नर शहरासाठी टाकलेल्या जलवाहिनीला शिवडे येथील एका बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात गळती असून त्यातून दिवसाला किमान ५० ते ६० लाख लिटर पाणी वाया जाते. यावर दि. ५ एप्रिल रोजी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी नगरपालिका सभागृहात बैठक घेऊन तातडीने ही गळती काढण्याच्या सूचना मुख्याधिकारी रितेश बैरागी यांना दिल्या होत्या. यावर पालिका प्रशासनाने सुमारे ६० हजार रुपये



पोलिस बंदोबस्तासाठी मोजून गळती काढण्यासाठी २४ एप्रिलचा मुहूर्त शोधला होता. त्यानुसार नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी दीपक बंगाळ, कार्यालय अधीक्षक कैलास चव्हाण, नगरअभियंता सौरभ गायकवाड, पाणीपुरवठा अभियंता प्रशांत मेश्राम, सोफिया बागल, प्रमोद पाटील, आरोग्य निरीक्षक रविंद्र देशमुख, देवेंद्र शिंदे, विजय वाजे, श्रद्धा आव्हाड, राहुल मुंगसे, गणेश गुंजाळ आदींचे पथक गळती काढण्यासाठीची साधनसामुग्री घेऊन सकाळी ९ वाजता शिवडेत दाखल झाले. मात्र सरपंच प्रभाकर हारक यांच्यासह स्थानिकांनी गावातील गावठाण हद्दीतून गेलेली जलवाहिनी अगोदर शिफ्ट करा, त्यानंतरच लिकेज काढा, अशी भूमिका घेतली.

नगरपालिकेने मंजूर आराखड्याप्रमाणे जलवाहिनीचे काम न करता परस्पर सोयीनुसार गावठाणातून जलवाहिनी टाकल्यामुळे भविष्यात ती फुटल्यास नागरी वस्तीत धोका उद्भवू शकतो. त्यामुळे त्यावर उपाययोजना करावी, अशी भूमिका घेत आराखड्याप्रमाणे जलवाहिनी झाली असेल तर कागदपत्रे दाखवा, असा आग्रह धरला. माजी नगराध्यक्ष विठ्ठलराजे उगले, पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनीही नगरपालिका प्रशासन आणि शिवडे ग्रामस्थ यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो अयशस्वी ठरला. दिवसभरात त्यातून कुठलाही तोडगा निघाला नाही. त्यामुळे काम न करताच पालिकेच्या पथकाला रिकाम्या हाताने परतावे लागले.

#### बैठकांचा फार्स

शिवडे गावातील जलवाहिनी स्थलांतर करण्यासंदर्भात यापूर्वी नगरपालिकेत ना. कोकाटे यांच्या उपस्थितीत बैठका झाल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांकडे झालेल्या बैठकीत जीवन प्राधिकरणाने यासंदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. मात्र, त्यावर अद्याप कारवाई होत नसल्याने जोपर्यंत स्थलांतरणासंदर्भात नगरपालिका लेखी देत नाही तोपर्यंत गावातील बंधाऱ्यात असलेली गळती काढू न देण्याची भूमिका शिवडेकरांनी घेतली आहे.



« खरेदी-विक्री संघातर्फे आहेर यांचा सत्कार « पान ६

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



» शेतकऱ्यांचा जिल्हा बँकेविरोधात एल्गार » पान ६

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५


## महत्त्वाचे




### दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ चौकमंडईतून कँडल मार्च

**जुने नाशिक :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ येथील चौकमंडई ते महात्मा फुले पुतळा (बागवानपुरा) पर्यंत शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे अध्यक्ष अजीज पठाण यांच्या नेतृत्वाखाली काल (दि.२४) सायंकाळी कँडल मार्च काढण्यात आला होता. यावेळी मुर्दाबाद मुर्दाबाद, पाकिस्तान मुर्दाबाद, मुर्दाबाद मुर्दाबाद दहशतवाद मुर्दाबाद, हिंदुस्तान जिंदाबाद, हिंदुस्तान जिंदाबाद, आतंकवाद मुर्दाबाद अशा घोषणा देण्यात आल्या. दरम्यान, हा हल्ला केवळ पर्यटकांवर नसून, काश्मीरमधील तरुणांना मिळालेल्या रोजगारावर आहे, अशी भावना अजीज पठाण यांनी व्यक्त केली. रॅलीत मुश्ताक शेख, ज्ञानेश्वर काळे, माजिद पठाण, रफिक साबीर, फैज शेख, रफिक सादिक शेख, नादिर पठाण, अकील खान, आवेश चाबुकस्वार, रफिक शेख, नदीम शेख, असिफ मुलानी, बबलू शेख, वसिम शेख, ईमरान खान आदी सामील होते.

### सरगम थिएटर्सतर्फे रविवारी अल्टिमेट बॉलिवूड ड्यूएट्स

**नाशिक :** सरगम म्युझिक अकॅडमीच्या रौप्यमहोत्सवी वर्षानंतर सरगम थिएटर्सतर्फे रविवारी 'अल्टिमेट बॉलिवूड ड्यूएट्स' अर्थात हिंदी चित्रपटसृष्टीतील अविस्मरणीय युगुलगीतांची मैफल आयोजित करण्यात आली आहे. रविवारी (दि.२७) सायंकाळी ६ वाजता प.सा. नाट्यगृहात ही विनामूल्य मैफल होणार आहे, अशी माहिती गायक, संगीत संयोजक नंदकुमार देशपांडे यांनी दिली. घन:श्याम जाधव, सुरेंद्र जालिहालकर, अजय पाटील, संतोष कराळे, अमित गुरव तसेच गायिका अपर्णा माडीवाले, दीपाली घाटे, प्राजक्ता गायधनी, भाग्यश्री गायधनी, मयूरी मुर्डेश्वर लोकप्रिय युगुलगीते सादर करतील. त्यांना वाद्यसंगीताची साथसंगत प्रशांत महाले, अनोष आढाव, अभिजित शर्मा, फारुख पिरजादे, गौरव तांबे, बाबा सोनवणे हे कलाकार करणार आहेत. दिनेश गोविल निवेदन करतील तर पवन वंजारी ध्वनिसंयोजन करणार आहेत.

# त्र्यंबकनगरीत उटीच्या वारीला जमला वैष्णवांचा मेळा

## मस्तकी नाथांची प्रसादरूपी उटी लावत भाविक कृतकृत्य







**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

**मस्तकी नाथांची प्रसादरूपी उटी लावत भाविक कृतकृत्य झाले. काल वरुथिनी एकादशीला श्रीक्षेत्र त्र्यंबकनगरीत संत निवृत्तिनाथ महाराजांच्या संजीवन समाधीला चंदनाच्या उटीचे लेपण करण्यात आले. उटीच्या वारीमुळे त्र्यंबकनगरी पुन्हा एकदा गजबजून गेली होती.**

काल दुपारी दोनच्या सुमारास नाथांच्या समाधीला चंदनाचा लेप म्हणजेच उटी लावण्यात आली. यावेळी सभामंडपात भजन, कीर्तनात वारकरी दंग झाले होते. खा. प्रकाश भगरे, मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष ॲड. सोमनाथ घोटेकर, पुजारी हभप जयंत महाराज गोसावी, महामंडलेश्वर डॉ. रघुनाथ महाराज फरशीवाले बाबा, संस्थानच्या माजी अध्यक्षा ह.भ.प. कांचनताई जगताप, विश्वस्त ह.भ.प. नवनाथ गांगुर्डे, नारायण मुठाळ, वारकरी महामंडळाचे मार्गदर्शक पुंडलीक थेटे यांसह सर्व विश्वस्त उपस्थित होते. गुरुवारी पहाटेपासून ते रात्री ११ वाजेपर्यंत संत निवृत्तिनाथ मंदिर परिसर भक्तांनी फुलला होता. कुशावर्तावर पहाटेपासून स्नानासाठी गर्दी उसळली होती. ब्रह्मगिरी पर्वतावर आणि ब्रह्मगिरी प्रदक्षिणेला जाणारे भाविक लक्षणीय होते. मंदिर आणि परिसरात दानशूर भक्तांनी उपवासाच्या फराळाचे पदार्थ वाटप केले. तसेच आरोग्य शिबिरही भरविण्यात आले होते. रात्री अकराच्या सुमारास संत निवृत्तिनाथांच्या संजीवन समाधीवरील उटी विधिवत उतरवण्यात आली आणि वारकरी भक्तांना रांगेने प्रसाद म्हणून वाटप करण्यात आली. दोन दिवसांपासून नाथांच्या चरणी लीन झालेले भक्त मस्तकी नाथांची प्रसाद स्वरूपातील उटी मस्तकावर लावून कृतार्थ भाव घेऊन माघारी फिरले.

# नागरिकांसाठी आणखी चार ठिकाणी 'आपला दवाखान्या'ची सोय

## उपमुख्यमंत्री पवारांच्या हस्ते आज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे लोकार्पण

**नाशिक : प्रतिनिधी**

महापालिकेकडून शहरात १६ ठिकाणी आपला दवाखाना सुरू केले असून, नागरिकांवर येथे प्राथमिक उपचार केले जातात. दरम्यान, शुक्रवारी (दि.२५) नाशिकरोड, विडी कामगारनगर, कोणार्कनगर, मानकरनगर, मखमलाबाद अशा चार आपला दवाखान्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सकाळी आठ वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उद्घाटन केले जाणार आहे. यावेळी लोकप्रतिनिधींसह मनपा आयुक्त मनीषा खत्रींसह अधिकारी उपस्थित असणार आहेत.

सकाळी ७ ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते रात्री १० या वेळेत आपला दवाखाना सुरू असतो. एक वैद्यकीय अधिकारी, एक परिचारिका, एक फार्मासिस्ट आणि एक बहुद्देशीय सेवक आणि एक सुरक्षारक्षक अशा पाच जणांची टीम कंत्राटीवर नियुक्त करण्यात आले आहेत. शहरातील गरीब रुग्णांसाठी मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावेत, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आपला दवाखाना सुरू केला आहे. महापालिकेचे सहाही विभागात आरोग्य केंद्र असले तरी आरोग्य यंत्रणेवर ताण पडत असल्याचे चित्र होते. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या संकल्पनेतून राज्यभरात स्व. बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्यात आला. राज्यात ७०० दवाखाने सुरू केले जाणार होते. नाशिकमध्ये २५ ठिकाणी आपला दवाखाना उभारले जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात १६ दवाखाने सुरू केल्यानंतर आणखी चार रुग्णालये शुक्रवारी नागरिकांसाठी उभारले जाणार आहे. किरकोळ मोफत औषधोपचार, टेली कन्सल्टेशन महिन्यातून निश्चित दिवशी नेत्र तपासणी, एक्स-रेसाठी संदर्भ सेवा, गर्भवती मातांची तपासणी व लसीकरण केले जाते. यापूर्वी चार केंद्रांतील डॉक्टरांनी काम सोडले असता तेथे नव्याने डॉक्टरांना तेथे नियुक्ती दिली जाणार आहे.

सुरू झालेल्या आपला दवाखान्यांची यादी खालीलप्रमाणे

कोणार्कनगर, मखमलाबाद, विडी कामगारनगर, नाशिकरोड, लवाटेनगर नाशिकरोड, भामरे हाऊस गोविंदनगर, पिंपळगाव खांब, मोती चौक पवननगर, माळी गल्ली वडाळागाव, जमाई मंजिल वडाळानाका, सातभाई संकुल दसक, शास्त्रीनगर गोरेवाडी, मल्हार खान, चुंचाळेगाव, सुदर्शन बंगलो कामटवाडे, कृष्णाई मंडई, साईग्राम अंबड लिंकरोड, द्वारका, द्वारका सर्कल सह्याद्री हॉस्पिटलजवळ.

# आराधी वंशजांच्या शिवपिंडीला चंदनाचा लेप

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**



संत निवृत्तिनाथ महाराज समाधीपासून दक्षिण बाजूस सुमारे १० फुटांवर असलेल्या पाच शिवपिंडीला येथील आराधी परिवाराने चंदनाचे लेपन केले. या सर्व शिवपिंडी त्र्यंबकेश्वर मंदिरात नित्य प्रदोष पूजा करणारे आराधी परिवाराच्या पूर्वजांच्या आहेत. पौष वद्य एकादशीला सकाळी ११ वाजेच्या सुमारास माजी नगरसेविका मंगला आराधी आणि नित्य प्रदोष पूजक उल्हास आराधी यांनी विधिवत पूजा केली आणि चंदनाची उटी चढवली.

संत निवृत्तिनाथ मंदिराच्या पाठीमागच्या बाजूस असलेल्या जागेत सुमारे १० फूट अंतरावर दगडी चौथरा आहे. समान अंतरावर पाच शिवपिंडी आहेत. या सर्व शिवपिंडीच्या खाली येथील आराधी परिवाराच्या पूर्वजांच्या समाधी आहेत. त्यातील मध्यमागी मोठी शिवपिंड गंगाधर महाराज आराधी, पूर्वेस महादेव महाराज व दाजी महाराज तर पश्चिमेला बाप्पा महाराज आणि गणपती महाराज आराधी अशा आहेत.

# चौकशीच्या भीतीमुळे मलनिस्सारण निविदा पुढे ढकलली?

## शासनाला वस्तुनिष्ठ अहवाल पाठवला जाणार

**नाशिक : प्रतिनिधी**

मनपाने तिजोरीत खडखडाट असताना पाच मलनिस्सारण प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले असून, त्यासाठी तेराशे कोटी रुपये खर्च येईल. पैसे नसल्याने पीपीपीफ तत्त्वावर हे प्रकल्प उभारले जाणार आहे. त्या विरोधात शिवसेना महानगरप्रमुख प्रवीण तिदमे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली होती.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या वादग्रस्त प्रक्रियेच्या चौकशीचे आदेश देत आयुक्तांकडून वस्तुनिष्ठ अहवाल मागवला, मात्र तरीही पालिका निविदा राबवण्याच्या मशगुलीत असल्याचे चित्र होते. मात्र याप्रकरणी पुढे चौकशीचे घोडे मागे लागायला नको म्हणून सद्यस्थित निविदा उघडण्याचे टाळले जात आहे. शासनाला वस्तुनिष्ठ अहवाल पाठवल्यावरच पुढील प्रक्रिया होईल, असे बोलले जात आहे.

तेराशे कोटींच्या वादग्रस्त मलनिस्सारण निविदा प्रक्रियेत तीन कंपन्यांनी स्वारस्य दाखवले. मागील सोमवारी (दि.२१) निविदा खोलण्यात येणार होत्या. परंतु, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या वादग्रस्त प्रक्रियेच्या चौकशीचे आदेश देत आयुक्तांकडून वस्तुनिष्ठ अहवाल मागवला आहे.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या सर्व प्रकरणाची सविस्तर माहिती व वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश मनपा आयुक्त खत्री यांना दिले. पत्र दहा दिवसांपूर्वी प्राप्त झाल्याचे सांगत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. परंतु आता मनपा आयुक्तांवर चौकशी अहवाल सादर करण्याचा दबाव असून, त्या अगोदरच निविदा खोलली तर उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या आदेशाचे उल्लंघन होईल व कारवाईला सामोरे जावे लागू शकते. ते पाहता मनपाने बॅकफूटवर जाणे पसंत करत निविदा खोलण्याअगोदर अहवाल पाठवण्यावर काम सुरू झाले आहे. सुरुवातीला ही निविदा जागतिक स्तरावरील होती.

> वस्तुनिष्ठ अहवाल तयार करायचे काम सुरू आहे. मलनिस्सारण निविदा लवकरच खोलली जाईल. चौकशीचे पत्र दहा दिवसांपूर्वी प्राप्त झाले.
> **-रवींद्र धारणकर,** अधीक्षक अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मनपा

मात्र, नंतर त्यातील नियमांमध्ये आंतरराष्ट्रीय कंपन्या बसूच शकत नाही. जॉइंट व्हेंचरदेखील यात सहभागी होऊ शकत नाही, अशी अट जाणीवपूर्वक टाकल्याचा आरोप तिदमे यांनी करत ही प्रक्रिया रद्दची मागणी त्यांनी लावून धरली आहे.

### भाजयुमोचा आज मशाल मार्च

**नाशिक : प्रतिनिधी**

काश्मीरमधील पहलगाम येथे २७ हिंदू पर्यटकांची धर्म विचारून करण्यात आलेली निर्घृण हत्या ही मानवतेला काळिमा फासणारी क्रूर घटना असून, या घटनेचा तीव्र निषेध करत भारतीय जनता युवा मोर्चा, नाशिक महानगर आणि भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चा, नाशिक महानगर यांच्यातर्फे आज शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता अशोक स्तंभ ते हुतात्मा स्मारक, सीबीएस येथे मशाल मार्चचे आयोजन करण्यात आले आहे. या मार्चद्वारे नाशिकमधील कार्यकर्ते आणि पदाधिकारी निष्पाप हिंदू पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करतील आणि देशातील वाढत्या आतंकवादाच्या घटनांचा निषेध करतील. आयोजकांनी सर्व नागरिकांना, कार्यकर्त्यांना आणि पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. या मशाल मार्चमध्ये नाशिकमधील विविध शाखांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.




आरओसी-2025-26/क्र-5/C३६५


# पाण्याचे करूया संवर्धन, वसुंधरेचे होईल रक्षण

## धरणांच्या दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन; 'जलसंपदा'चा उपक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**

पाण्याचे करू या संवर्धन, वसुंधरेचे होईल रक्षण, असा मंत्र देत धरणांच्या दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन जलसंपदा विभागाच्या सिंचन भवनमध्ये भरविण्यात आले आहे. ३० तारखेपर्यंत प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून, भेट देण्याचे आवाहन जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे.




पालखेड पाटबंधारे विभाग नाशिक, सिंचन प्राधिकरणाने सिंचन भवन यांनी आयोजित केलेल्या या प्रदर्शनात राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून जल पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. पाणी हे जीवन आहे म्हणून पाणी जपले पाहिजे, काटकसरीने वापरले पाहिजे. सिंचनाबाबत शेतकरी किंवा जे लाभधारक आहेत त्यांची जनजागृती करण्यासाठी हा ऐतिहासिक ठेवा ब्रिटिशकालीन नांदूरमध्यमेश्वर धरण ते अलीकडील धरणांचे फोटो प्रदर्शनात लावण्यात आले आहे. आताच्या बंधारे बांधताना अत्याधुनिक यंत्रांच्या सहाय्याने वेळ, मनुष्यबळ वाचवत कामे केली जातात. त्याकाळी तुटपुंज्या सामग्रीत कामे केली आहे. जास्तीत जास्त मनुष्यबळ वापरून धरण, कालव्यांची निर्मिती केली आहे. या सर्व गोष्टी आताच्या पिढीला माहिती व्हाव्यात, या उद्देशाने हे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. गेल्या दहा -बारा दिवसांत शेकडो नागरिकांनी प्रदर्शनास भेट दिली आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ आणि अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता वैभव भागवत यांच्या उपस्थितीत झाले. या चित्रप्रदर्शनात गंगापूर, केळझर, करंजवण, वाघाडी, नागासाक्या, पुनंद, माणिकपुंज, ओझरखेड, पुणेगाव, तिसगाव, गिरणा, पालखेड, दारणा, नांदूरमध्यमेश्वर, कडवा, भोजापूर आदी लहान-मोठ्या धरणांचा समावेश करण्यात आला आहे.

> जल पंधरवड्यात भरविण्यात आलेल्या धरणे आणि कालव्यांच्या ऐतिहासिक आणि छायाचित्रांच्या प्रदर्शनातून पुढील पिढीला पाण्याचे महत्व कळावे यासाठी प्रदर्शन भरविण्यात आले असून, आतापर्यंत सामान्य नागरिकांसह सिंचनसंबंधित अधिकारी, कर्मचारी, शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाला भेट दिली आहे.
> **- अविनाश वाघमारे,** वरिष्ठ लिपिक

> ज्यावेळी धरणे, कालवे बांधली जात होती. त्यांचे बांधकाम, व्यवस्थापन यांची माहिती करून घेण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त आहे. आम्हाला दुर्मीळ छायाचित्रांतून माहिती मिळाली. आमच्यासाठी आमच्या विभागाचा इतिहास नव्याने उलगडला आहे. जलसंपदाच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांसह सामान्यांना माहिती मिळाली.
> **- स. दे. रावल,** सहाय्यक मुख्य अभियंता



« 'नामको'च्या चेअरमनपदी हेमंत धात्रक
« पान ३


# नाशिक आज गांवकरी





« डॉ. दत्ता विघावे यांची खरीखुरी गगनभरारी « पान ३

■ नाशिक, शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे ▶▶▶▶



### रोटरी क्लब व स्नेहालयतर्फे 'डिमेन्शिया'वर मार्गदर्शन

**नाशिक : प्रतिनिधी** रोटरी क्लब व स्नेहालयतर्फे डिमेन्शियावर मार्गदर्शन करण्यात आले. जगात दर ३ सेकंदाला एका व्यक्तीला डिमेन्शियाचे निदान होते. आज हा विकार ज्येष्ठ नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढतो आहे. आता तर तो प्रौढ आणि तरुणांमध्येसुद्धा दिसत आहे. त्याकरिता, तो होऊ नये म्हणून आणि झाला तर काय उपाय करावेत? याबाबत डॉ. गौरी आचार्य-कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. मेमरी क्लब, पारिजातनगर, नाशिक यांनी मेमरी गेम्स घेतले. संगीता पत्की, सुजाताताई खरे, स्वाती फाळके, सुवर्णाताई महाबळ, अरुण अडावदकर यांच्यासह ७० नागरिक उपस्थित होते. आभार सचिव शिल्पा पारख यांनी मानले.

### विनाशुल्क ध्यान विज्ञान कार्यशाळा

**नाशिक : प्रतिनिधी** ध्यानसाधनेच्या माध्यमातून उत्तम आरोग्य आत्मिक विकास आणि आनंदमय जीवनाचा अनुभव घेण्याची कला शिकण्यासाठी रविवार, दि. २७ एप्रिल रोजी दुपारी ३ ते सायं. ८ या वेळेत नाशिकमध्ये ध्यान कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृह केटीएचएम कॉलेजशेजारी, गंगापूर रोड येथे ही कार्यशाळा होणार आहे. ब्रह्मर्षी पितामह पत्रीजी यांच्या चेतनेच्या सान्निध्यात आणि ध्यानातील अनुभवी मास्टर दीप्ती नादेला यांच्या मार्गदर्शनाखाली ध्यान कार्यशाळा होणार आहे. पूर्णपणे विनामूल्य असलेल्या या कार्यक्रमात शाकाहारी जेवण, ध्यानाचे आणि पिरॅमिडचे महत्त्व तसेच त्यामुळे होणाऱ्या सकारात्मक परिणामांची माहिती यावेळी ध्यानप्रेमींना मिळणार आहे.

### 'स्वाधार' योजनेसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत

**नाशिक : प्रतिनिधी** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'स्वाधार' योजना राबविण्यात येत आहे. मागील वर्षी स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ या वर्षासाठी नूतनीकरण करण्यास अर्जासाठी ३० एप्रिल २०२५ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर अर्ज विहित मुदतीत सादर करावेत, असे आवाहन समाजकल्याण नाशिकचे सहाय्यक आयुक्त देवीदास नांदगावकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. पोर्टलवर ऑनलाइन अर्ज भरून त्या अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, नाशिक, सामाजिक न्याय भवन, बी विंग, नासर्डी पुलाजवळ, नाशिक-पुणे रोड, नाशिक कार्यालयात तत्काळ सादर करावेत. तसेच यापूर्वी स्वाधार योजनेचा अर्ज करणाऱ्या परंतु अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयात जमा न करणाऱ्या विद्यार्थ्यांनी व ज्या विद्यार्थ्यांचा ऑनलाइन अर्ज त्रुटी पूर्तता करून अर्ज २ मे २०२५ पर्यंत कार्यालयात जमा करावेत, असे आवाहनही सहाय्यक आयुक्त नांदगावकर यांनी केले आहे.




### युवा ऊर्जा फाउंडेशनतर्फे पाकिस्तानचा निषेध

**नाशिक : प्रतिनिधी** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना छत्रपती शिवाजीनगर, सातपूर, नाशिक येथे युवा ऊर्जा फाउंडेशनच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. पाकिस्तानी दहशतवाद्यांचा निषेध करण्यात आला. त्याप्रसंगी विद्यार्थी, पालक, शिक्षक, युवा ऊर्जा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष अमोल दिनकर पाटील, माजी नगरसेविका लता दिनकर पाटील, माजी नगरसेवक रवींद्र धिवरे, युवा ऊर्जा फाउंडेशनचे सदस्य उपस्थित होते.

### खोडेनगरला रविवारी हज प्रशिक्षण

**वडाळा गाव : प्रतिनिधी** महाराष्ट्र हज कमिटी आणि दावत-ए-इस्लामी इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिकमधील हसन मशीद येथे २०२५ मध्ये हजला जाणाऱ्या भाविकांसाठी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले असून, प्रशिक्षण सत्र रविवार, २७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत हसन मशीद, खोडेनगर, नाशिक येथे आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षण सत्रांत येणाऱ्या २०२५ च्या हजच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन करण्यात येईल. ज्यामध्ये इहराम घालण्याची पद्धत, हजचे अरकान, प्रवासादरम्यानच्या आवश्यक तयारी आणि सुरक्षिततेच्या सूचना आदींचा समावेश असेल. हज यात्रेवर जाणाऱ्या सर्व भाविकांनी या प्रशिक्षण सत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन शहराचे दावत-ए-इस्लामीचे सय्यद इरफान व जाकीर पठाण यांनी केले आहे.

### शिखरेवाडीत ब्रह्मोत्सवानिमित्त शोभायात्रा



**नाशिकरोड : प्रतिनिधी** शिखरेवाडीतील बालाजी देवस्थानतर्फे वार्षिक ब्रह्मोत्सवानिमित्त परिसरातून शोभायात्रा काढण्यात आली. ब्रह्मोत्सवात पंचामृत, अभिषेक, आचार्य महंत कालिकानंदजी महाराज यांचे प्रवचन झाले. तसेच पुण्याहवाचन, पंचगव्य आराधना, ध्वजारोहण व अन्य धार्मिक विधी झाले. सायंकाळी शोभायात्रा व बालाजी मूर्ती ग्राम प्रदक्षिणा झाली. शोभयात्रेला बालाजी मंदिरापासून प्रारंभ झाला. नंदन पार्क, गंधर्वनगरी, बिटको फॅक्टरी, एलआयसी रोड आदी परिसरातून शोभायात्रा नेण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजन बालाजी फाउंडेशनचे अध्यक्ष कैलास मुदलीयार, विनायक उपाध्ये, उपाध्यक्ष रोहित पानसरे, योगेश माळी, प्रसांक तारे, कार्याध्यक्ष प्रदीप मालेगावकर, सरचिटणीस नितीन कुलकर्णी, वीरेंद्र महाले, पंकज कलंत्री, गिरीश मुदलीयार, दत्तात्रेय कुलकर्णी, प्रदीप देशपांडे, सुरेश चव्हाण, मिलिंद भट, शिरीष गोसावी, मुकेश चांडक, सुनील काळे, नरेंद्र कैकाडी, अनिरुद्ध हदिगोळ, रवि रामनानी, नितीन गायकवाड, जयेश पटेल, मोहन बोकील, दिनकर कुलथे, सुरेश जयस्वाल, संतोष जोशी, भास्कर सातव, विजय देसाई, निखिल बायस, निरंजन गुंडाळे, कमल मूर्ती, प्रवीण पांडे, महेंद्र कुलकर्णी यांनी केले.

# मखमलाबाद ग्रीन फील्ड योजना अखेर रद्द

## राज्य शासनाचा निर्णय; शेतकऱ्यांच्या लढ्याला यश

**नाशिक : प्रतिनिधी**

**मखमलाबाद शिवारातील सुमारे ७५३ एकर जागेवर हरित क्षेत्र विकासांतर्गत ग्रीन फील्ड योजना रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यास स्थानिक शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध होता. स्मार्ट सिटी कंपनीकडून तसा प्रस्ताव ठेवण्यात आला, मात्र याविरोधात शेतकरी कृती समितीने कडाडून विरोध केला होता. याची दखल शासनाने घेत मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत नगररचना योजना रद्द करण्याचा निर्णय बुधवारी (दि.२३) घेण्यात आला. शासनाच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.**



या योजनेस नाशिक मखमलाबाद शेतकरी कृती समितीमार्फत मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करण्यात आली. त्यानुसार उच्च न्यायालयाने पुढील कार्यवाहीस स्थगिती दिलेली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी कृती समितीने मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करावा, अशी विनंती केली. त्या अनुषंगाने नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता यांनी बैठक घेतली. त्यास नगररचना विभागाचे संचालक भदाणे, वैजापूरकर, मनपा आयुक्त मनीषा खत्री, स्मार्ट सिटी कंपनी सीईओ सुमंत मोरे, शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील, संजय बागूल, उत्तम पवार, सचिन जगताप, पंडित तिडके उपस्थित होते. यावेळी मनपा आयुक्त यांनी शेतकऱ्यांचा विरोध व योजनेस झालेला विलंब बघता या प्रारूप नगररचना योजनेचा प्रस्ताव रद्द करण्याबाबत महासभेचा ठराव पारित करून शासनास त्वरित पाठवण्याचे मान्य केले. सहा वर्षांपासूनचा अन्याय दूर झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत शासनाचे आभार मानले. मुख्यमंत्री यांचे निर्देशानुसार नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता यांच्याकडे बुधवारी बैठक पार पडली. त्यात स्थगितीचा निर्णय देण्यात आला. स्मार्ट सिटीकडून ग्रीन फिल्ड योजनेसाठी सप्टेंबर २०१९ मध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या योजनेस बहुसंख्य शेतकऱ्यांनी विरोध नोंदविलेला होता. तरीसुद्धा सदर प्रारूप नगररचनेचा प्रस्ताव डिसेंबर २०२० मध्ये महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला. मात्र, शेतकऱ्यांचा विरोध असल्याने अखेर याप्रकरणी नगररचना रद्दचा निर्णय घेतला. यापूर्वी २०२२ मध्ये माजी खासदार हेमंत गोडसे यांच्यासह भाजपच्या पदाधिकाऱ्यांसह मखमलाबाद शेतकरी कृती समितीने तत्कालीन आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांची भेट घेत आक्रमक पवित्रा घेतला होता.



# आतंकवादी हल्ल्याचा मुस्लिम समाजातर्फे निषेध

## नॅशनल उर्दू कॅम्पसमध्ये रॅली

**जुने नाशिक : वार्ताहर**

जम्मू-काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्याचा येथील मुस्लिम समाजातर्फे निषेध करण्यात आला. शहरातील मुस्लिम बांधवांचे धर्मगुरू तथा खतीब-ए-शहर हाफिज हिसामुद्दीन अशरफी यांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे. नॅशनल उर्दू कॅम्पसमध्ये काल (दि.२४) दुपारी विद्यार्थी व कर्मचारी यांची निषेध रॅली काढण्यात आली होती. आतंकवादी हल्ला करणे, या कृत्याला इस्लाम धर्मात अजिबात जागा नाही. निष्पाप लोकांना जीवे ठार मारणे, हे धर्माला मान्य नाही, म्हणून मी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध करीत असल्याचे सुन्नी मर्कजी सीरत कमिटी तथा समस्त मुस्लिम समाजातर्फे खतीब-ए-शहर हाफिज हिसामुद्दीन अशरफी यांनी सांगितले. दरम्यान, सारडा सर्कल येथील यूज नॅशनल कॅम्पसमध्ये निषेध रॅली काढण्यात आली. यावेळी विद्यार्थी यांनी हातात प्ले कार्ड घेऊन या हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. रॅलीमध्ये मुले व मुलींचा सहभाग होता. दरम्यान, नॅशनल कॅम्पस व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष हाजी बबलू पठाण, उपाध्यक्ष सोहेल शेख, सचिव प्रा. जाहीद शेख, सहसचिव एजाज काजी, खजिनदार गौसनूर खान, कार्यकारी सदस्य ॲड. बाबा सय्यद, सलीम सय्यद, प्राचार्य तौसिफ शेख, मुख्याध्यापिका मुसर्रत शेख, उपप्राचार्य डॉ. नुरे इलाही शाह आदींनी या घटनेचा निषेध व्यक्त करून संताप व्यक्त केला.

# ठाकरे गटाकडून पाकच्या ध्वजाची होळी; पहलगाम हल्ल्याचा निषेध




**नाशिक : शिवसेना ठाकरे गटातर्फे पहलगाम येथील घटनेचा निषेध करताना सुनील बागुल, सुधाकर बडगुजर, दत्ता गायकवाड, विनायक पांडे, डी.जी. सूर्यवंशी, विलास शिंदे, वसंत गिते, बाळासाहेब पाठक, केशव पोरजे, भारतीताई ताजनपुरे आदी.**

**नाशिक : प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये पोलिसांच्या गणवेशात आलेल्या दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांवर बेछूट गोळीबार केला. धर्म विचारून गोळ्या घातल्या. या क्रूर आणि अमानुष हल्ल्याचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने निषेध करत शालिमार चौकात आंदोलन करत पाकिस्तानच्या ध्वजाची होळी केली. पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला.

मुर्दाबाद...मुर्दाबाद पाकिस्तान मुर्दाबाद, देश के इन गद्दारोंको, गोली मारो सालों को, राजीनामा द्या, अमित शहा राजीनामा द्या आदी घोषणा देण्यात आल्या. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी उपस्थित शिवसैनिकांनी केली. आंदोलनात शिवसेना उपनेते सुनील बागूल, उपनेते सुधाकर बडगुजर, सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, राज्य संघटक विनायक पांडे, शिवसेना जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, महानगरप्रमुख विलास शिंदे, माजी आमदार वसंत गिते, लोकसभा संघटक बाळासाहेब पाठक, कोअर कमिटी सदस्य केशव पोरजे, भारतीताई ताजनपुरे, माजी जिल्हाप्रमुख कारभारी आहेर, उपजिल्हाप्रमुख देवानंद बिरारी, सचिन मराठे, भैया मणियार, निवृत्ती लांबे, गुलाब भोये, कन्नू ताजणे, तालुकाप्रमुख राजेंद्र नाठे, विधानसभा प्रमुख राहुल दराडे, महानगर संघटक सचिन बांडे, माजी उपमहापौर प्रथमेश गिते, शिवसेना पदाधिकारी मसूद जिलानी, शैलेश सूर्यवंशी, योगेश गाडेकर, चंदू मानभव, सागर कोकणे, माजी नगरसेवक प्रशांत दिवे, संतोष गायकवाड, उत्तम कोठुळे, अंबादास ताजनपुरे, महिला आघाडी पदाधिकारी स्वाती पाटील, कीर्ती निरगुडे, चित्रा ढिकले, शोभा पवार, रंजना थोरवे, शोभा वार्डे, शोभा दोंदे, माधुरी पाटील, मीना देवकर यांसह शिवसेना, अंगीकृत संघटना पदाधिकारी यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ आदरांजली सभा

**नाशिक : प्रतिनिधी**

काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर अतिरेक्यांनी केलेल्या गोळीबारात २६ निरपराध नागरिक मृत्युमुखी पडले. अनेक जण जखमी झाले आहेत. या घटनेचा संविधानप्रेमी नाशिककर व हुतात्मा स्मारक समिती नाशिक यांच्या वतीने गुरुवारी हुतात्मा स्मारक नाशिक येथे निषेध व्यक्त करण्यात करण्यात आला. मेणबत्ती लावून आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी विजय राऊत, राजू देसले, मिलिंद रानडे, ॲड. प्रभाकर वायचळे, अजमल खान, मीनाज मिर्झा, तल्हा शेख, विजय बागूल, समाधान बागूल, डॉ. मिलिंद रानडे, प्राजक्ता कापडणे, मुक्ता कावळे, ए काझी, निशिकांत पगारे, योगेश कापसे, ॲड. निझाम काझी, पद्माकर इंगळे, चेतन पनेर, किरण काळे, राजेश म्हसदे, जयवंत खाडतले, सचिन मालेगावकर, ॲड. नीलेश सोनवणे, अब्दुल शेख, ॲड. कृष्णा शिरसाठ आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील पर्यटकांसाठी उपमुख्यमंत्री शिंदेंचा पुढाकार

## थेट विमानाची तिकिटे दिली उपलब्ध करून

**नाशिक : प्रतिनिधी**

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर नाशिक शहरासह जिल्ह्यातील अनेक पर्यटक श्रीनगर येथे अडकले होते. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील श्रीनगर येथे गेले होते. त्यांना नाशिकमधील पर्यटकांची माहिती मिळताच त्यांनी पुढाकार घेऊन या पर्यटकांची सुखरूप नाशिककडे पाठवणी केली.

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर महाराष्ट्रातील अनेक पर्यटक अडकले होते. या कठीण प्रसंगी उपमुख्यमंत्री व शिवसेना नेते एकनाथ शिंदे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी आणि नाशिक महानगरप्रमुख प्रवीण (बंटी) तिदमे, शिवसेना विद्यार्थी सेना जिल्हाप्रमुख किरण फडोळ यांनी पुढाकार घेत अडकलेल्या सर्व कुटुंबीयांना सुखरूप परत आणण्यात शिवसेनेच्या मदतकार्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

सुरक्षित परतलेले नागरिक : रवींद्र दराडे, दीपाली दराडे, श्रुतिका दराडे, कृतिका दराडे, रोहिदास वामन फडोळ, स्वाती फडोल, राशी फडोळ, श्रीश फडोळ, कांचन फडोळ, शौर्य फडोळ, स्वप्नील लक्ष्मण मणकर, पूजा मणकर, शौर्य मणकर, पार्थ मणकर, ज्ञानेश्वर गाटकल, वैष्णवी गाटकल, श्लोक गाटकल, आनंद डारगुडे आदींसह पर्यटक श्रीनगर येथे अडकले होते. दरम्यान, या नागरिकांना मदतकार्याबद्दल सर्व कुटुंबीयांनी उपमुख्यमंत्री शिंदे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी आणि प्रवीण तिदमे यांचे आभार मानले. संकटाच्या काळात आपला माणूस आपल्या सोबत उभा आहे, अशी भावना व्यक्त करण्यात आली.



❛ आपण कुटुंबीयांसह मित्रपरिवारासमवेत रविवारी येथे आलो होतो. परंतु, दहशतवादी हल्ला झाल्याचे समजताच आम्ही पुन्हा नाशिककडे जाण्याचा निर्णय घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आम्ही येथे अडकल्याचे समजताच त्यांनी स्वत: येथे भेट दिली व नाशिकला जाण्याची सर्वांची व्यवस्था केली.

**-किरण फडोळ,** जिल्हाप्रमुख, भारतीय विद्यार्थी सेना, नाशिक

# अमरनाथ, काश्मीरची तीस टक्के बुकिंग रद्दची शक्यता

## पहलगाम हल्ल्याचा परिणाम; यात्रेकरू नोंदणीतही घट

**नाशिक : प्रतिनिधी**

पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यानंतर जम्मू- काश्मीर, अमरनाथ, वैष्णोदेवी आदी पर्यटनावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पहलगाम घटनेपूर्वी अमरनाथ यात्रेसाठी शहरातील काही बँकांमध्ये बुकिंगसाठी यात्रेकरूंची झुंबड उडाली होती. व्यवस्थापनावर भार आल्याने काही दिवस गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अमरनाथची यात्रा जूनमध्ये असली तरी बुकिंग अगोदर करावे लागते. परंतु पहलगामच्या घटनेनंतर बुकिंगवर परिणाम जाणवत असल्याचे चित्र आहे.



यात्रा आयोजकांच्या मते पर्यटनावर थोडाफार परिणाम होऊ शकतो. मात्र, अगोदर बुकिंग केलेल्या पर्यटकांचे आर्थिक नुकसान होणार नाही, अशी माहिती ट्रॅव्हल्स असोसिएशनचे सागर वाकचौरे यांनी दिली.

नियोजन केलेल्या यात्रा, सहलींपैकी ३० ते ४० टक्के रद्द होण्याची शक्यता आहे. वातावरण निवळल्यावर पुन्हा सहली सुरू होतील. सुट्ट्यांचा हंगाम वाया जाऊ नये म्हणून हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर काश्मीर वगळून इतर ठिकाणच्या पर्यटनस्थळांची विचारणा केली जात असून, काश्मीरसाठी बुकिंगचे प्रमाण घटले आहे. त्याऐवजी हिमाचल प्रदेश व इतर थंड, कमी तापमानाच्या ठिकाणांना पसंती दिली जात आहे. दक्षिणेकडील पर्यटनस्थळांची विचारणा होत असल्याचे सहल आयोजकांनी सांगितले.

सहल, यात्रेसाठी जाणाऱ्यांना अतिरिक्त विमान, रेल्वे, हॉटेल बुकिंग रद्द करताना काही प्रमाणात कपात केली जाते. परंतु हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ट्रॅव्हल्स असोसिएशन यांच्यातील पत्रव्यवहारातून कोणत्याही पर्यटकाचे आर्थिक नुकसान होणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे. या परिस्थितीत शासन आणि ट्रॅव्हल्स इंडस्ट्रीने तत्काळ घेतलेले पाऊल पर्यटन क्षेत्रातील विश्वासार्हतेचे लक्षण मानले जात आहे.

❛ पहलगाम घटनेनंतर अमरनाथच्या नोंदणीवर परिणाम जाणवत आहे. पूर्वीइतकी गर्दी होत नाही. यात्रा ३ जुलैपासून नोंदणी सुरू होणार आहे.

**- धीरज वाघ** व्यवस्थापक, जम्मू-काश्मीर बँक

❛ पर्यटकांची सुरक्षितता ही सर्वांत महत्त्वाची असून, त्यांचा आर्थिक हक्क यांची पूर्ण खबरदारी घेतली जात आहे. ग्राहकांच्या हितासाठी सरकार व ट्रॅव्हल्स इंडस्ट्री एकत्र काम करीत आहे.

**- सागर वाकचौरे**
अध्यक्ष, ट्रॅव्हल्स असोसिएशन

### पॅकेजमध्ये वाढ न करता टूर कंपन्यांनी दिली पर्यटनस्थळ बदलण्याची मुभा

पर्यटकांना जम्मू-काश्मीरऐवजी दुसऱ्या पर्यटनस्थळांवर जायचे झाल्यास कुलू-मनाली, सिमला आदींचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या पॅकेजमध्ये वाढ करण्यात आली नसल्याचे टूर कंपन्यांनी सांगितले.

अग्रलेख

# संघर्षाला निमंत्रण

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममधील बैसरन येथे दहशतवाद्यांनी वेचून वेचून पर्यटकांना गोळ्या झाडून ठार मारल्याच्या घटनेचा जगभर निषेध होत आहे. दहशतवाद्यांनी पर्यटकांना ठार मारल्याच्या करुणकहाण्या त्यांच्या नातेवाईकांकडून सांगितल्या जात आहेत. इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि सोशल मीडियावरुन या कहाण्या प्रसारित होत असून, त्या पाहून आणि ऐकून भारतीयांच्या मनात प्रचंड चीड निर्माण होत आहे. पहलगाममधील हल्ला पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी संघटनेने केला असल्याचे स्पष्ट झाले. पाकिस्तानात तळ असलेल्या लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेची शाखा असलेल्या 'दी रेझिस्टन्स फ्रंट' या संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. हल्ला झाल्यानंतर आनंदोत्सवही साजरा करण्यात आल्याने भारतात आणखी चीड निर्माण झाली आहे. या हल्ल्यानंतर भारत सरकार काय भूमिका घेणार? याकडे तमाम भारतीयांचे लक्ष वेधले गेले होते. पहलगाममध्ये २६ पर्यटकांना ठार मारल्यानंतर सरकारने बैठकांवर बैठका घेतल्या आणि त्याच दिवशी पाकिस्तानची राजनैतिक कोंडी करण्याचे निर्णय घेण्यात आले. पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत भारत सोडण्याचा आदेश देण्यात आला. कोणत्याही पाकिस्तानी नागरिकाला भारतात प्रवेश दिला जाणार नाही. मिळणार नाही. सन १९६० च्या सिंधू पाणी करारही स्थगिती देण्यात आली. भारतातील उच्चायुक्तालयातील पाकिस्तानी संरक्षण, लष्करी, नौदल आणि हवाई अधिकाऱ्यांना एका आठवड्यात भारत सोडण्याचा आदेश देण्यात आला. अटारी सीमा बंद करण्यात आली. भारत सरकारने घेतलेल्या निर्णयाने पाकिस्तानच्या उरात धडकी भरली आहे. पण, तसे न दाखवता पाकिस्तान सरकारनेही लागलीच काही निर्णय घेऊन भविष्यातील संघर्षाला निमंत्रण दिले आहे. दहशतवादाला खतपाणी घालणारा देश म्हणून पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय ओळख आहे. या देशाने कितीही आकांडतांडव केले, तरी त्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर फारसा थारा मिळणार नाही. भारताला प्रत्युत्तर म्हणून भारतीय विमानांना पाकिस्तानी हद्दीत प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली आहे. भारताबरोबर झालेल्या सर्व द्वीपक्षीय करारांना स्थगित करण्याचा निर्णय त्या देशाने घेतला आहे. यामध्ये १९७२ च्या सिमला कराराचाही समावेश आहे. पाकिस्तानात असलेल्या भारतीय नागरिकांना एक मेपर्यंत परत जाण्याचा आदेश देण्यात आला आहे. थोडक्यात, पाकिस्तानने भारताला जशास तसे उत्तर देण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये सिंधू पाणी करार आणि सिमला शांतता करार यांची विशेष चर्चा होत आहे. या करारांना स्थगिती दिल्यानंतर दोन देशांत मोठा तणाव निर्माण झाला आहे. त्यातून नवा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. स्वातंत्र्याच्या वेळी भारताची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली तेव्हाच सिंधू आणि तिच्या उपनद्यांतील पाण्यावरुन वाद निर्माण झाला. या वादावर तोडगा म्हणून बऱ्याचदा दोन देशांत बोलणी झाली. अखेर १९६० सिंधू पाणी करार करण्यात आला. सिंधू नदीसह सतलज, व्यास आणि रावी पूर्व उपनद्या निश्चित करण्यात आल्या, तर पूर्व भागात विभाजन करण्यात आले, तर झेलम, चिनाब, सिंधू यांना पश्चिमी नद्या ठरविण्यात आले. पूर्वेकडील नद्यांचे पाणी काही अपवाद सोडल्यास भारत कोणत्याही बंधनांविना वापरू शकतो. पश्चिमेच्या नद्यांचे पाणी पाकिस्तानने घेण्याचे ठरवले. मात्र त्यातील काही नद्यांचे पाणी ठराविक प्रमाणात वापरण्याचा अधिकार भारताला देण्यात आला. त्यामध्ये वीज निर्मिती, शेतीसाठी पाणी वापरण्याची मुभा देण्यात आली. सिंधू करारानुसार मिळणाऱ्या पाण्यावर पाकिस्तानची ८० टक्के शेती अवलंबून आहे. पाणी मिळाले नाही, तर तेथील शेती धोक्यात येणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात आतापर्यंत कारगिलसह पाच युध्दे होऊनही भारताने सिंधू करार स्थगित केला नव्हता. सन २०१९ पुलवामा दहशतवादी हल्ला झाला तेव्हा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सिंधू करार स्थगित किंवा रद्द करण्याची भाषा केली होती. पण, तसे काही झाले नव्हते. पण, पहलगाम हल्ल्यानंतर भारत सरकारने सिंधू करार स्थगित करुन वेगळ्या मार्गाने पाकिस्तानला धडा शिकविण्याचा निर्णय घेतला आहे. भारताच्या या कृतीवर पाकिस्तानने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. सिंधू कराराचे उल्लंघन करणे हे युद्धाचे कृत्य समजले जाईल. तसेच हा निर्णय अवैध आणि भ्याड आहे, असा आरोपही पाकिस्तानने केला आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबावर आमचा अधिकार असून आम्ही कायदेशीररित्या, राजकीयदृष्ट्या आणि जागतिक स्तरावर या अधिकाराचे पूर्ण ताकदीनिशी रक्षण करू, असेही या देशाने म्हटले आहे. पाणी युध्द पेटविण्याची भाषा केली आहे. या कराराविषयी वाद झाल्यास तो परस्पर सहमतीने सुटत नसेल, तर तटस्थ तज्ज्ञाच्या मदतीने कोर्ट ऑफ आर्बिट्रेशनमध्ये (लवाद न्यायालयात) जाण्याचा मार्ग करारात सुचविण्यात आला आहे. त्याचा आधार पाकिस्तानकडून घेण्याची शक्यता आहे. दुसरीकडे पाकिस्तानने सिमला शांतता करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. सन १९७१ च्या युध्दानंतर दोन देशांत हा करार झाला. त्यानुसार काश्मीरमध्ये नियंत्रण रेषा आखण्यात आली. दोन्ही देशांनी परस्परांच्या क्षेत्रात हस्तक्षेप करू नये, असे ठरविण्यात आले होते. इतकेच नाही दोन्ही देशांनी आपसातील वाद द्विपक्षीय चर्चेतून सोडविण्याचे ठरविण्यात आले होते. सिमला करार स्थगित करण्याच्या निर्णयावर भारताची प्रतिक्रिया आली नसली, तरी पाकिस्तानने अनेकदा या कराराचे उल्लंघन केलेले आहे. सिमला करार स्थगित केल्याने पाकिस्तान भारताच्या हद्दीत काही कारवाया करण्याची शक्यता असली, तरी त्या देशाला सडेतोड उत्तर देण्यास भारत सक्षम आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या निर्णयाचा भारतावर फार काही परिणाम होणार नाही. उलट पाकिस्तान आपल्या पायावर धोंडा पाडून घेत आहे. दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या पाकिस्तानात अल कायदा या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या ओसामा बिन लादेन याचा अमेरिकेने खात्मा केला होता. सन २०१९ मध्ये भारताने या देशातील दहशतवादी तळांवर सर्जिकल स्ट्राईक केला होता. तसाच आणखी एक सर्जिकल स्ट्राईक पहलगाम हल्ल्यानंतर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना धडा शिकविण्याचा निर्धार केला आहे. युध्द करुन पाकिस्तानला कायमचा धडा शिकविण्याची भारतीयांची इच्छा आहे. पाकिस्तानने आणखी वाकडे पाऊल टाकले, तर युध्दही होऊ शकते. ते परवडणार नाही, याचा विचार करुन दहशतवादी संघटनांना पाठीशी घालणे बंद करणे हाच पाकिस्तानसमोर पर्याय आहे. पण, तसा होईल, असे काही दिसत नसल्याने तो देश एका संघर्षाला निमंत्रण देत आहे.

# खासगी शिक्षणसंस्था चालवायच्या तरी कशा?



महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार एकनाथ खडसे यांनी नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अतिशय उद्विग्नपणे मांडलेला हा प्रश्न होता. खासगी शिक्षणसंस्थांची २००८ पासून जी परवड सुरू झाली आहे, त्याला यानिमित्ताने पुन्हा एकदा वाचा फोडल्याने खासगी शिक्षणसंस्थांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. विधान परिषदेचे ज्येष्ठ सदस्य खडसे यांनी मांडलेल्या खासगी शिक्षणसंस्थांच्या सद्यस्थितीतील दयनीय स्थिती, व्यथा बघता आता कोणीही नवीन शिक्षण संस्था काढण्याच्या अथवा अस्तित्वात असलेल्या शिक्षणसंस्था दीर्घकाल चालवण्याच्या मनःस्थितीत राहिलेले नाही. कारण २००८ पासून शासनाने खासगी शिक्षण संस्थांना वेतनेतर अनुदान दिलेले नाही, फोर प्लस वनच्या एक टक्का अनुदानाविषयी शासन बोलत नाही, आरटीईचे जवळपास सतराशे ७७ कोटी रुपये शासनाने अद्यापपावेतो दिलेले नाही, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची, लॅब असिस्टंटची पदे शासनाने व्यपगत करून टाकलेली असल्याने शाळांमध्ये तसेच शाळेच्या प्रयोगशाळेत झाडू कोणी मारायचा? साफसफाई कोणी करायची? शाळेची स्वच्छता, सुरक्षा कोणी बघायची? आणि सर्वांत महत्त्वाचे शाळेच्या मानवी तसेच भौतिक सोयीसुविधांसाठी लागणारा खर्च शिक्षणसंस्थांनी कोठून आणि कसा उभा करायचा या आणि यांसारख्या असंख्य अनुत्तरीत ज्वलंत प्रश्नांकडे मायबाप सरकार कधी लक्ष देणार, हा खरा प्रश्न आहे.

भरीस भर म्हणून २०१७ नंतर भरतीचे सर्व अधिकार काढून शिक्षक भरतीही शासन पवित्र पोर्टलनुसार करणार म्हटल्यावर मग शिक्षण संस्था आणि संस्थाचालक फक्त नावालाच ठेवले जाणार हे स्पष्ट होते. इतक्या साऱ्या दिव्यातून मार्ग काढून मग या संस्था चालवायच्या तरी कशा, असा उद्विग्न स्वर अनुदानित शिक्षणसंस्थाचालकांच्या मनात येणं साहजिक आहे आणि राज्याच्या विधिमंडळाच्या सभापटलावर सदर विषय मांडला जाणं, त्यावर चर्चा घडवून आणणं हे न्यायसंगत आणि काळाची गरज आहे. ज्याची सुरुवात एका ज्येष्ठ जाणत्या अनुभवी नेत्यांनी केली हे बरेच झाले.

एकीकडे खासगी अनुदानित शिक्षणसंस्थांची अशी विपन्न अवस्था होत असताना, दुसरीकडे स्वयं अर्थसहाय्यित तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मोकळीक देऊन मागेल त्याला शाळा मान्यता दिल्या जात आहे. त्या शाळाही भरमसाठ फी आकारून आपली आर्थिक पूर्तता करत आहेत. साहजिक त्यांना चांगल्या सोयी-सुविधा देणे शक्य होते. त्यामुळे त्यांच्याकडे पालकवर्गाचा कल वाढताना दिसत आहे. दुसरीकडे सरकारी अनुदानित शाळांची बिकट होत जाणारी आर्थिक स्थिती, दिवसेंदिवस वाढत जाणारी अशी ही परवड बघता या शाळांमध्ये पटसंख्येची समस्या निर्माण होऊन दरवर्षी शिक्षक अतिरिक्त होत आहे. पुन्हा अतिरिक्त आणि रिक्त जागांचे गणित जुळवता जुळवता संस्था तसेच शासनाचे अनेक वर्षे निघून जात असतात. त्यात पुन्हा काही ठिकाणी रिक्त शिक्षकांमुळे तर काही ठिकाणी अतिरिक्त शिक्षकांमुळे व्यवस्थेत असमतोल निर्माण होऊन शासनास नाहक आर्थिक ताण सोसावा लागत आहे. या सर्व असमतोल स्थितीमुळे मुलांचे मोठ्या

**प्रा. अनिल देवरे**

प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असल्याने अनेक ठिकाणी पालकांची शिक्षक भरतीची ओरड, शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी खासगी शिक्षण संस्थांवर, संस्थाचालकांवर, गाव पातळीवर टाकला जात असलेला दबाव यामुळे कधी स्वखर्चाने तर कधी भविष्यात भरती निघाल्यास आपणास प्राधान्य देण्यात येईल, या अटीवर शिक्षक भरती करून मुलांचे शैक्षणिक नुकसान टाळून तसेच स्थानिक लोकांचा तसेच पालकांचा रोष कमी करून वर्षे ढकलणाऱ्या खासगी शिक्षणसंस्थांना पुन्हा शासनाच्या विविध तुघलकी जीआरचा तर कधी आश्वासनावर भरती केलेल्या शिक्षकांच्या विविध न्यायालयीन मुद्यांचा सामना करावा लागतो तो वेगळा.

राज्यातील शिक्षणव्यवस्थेतील अशा विरोधाभासी चित्रामुळे दरवेळेस खासगी शिक्षणसंस्था आणि संस्थाचालक आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जातात. हे चित्र राज्याचा शैक्षणिक प्रगतीच्या वाढ-विस्ताराच्या दृष्टीने खरंच चिंताजनक आहे. एकनाथ खडसेंनी नेमक्या याच मुद्याला हात घालून मायबाप सरकारचे लक्ष वेधले आहे. खासगी शिक्षणसंस्था अशा विपन्न, विचित्र, विरोधी अवस्थेत कितीकाळ तग धरतील याचे उत्तर आज जरी कोणाकडे नाही. सामान्य गोरगरिबांच्या शिक्षणाचा गेल्या पाच पन्नास वर्षांपासून एकमात्र आधार असलेल्या अनुदानित शिक्षणसंस्था भविष्यात बंद पडून या व्यवस्था कॉर्पोरेट क्षेत्रातील लोकांच्या ताब्यात जाऊन शिक्षण देणाऱ्या अनुदानित शिक्षकांच्या नोकरीचा आणि शिक्षण घेणाऱ्या सामान्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण करेल, यात तीळमात्र शंका वाटत नाही. कारण प्रवास त्याच दिशेने जात आहे. अनेक ठिकाणी खासगी शिक्षणसंस्था चालवणं परवडत नाही म्हणून अनेक संस्था टेकओव्हर केल्या जात आहेत. अनेक ठिकाणी एकतर खासगी कोर्सेस अथवा इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढण्याचा कल दिसून येत आहे. यामुळे लोकांचा, पालकांचा तसेच शासनाच्या अतिरिक्त अपेक्षांच्या, जाचक धोरणांच्या, आदेशांच्या त्रासातून सुटका होत असल्याची संस्थाचालकांची भावना खरंच चिंता वाढवणारी आहे. या पवित्र क्षेत्राकडे कोणत्याही सरकारने पूर्वग्रहदूषित भावनेतून न बघता त्यांचे म्हणणे, त्यांच्या मागण्या, त्यांच्या अडचणी, त्यांच्या गरजा या सर्वांकडे सहानुभूतीपूर्वक बघितले जावे हीच यानिमित्ताने अपेक्षा.

राज्याच्या पुरोगामित्वात, औद्योगिक विकासात, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक जडणघडणीत मोलाची साथ देणाऱ्या, साठ -सत्तर वर्षे अनेक दिव्य पार पाडून आपला शैक्षणिक दर्जा, गुणवत्ता टिकवणाऱ्या संस्थांना आर्थिक, सामाजिक, नैतिक पाठबळ देणे सरकार तसेच समाजाचे कर्तव्य आहे. या खासगी शिक्षण क्षेत्राकडे बघण्याचा सरकार तसेच समाजाचा दृष्टिकोन बदलला पाहिजे.

# मलेरिया : पुन्हा गुंतवणूक करा, पुन्हा कल्पना करा, पुन्हा प्रज्वलित करा

जागतिक मलेरिया दिन हा दरवर्षी २५ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा जागतिक आरोग्य सेवा जागरूकता कार्यक्रम आहे, जो विविध स्थानिक आणि सरकारी आरोग्यसेवा अधिकारी आणि धोरणकर्त्यांना मलेरियाशी लढण्यासाठी आणि त्याचे निर्मूलन करण्यासाठी आवश्यक असलेल्या कृतींना प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक आवाहन आहे.

मलेरिया नावाचा एक परजीवी संसर्ग मादी (ॲनोफिलीस) डासांमुळे पसरतो आणि तो गंभीर, कधी कधी प्राणघातक आजार निर्माण करू शकतो. मलेरिया दरवर्षी २०० कोटी लोकांना धोका निर्माण करतो, ज्यामध्ये ९० स्थानिक देशांचे रहिवासी आणि १२.५ कोटी आंतरराष्ट्रीय पर्यटकांचा समावेश आहे. प्लाझमोडियम परजीवी एक जटिल जीवनचक्र तयार करतात. ज्यामुळे नियतकालिक ताप येतो. बहुतेक रुग्ण उपचारानंतर मलेरियाच्या लक्षणांपासून लवकर बरे होतात, परंतु उपचारांना उशीर झाल्यास गंभीर मलेरिया अशक्तपणा, सेरेब्रल मलेरिया, कोमा किंवा मृत्यू यांसारख्या गंभीर गुंतागुंत होऊ शकतात. या वर्षी २०२५ मध्ये जागतिक मलेरिया दिनाची थीम 'मलेरिया आपल्यासोबत संपतो : पुन्हा गुंतवणूक करा, पुन्हा कल्पना करा, पुन्हा प्रज्वलित करा' आहे. ही थीम मलेरिया निर्मूलनाला गती देण्यासाठी नवीन समर्पण, नावीन्यपूर्ण नियोजन आणि टीमवर्कची आवश्यकता अधोरेखित करते. मलेरिया हा जगातील सर्वांत प्राणघातक परजीवी आजारांपैकी एक आहे, ज्यामध्ये २०१७ मध्ये जागतिक स्तरावर २१.९ कोटींहून अधिक रुग्ण



आणि ४.३५ लाख मृत्यू झाले. या संख्येला आळा घालण्यासाठी, या आजाराबद्दल आणि त्याच्या प्रतिबंधाबद्दल जागरूकता वाढवणे आणि त्याचे प्रतिबंध करणे ही सर्वोच्च प्राथमिकता आहे, ज्यामध्ये लोकांना लवकर लक्षणे, खबरदारी आणि उपचार पर्यायांबद्दल शिक्षित करणे समाविष्ट आहे. संशोधन अभ्यासातून असे दिसून आले आहे की, मलेरियाचे लवकर निदान आणि उपचार मलेरियाच्या लक्षणांबद्दल आणि त्याच्या प्रतिबंधाबद्दल जागरूकता वाढवून मृत्युदर कमी करू शकतात.

जागतिक मलेरिया दिन हा जागतिक लक्ष वेधून घेण्यासाठी आणि लोकांना बाधित होण्याचा धोका कमी करण्यासाठी मदत करण्यासाठी एक व्यासपीठ आहे. हे २०२० मध्ये स्पष्ट झाले, जिथे कोविड-१९ साथीच्या आजारामुळे, जागतिक आरोग्य संघटनेने जागरूकता सेवांमध्ये व्यत्यय आणला, ज्यामुळे प्रति १००० लोकांमागे मलेरियाच्या रुग्णांमध्ये वाढ झाली (२००० मध्ये ८१/१००० लोकांवरून २०१९ मध्ये ५६/१००० लोकांवरून त्यानंतर २०२० मध्ये ५९/१००० लोकांवरून). २०१९ च्या तुलनेत २०२० मध्ये मृत्युदर (मृत्यू) १२ टक्के पर्यंत वाढला आहे. जगभरात असा अंदाज होता की, २००० ते २०२० दरम्यान, १०६ लाख मलेरिया मृत्यू आणि १७० कोटी मलेरियाच्या रुग्णांना रोखण्यात आले. आफ्रिकन प्रदेशात सर्वाधिक रुग्ण (८२ टक्के) आणि मृत्यू (९५ टक्के) रोखण्यात आले, त्यानंतर आग्नेय आशिया प्रदेश (१० टक्के प्रकरणे आणि २ टक्के) होता.

२००८ मध्ये पहिल्यांदा साजरा करण्यात आलेला जागतिक मलेरिया दिन हा आफ्रिका मलेरिया दिनापासून विकसित झाला होता, जो २००१ पासून आफ्रिकन देशांद्वारे सन्मानित केला जात होता. या स्मरणोत्सवामुळे आफ्रिकन देशांमध्ये मलेरिया रोखणे आणि त्याचा मृत्युदर कमी करणे या उद्देशाने केलेल्या उद्दिष्टांच्या स्थितीचे मूल्यांकन करण्याची संधी मिळाली. २००७ मध्ये जगभरातील मलेरियाच्या प्रसाराची दखल घेण्यासाठी आणि या रोगाचे निर्मूलन करण्यासाठी जागतिक मोहिमेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक आरोग्य सभेच्या (जागतिक आरोग्य संघटनेने आयोजित केलेल्या मेळाव्यात) ६० व्या सत्रात आफ्रिका मलेरिया दिनाचे नाव बदलून जागतिक मलेरिया दिन असे ठेवण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला.

मलेरिया रोगाचा प्रतिबंध घालण्यासाठी खालील उपाय डास चावण्याचा धोका कमी करण्यास मदत करू शकतात : शरीरावर २०-३५% नत्र, नत्र-डायथिल-मेटा-टोलुआमाइड कीटकनाशके लावा. रात्री बाहेर असताना लांब बाह्यांचा ड्रेस आणि लांब पॅन्ट घाला. रात्री झोपताना पलंगावर मच्छरदाणी वापरा. झोपण्यापूर्वी, बेडरूममध्ये पायरेथ्रिन किंवा संबंधित कीटकनाशकाची फवारणी करा. घराच्या परिसरात कधीही पाणी साचू देऊ नका. पाण्याचे टब नेहमी झाकणाने बंद करा.

# दैनंदिनी : रोजच्या कामाचा लेखाजोखा

दिसामाजी काहीतरी लिहावे, असे समर्थ रामदास स्वामींनी सांगून ठेवले आहे. मग आपण किमान दैनंदिनी लिहायला काय हरकत आहे? आपण दिवसभर काय केले याचा लेखाजोखा लिहिण्याची सवय म्हणजे दैनंदिनी. यालाच रोजनिशी असेही म्हणतात. शक्यतो दैनंदिनी ही रात्री झोपण्यापूर्वी लिहावी. दिवसभरात आपल्या हातून कोणत्या गोष्टी चांगल्या झाल्या किंवा कोणत्या गोष्टी चुकीच्या झाल्या याची उजळणी यानिमित्ताने होते. आजच्या कामाचे नियोजन काय होते आणि त्यातली किती कामे आपण केलीत याचा ऊहापोह यानिमित्ताने होतो. याशिवाय, दैनंदिनीमध्ये आज आपण नवीन काय शिकलो याचीही नोंद ठेवली जाते. उद्या आपल्याला काय करायचे याचेही नियोजन करता येते. जर दिवसभरात आपल्या हातून चुकीचे घडले असेल तर किमान आपण आपल्या स्वतःला सांगू शकतो की, यापुढे मी अशी चूक करणार नाही. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे दैनंदिनी लिहिल्यामुळे आपण कधीही ती उघडून बघितल्यास आपण कधी काय काम केले हे आपल्याला निश्चित स्वरूपात आठवते. बऱ्याच वेळेला आपण केलेल्या चांगल्या गोष्टींचे आपल्याला समाधानही वाटते आणि घडलेल्या चुकीच्या गोष्टी पुन्हा घडणार नाही याची आपण काळजीही घेतो. दैनंदिनी लिहिल्यामुळे आपली रोजची कामे रोज वेळेत पूर्ण होतात. राहून गेलेल्या गोष्टी सुद्धा आपण वेळेत पूर्ण करतो. साहित्यात सुद्धा दैनंदिनी लेखन म्हणजे डायरी लेखन ही एक स्वतंत्र विधा आहे. पूर्वी ज्या अनेक लोकांना अशी दैनंदिनी लिहिण्याची सवय होती, आज त्यांनी लिहिलेली ती दैनंदिनी इतिहास लेखणाचे साधन म्हणून किंवा संदर्भ ग्रंथ म्हणून उपयुक्त ठरत आहे. आपल्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी व जीवनाच्या यशस्वीतेसाठी दैनंदिनी लिहिणे फार महत्त्वाचे आहे.

इतिहासात आपल्याला जी अनेक मोठी माणसे बघावयास मिळतात, त्यातील अनेकांना

**प्रशांत शिरुडे**
**९९६७८१७८७६**

दैनंदिनी लिखाणाची सवय असल्याचे दिसून येते किंवा आपण काल काय केले व आज काय करायचे यावर ते नियमितपणे आपल्या कुटुंबात किंवा सहकाऱ्यांसोबत चर्चा करताना दिसून येतात. थोडक्यात जीवनात यशस्वी होण्यासाठी दैनंदिनी लिखाणाच्या सवयीचे खूप मोठे व महत्त्वाचे स्थान आहेच.

रोजनिशी किंवा दैनंदिनी लिहिल्यामुळे जसे कधी काय केले हे लक्षात राहते तसेच याच सवयीमुळे कधी काय करायचे तेही कळते. काम करताना एखाद्याला दिलेली वेळ, घेतलेली वेळ या सर्व नोंदी दैनंदिनीमध्ये आपण ठेवत असतो. त्यामुळे कामे वेळच्या वेळी पूर्ण होतात. एकदा एका कामासाठी ठरवलेली वेळ ही आपण दुसऱ्या कामासाठी देत नाही हा दैनंदिनी लिहिण्याचा खूप मोठा फायदा आहे. म्हणजेच एका वेळी आपल्याला एकच काम करावे लागते. एकदम चार कामे समोर उभी राहत नाहीत. दैनंदिनीमुळे आपलाच वक्तशीरपणा वाढतो. त्याचा आपल्या सभोवतालच्या माणसांवरसुद्धा चांगला परिणाम होतो. वेळच्या वेळी काम करणारी व्यक्ती, दिलेली वेळ पाळणारी व्यक्ती म्हणून लोक आपल्याला ओळखायला लागतात.

आधुनिक कालखंडामध्ये मॅनेजमेंटचा अभ्यास करताना दैनंदिनी हा घटक अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. तो अभ्यासक्रमाचा एक अतिशय महत्त्वाचा घटक म्हणून ओळखला जातो. माणसाची आळस, कंटाळा यापासून सुटका होते.

दैनंदिनी लिखाणाच्या सवयीमुळे आपल्यासमोर अनेक कामे एका वेळी करण्याची वेळ आली तर आपण त्या कामांचे दैनंदिनी वेळापत्रकानुसार नियोजन करून घेतो. मोठ्या पदावरचे सन्माननीय अधिकारी हे आपल्या कामाचे असेच नियोजन करून ठेवतात. बऱ्याच वेळेला त्यांनी या गोष्टींची नोंद करण्यासाठी स्वतंत्र सेक्रेटरीची नेमणूक केलेली असते. थोडक्यात दैनंदिनीच्या लिखाणामुळे आपलेच जीवन सुखकर होते.

# संचालकांचे पाप सामान्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न

गेली पन्नास वर्षे नाशिक जिल्ह्याचा मानबिंदू असलेल्या जिल्हा बँकेवर दहा, बारा वर्षांतील संचालकांच्या गैरकारभारामुळे नामुष्की आली आहे. केवळ स्वार्थापोटी राजकारणाचा अड्डा बनलेली जिल्हा बँक आज मृत्युशय्येवर आहे. पूर्वीच्या संचालक मंडळाने व व्यवस्थापनाने अत्यंत निष्ठेने आणि सचोटीने व्यवहार केले. त्यामुळे जिल्हा बँकेच्या प्रगती आणि विस्तारात भर पडत गेली. गावच्या विकास सोसायटी ते जिल्हा बँकेचे अधिकारी यांच्या विश्वासार्हता टिकवून पारदर्शक कारभाराचा नावलौकिक होता. आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता व रीकव्हरी ही राष्ट्रीयीकृत बँकांच्या एक पाऊल पुढे होते. एक पारंपरिक पद्धतीने व्यवहारात पारदर्शकता ठेवून आदर्श व्यवहार सुरू होते. सर्वांना पारदर्शकता हवी आहे. परंतु कारभार करताना ज्येष्ठांचे मार्गदर्शन व सल्ला न मानता काही महत्त्वाकांक्षी संचालकांनी मनमानी केली. सातत्याने कर्जवसुलीसाठी प्रयत्न केले नाहीत. दुर्लक्ष केले गेले, जणू काही कर्ज बुडवण्यासाठी मोठ्या थकबाकीदारांच्या प्रेमापोटीच मार्गदर्शन करीत होते. आज आकांडतांडव करून जबाबदारी टाळत आहेत. वरून साळसूदपणे संचालक कसे निर्दोष आहेत, याची वकिली करत आहेत. ही सर्व कार्यपद्धती सचोटीवर सिद्ध झालेली असताना आज अचानक गाव सोसायट्यांवर जबाबदारी ढकलत आहे. नव्याने महंमद तुगलगी फतवे काढून पाचशे रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर, त्या

**जनमनाचे प्रतिध्वनी**

त्या गावातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या सभापती, उपसभापती, तसेच संचिवांवर कर्जवसुलीची जबाबदारी टाकून पीककर्ज वाटप करावे लागेल, असे सक्तीचे फर्मान काढले आहे.

जसे २२०० कोटींच्या तोट्याला हेच सभापती आणि सचिव जबाबदार आहेत. वास्तविक शेती कर्ज देताना लाखो रुपयांची शेती तारण दिलेली असते. त्यामुळे सच्चा कर्जदार कधीच कर्ज बुडवण्यासाठी प्रयत्न करत नाही. या महंमद तुघलकी निर्णयाला सर्वच सोसायट्यांचा विरोध आहे, त्यामुळे पीककर्ज रखडले आहे. आज आकांडतांडव करून जबाबदारी ढकलून काही उपयोग होणार नाही. एक निश्चित अशी कर्जे वाटप पद्धती असताना सध्या नको ते खुसपट काढले जात आहे, हे असंच सुरू राहिल्यास कदाचित व्यवहार बंद पडून कशीबशी तग धरून उभी असलेली जिल्हा बँक बुडण्याची शक्यता अधिक वाटते. यावर सकारात्मक विचार करावा, अन्यथा व्यवहार ठप्प होतील आणि त्याची जबाबदारी संबंधितांवर राहील. आवळा देऊन कोहळा काढू नये.

**- कुबेर जाधव**

## संत आपणास भगवंताशी जोडतात

आपले हृदय विषयाने इतके भरले आहे, की तिथे भगवंताच्या प्रेमाला जागाच राहिली नाही. बरे, भगवंताचे प्रेम मुद्दाम तिथे घातले तर ते आत न राहता बाहेर पडते आणि वाऱ्यावर उडून जाते. सामानाने गच्च भरलेली जशी एखादी खोली असते, तसे आपले हृदय आहे. या हृदयाचा संबंध भगवंताशी जोडण्यासाठी, आपल्या हृदयातले सामान म्हणजे विषय, खाली करून त्याच्या जागी भगवंताचे प्रेम भरणे जरूर आहे. साधारणपणे आपला अनुभव असा आहे की, एखादी वस्तू आपल्याला पुष्कळ आणि पुन्हापुन्हा मिळाली तरी तिचा वीट येतो; म्हणून जी वस्तू आपल्याला कितीही मिळाली तरी तिचा वीट येणार नाही अशी वस्तू आपण मिळवावी. अशी अवीट असणारी वस्तू एकच आहे; ती म्हणजे भगवंत होय. भगवंताने आपले नाम संतांना दिले. त्यामुळे संत जे करतील त्याला मान्यता देणे भगवंताला जरूरच आहे. आपण आणि संत यांच्यामध्ये मनुष्य या दृष्टीने फरक नाही; पण फरक आहे तो हा की, संत हा जसे बोलतो तसे वागतो. संताजवळ राहतो तोही संतच बनतो.




गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

बाजार - कंपन्या - मनोरंजन



## झापुक झुपुक म्हणजे फुल ऑन एंटरटेनमेंट! ॲडव्हान्स बुकिंग सुरू, २५ एप्रिलपासून प्रदर्शित

**नाशिक :** मराठी चित्रपटसृष्टीत हास्य आणि प्रेमाची नवी लाट घेऊन येणारा बहुप्रतिक्षित झापुक झुपूक या चित्रपटाची सर्व प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत होते. आता ती प्रतीक्षा संपली आहे. केदार शिंदे दिग्दर्शित आणि जिओ स्टुडिओज प्रस्तुत 'झापुक झुपुक' हा सिनेमा २५ एप्रिल २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. 'झापुक झुपूक' हा चित्रपट प्रेम, मैत्री आणि हास्याने भरलेला आहे. या सिनेमाच्या ट्रेलर ला आणि गाण्यांना आता पर्यंत प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यामुळे यात काही शंका नाही कि चित्रपटाला सुद्धा तितकच प्रेम प्रेक्षक देतील. चित्रपटाच्या ट्रेलर लाँचच्या कार्यक्रमात अभिनेता रितेश देशमुख यांनी सुद्धा 'झापुक झुपूक' हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. विशेष म्हणजे या सिनेमाची ॲडव्हान्स बुकिंग सुरू झाली आहे त्यामुळे तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात तिकीट लवकरात लवकर बुक करा आणि 'झापुक झुपूक' चा आनंद घ्या! 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वाचा विजेता सूरज चव्हाण या चित्रपटात प्रमुख भूमिकेत आहे. त्याच्यासोबत जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी आणि दीपाली पानसरे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्माती ज्योती देशपांडे, निर्माती सौ. बेला केदार शिंदे ,केदार शिंदे दिग्दर्शित झापुक झुपूक या चित्रपटामध्ये सूरज चव्हाणच्या अभिनयाची झलक पाहण्यासाठी आणि केदार शिंदे यांच्या दिग्दर्शनाचा अनुभव घेण्यासाठी प्रेक्षक सज्ज आहेत. 'झापुक झुपूक' हे नाव जितकं गमतीशीर आहे, तितकाच हा चित्रपट प्रेक्षकांना हसवणार, गुंतवणार आणि शेवटी एक उबदार संदेश देऊन जाईल.



## प्रेमाचा 'गुलकंद' १ मे रोजी प्रदर्शित होणार

**नाशिक :** 'गुलकंद' चित्रपटाचा ट्रेलर अखेर प्रदर्शित झाल्यापासून चित्रपटाबद्दलची उत्सुकता आता आणखीच वाढली आहे. एव्हरेस्ट एंटरटेनमेंट आणि वेटक्लाऊड प्रॉडक्शन्स निर्मित आणि दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला 'गुलकंद' हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनात घर आता करण्यास सज्ज आहे. या चित्रपटात सई ताम्हणकर, समीर चौघुले, ईशा डे, प्रसाद ओक, वनिता खरात, मंदार मांडवकर, जुई भागवत, तेजस राऊत, आणि शार्विल आगटे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'गुलकंद'ची निर्मिती सचिन गोस्वामी, सचिन मोटे आणि संजय छाब्रिया यांनी केली आहे. 'गुलकंद' हा एक हलकाफुलका कौटुंबिक विनोदी चित्रपट असून, नात्यांमधली गुंतागुंत, भावना, हास्य आणि गोडवा यांचा एक सुरेख मेळ आहे. ढवळे-माने कुटुंबांच्या संसारात मुरलेला 'गुलकंद' प्रेक्षकांसाठी एक परिपूर्ण मनोरंजनाचा अनुभव ठरेल, याची खात्री आहे. चित्रपटातील गाणीही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहेत. चित्रपटातील 'चंचल' या सुरेल गाण्यानं रसिकांच्या मनाला हळूवार स्पर्श केलाय. वैशाली सामंत आणि अवधूत गुप्ते यांच्या कमाल आवाजातील या गाण्याला प्रशांत मडपूवार यांच्या शब्दांची व अविनाश विश्वजीत यांच्या जबरदस्त संगीताची जोड लाभली आहे. दिग्दर्शक सचिन गोस्वामी म्हणतात, नातं जेव्हा एकसुरी होतं, तेव्हा त्यातला गोडवा टिकवणं महत्त्वाचं ठरतं, आणि हाच गोडवा 'गुलकंद' चित्रपटात आहे. निर्माते संजय छाब्रिया म्हणतात, 'गुलकंद' हे आमचं एक खास सिनेमॅटिक गिफ्ट आहे. दर्जेदार आणि संपूर्ण कुटुंबाने एकत्र पाहावा असा चित्रपट आम्ही आणत आहोत. कलाकार, दिग्दर्शक, सगळ्यांनी कमाल काम केलं आहे. मला विश्वास आहे की, प्रेक्षकांना या गोडसर अनुभवाचा नक्कीच आनंद मिळेल.

## शरद केळकर करणार छोट्या पडद्यावर कमबॅक

**मुंबई :** मराठमोळा अभिनेता शरद केळकरनं छोट्या पडद्यापासून बॉलिवूडपर्यंत स्वत:चं एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. शरद केळकरणं त्याच्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात घर केलं. आज शरद केळकरचे चाहते फक्त महाराष्ट्रात नाही तर संपूर्ण भारतात आहेत. त्याचे लाखो चाहते आहेत. आता इतक्या वर्षांनी तो पुन्हा एकदा छोट्या पडद्यावर पुनरागमन करणार आहे. या मालिकेत शरद केळकर हा महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. या मालिकेचा प्रोमो देखील प्रदर्शित झाला आहे. शरद केळकची ही मालिका झी टीव्हीवर प्रदर्शित होणार असून या मालिकेचं नाव 'तुम से तुम तक' आहे. या मालिकेचा प्रोमो प्रदर्शित झाला असून सगळीकडे याचीच चर्चा रंगली आहे. या प्रोमोमध्ये दाखवण्यात आलं आहे की एक सामान्य घरातील १९ वर्षांची मुलगी अनु हिच्या लग्नासाठी तिची आई देवीकडे प्रार्थना करते. तर, दुसरीकडे ४६ वर्षांचा आर्यवर्धन हा बिझनेसमॅन असून त्याची आई लग्नाचा सल्ला देत असताना अर्ध आयुष्य निघून गेल्यानंतर आता कोणाशी लग्न करू असं बोल-ताना दिसतो. आता या १९ वर्षांच्या अनूमध्ये आणि ४६ वर्षांच्या आर्यवर्धनची कशी भेट होते आणि त्यांची कशी गाठ जुळते हे पाहण्याकडे सगळ्यांचे लक्ष वेधले आहे.

# 'नामको'च्या चेअरमनपदी हेमंत धात्रक

## बँकेच्या ५००० कोटी ठेवींचे उद्दिष्ट गाठणार



**नाशिक : प्रतिनिधी**

**उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य अशा दि नासिक मर्चंट्स को-ऑप. बँकेच्या चेअरमनपदी तिसऱ्यांदा हेमंत धात्रक यांची बिनविरोध निवड करण्यात आली. बँकेच्या सातपूर येथील सभागृहात झालेल्या या छोटेखानी समारंभास अनेक मान्यवर उपस्थित होते.**

यावेळी बोलताना मावळते चेअरमन सोहनलाल भंडारी यांनी आजची उपस्थिती खूप मोठी असून, हेमंत धात्रक यांच्यावर असणारा विश्वास बँकेची प्रगती दर्शविणारा आहे. धात्रक चेअरमन असो नसो बँकेत येऊन कुठलाही निर्णय अभ्यासपूर्वक घेण्याचा त्यांचा मनोदय हा महत्त्वाचा मानला जातो. बँकेत धात्रक परिवाराचे योगदान गेली ५० वर्षांपासून आहे, ते नाकारता येणार नाही. यावेळी माजी आमदार वसंत गिते यांनी नामको बँकेचे टीमवर्क चांगले असल्याने ही प्रगती होऊ शकली. आज जिल्हा बँकेचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात होते, पण ती बँक रसातळाला गेल्याचे आपण पाहिले आहे.

याप्रसंगी बोलताना नवनिर्वाचित चेअरमन हेमंत धात्रक यांनी माझे वडील स्व. लक्ष्मणराव धात्रक यांनी भवरीलाल मोदी, मु. शं. औरंगाबादकर हे विरोधात कायम निवडून यायचे. त्यामुळे निवडून येण्याची परंपरा मी वडिलांप्रमाणे कायम ठेवली. बँकेस ६५ कोटींचा नफा राहिला हे आपल्या सर्वांचे सामुदायिक योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. स्वतःच्या मालकीचे डेटा सेंटर व्हावे म्हणून २००६ साली खूप प्रयत्न केले. त्यावेळी गोपीनाथजी मुंडे यांच्या शुभहस्ते डेटा सेंटरचे उद्‌घाटन झाले. आज ५२ मल्टिस्टेट बँक आहे. रोज बँका बुडतात. त्याचबरोबर सहकार मंत्रालय स्थापन झाल्यामुळे अनेक कायदे आले. अडचणी निर्माण झाल्या परंतु तरीसुध्दा आपल्याला बँकेच्या उज्ज्वल भवितव्यासाठी काम करावयाचे आहे. बँकेच्या ५००० कोटी ठेवींचे उद्दिष्ट पूर्ण करावयाचे असल्याने कार्यक्षम राहावे लागेल. गृहकर्ज, वाहनकर्ज, शैक्षणिक कर्ज, वैयक्तिक कर्ज ग्राहकांना कसे लवकर मिळेल यासाठी प्रयत्नशील राहू व बँकेच्या माध्यमातून जास्तीत जास्त सेवा देण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन श्री. धात्रक यांनी दिले.

याप्रसंगी खासदार राजाभाऊ वाजे, ज्येष्ठ संचालक विजय साने, धनराज चौधरी, गुरुमित बग्गा, कोंडाजी मामा आव्हाड, दत्ता गायकवाड, जयंत जायभावे आदींची नवनिर्वाचित चेअरमन श्री. धात्रक व नामको बँक यांचा गुणगौरव करणारी भाषणे झाली. सूत्रसंचालन प्रकाश दायमा यांनी केले.

कार्यक्रमास ज्येष्ठ नेते पुंजाभाऊ सांगळे, दामोदर मानकर, लक्ष्मणराव जायभावे, शिवाजीराव चुंभळे, शैलेश कुटे, प्रकाश घुगे, सुनील चोपडा, गोकुळ गिते, दिगंबर गिते, जयप्रकाश जातेगावकर, आनंद बागमार, त्याचप्रमाणे व्हा. चेअरमन सुभाष नहार, जनसंपर्क संचालिका सपना बागमार, महेंद्र बुरड, भानुदास चौधरी, नरेंद्र पवार, आकाश छाजेड, हरीश लोढा, ललितकुमार मोदी, अविनाश गोठी, अशोक सोनजे, प्रफुल्ल संचेती, देवेंद्र पटेल, शीतल भट्टड, प्रशांत दिवे, तानाजी जायभावे, विशाल जातेगावकर, विश्राम दीक्षित आदी अनेक मान्यवर यांप्रसंगी उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी फटाके फोडून गुलाल उधळून आनंद व्यक्त केला.

# एलआयसीचा व्यवसाय २.२७ लाख कोटींवर

**नवी दिल्ली :** देशातील सर्वांत मोठ्या भारतीय जीवन विमा महामंडळाने (एलआयसी) आर्थिक वर्ष २०२५ मध्ये २,२६,६६९.९१ कोटी रुपयांचा प्रभावी नवीन प्रीमियम व्यवसाय मिळवला आहे, ज्यामध्ये वैयक्तिक नवीन व्यवसायातून मिळालेल्या विक्रमी ६२,४०४.५८ कोटी रुपयांचा समावेश आहे, असे लाइफ इन्शुरन्स कौन्सिलने बुधवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार दिसून आले. आर्थिक वर्ष २०२५ साठी वैयक्तिक नवीन व्यवसाय प्रीमियममध्ये वार्षिक आधारावर ८.३५ टक्के वाढ केली आहे, असे आकडेवारीवरून दिसून आले आहे. तथापि, आर्थिक वर्षात ग्रुप प्रीमियममध्ये ०.४० टक्क्यांनी घट होऊन तो गेल्या वर्षीच्या १,६४,९२५.८९ कोटी रुपयांवरून १,६४,२६५.३४ कोटी रुपयांवर आला आहे. आर्थिक वर्ष २५ साठी एलआयसीने १.७८ कोटी नवीन पॉलिसी विकल्या. १ ऑक्टोबर २०२४ पासून नवीन सरेंडर मूल्य नियम लागू झाले असूनही, मार्च २०२५ मधील विभागातील विशिष्ट कामगिरी पाहता, वैयक्तिक प्रीमियम विभागात एकूण १०,०२२ कोटी रुपये झाला, जो मार्च २०२४ मधील ९,०४८.८७ कोटींच्या तुलनेत १०.७५ टक्क्यांनी वाढला आहे.

## चितळे बंधूंची बाकरवडी 'मिनी' स्वरूपात

**मुंबई :** आपल्या रुचकर आणि दर्जेदार उत्पादनांच्या जोरावर ग्राह-कांच्या मनावर गेली ७५ वर्षे अधिराज्य गाजविणारे चितळे बंधू आपली जगप्रसिद्ध बाकरवडी आता नव्या 'मिनी' स्वरूपात घेऊन आले आहेत. चितळेंच्या या खमंग बाकरवडीचे हे नवे 'मिनी' रूप खवय्यांच्या विशेष पसंतीस देखील उतरत आहे. सध्या देशभरात आयपीएलचा उत्साह शिगेला पोहोचत असताना या क्रिकेट फिव्हरचे औचित्य साधत चितळे बंधूंनी ही 'मिनी' बाकरवडी सादर केली आहे. मिनी बाकरवडीच्या प्रसिद्धीसाठी तीन नव्या जाहिरातीही प्रदर्शित करण्यात आल्या असून सुप्रसिद्ध मराठी अभिनेता अमेय वाघ व आयुष मेहरा यांच्यावर चित्रित झालेल्या या जाहिरातींमध्येही क्रिकेट आणि आयपीएलवर विशेष भर देण्यात आला आहे. 'गेट मॅच रेडी विथ चितळे बाकरवडी' अर्थात 'आयपीएल क्रिकेट सामन्याची तयारी चितळे बाकरवडी सोबतच' असा संदेश या जाहिरातींमधून देण्यात आला आहे.

# डॉ. दत्ता विघावे यांची खरीखुरी गगनभरारी

## रशियन उपग्रह अल्फेरोव्हसोबत प्रक्षेपित होणार परिचयासह फोटो




रशियन स्पेस एजन्सी जिओस्कॅन २०२५ मध्ये वोस्टोचनी कॉस्मोड्रोममधून सोयुझ रॉकेटद्वारे शैक्षणिक उपग्रह अल्फेरोव्ह २३९ प्रक्षेपित करणार आहे. यामध्ये जगातील निवडक प्रतिभावान व्यक्तींचे नाव, परिचय आणि फोटो अंतराळात प्रक्षेपित केले जाणार आहेत. त्या निवडक प्रतिभावंत व्यक्तींमध्ये भारतातील डॉ. दत्ता विघावे यांचे नाव समाविष्ट करण्यात आले आहे. ही माहिती रशियन स्पेस एजन्सी जिओस्कॅनने त्यांना आणि विश्वशांतीदूत डॉ. सुधीर तारे यांना ई-मेलद्वारे दिली आहे.

ऑस्ट्रेलियातील प्रसिद्ध युनिव्हर्सिटी ग्रिफिथ युनिव्हर्सिटीतर्फेही डॉ. दत्ता विघावे यांचा अद्भुत आणि अनोखा सन्मान करण्यात आला आहे. सन २०२५ मध्ये, मिशन प्लॅटिपस अंतर्गत, ग्रिफिथ युनिव्हर्सिटी, ऑस्ट्रेलियाद्वारे पृथ्वीपासून ४०० किलोमीटरवर शैक्षणिक उपग्रह क्यूबसॅट अंतराळात सोडला जाईल. त्यामध्येही जगातील निवडक नामवंत गुणवान व्यक्तींची नावे आणि त्यांचा परिचय सोडण्यात येणार आहे. हि माहिती जगभरातील अतिउच्च दर्जाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना माहितीसाठी पुरविली जाणार आहे. त्याचबरोबर जगातील नामांकित व सुपसिद्ध अमेरिकास्थित अवकाश संशोधन संस्था नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन अर्थात नासाचे पुढील आंतरराष्ट्रीय चंद्र रात्री समन्वय समितीचे निरीक्षण (इंटरनॅशनल ऑब्झर्व्ह द मून नाईट) शनिवार, दिनांक ४ ऑक्टोबर २०२५ रोजी आहे. त्यामध्ये सहभागासाठी नासाने डॉ. दत्ता विघावे यांना विशेष निमंत्रण दिले आहे. या बद्दल नासाने खास सहभाग पत्रही डॉ. दत्ता विघावे यांना पाठविले आहे.

मुळत: शिक्षक असलेले डॉ. दत्ता विघावे, क्रिकेट पंच, प्रशिक्षक व समिक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. क्रिडा, पत्रकारीता, पर्यावरण, साहित्य, शिक्षण, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे. या क्षेत्रात वेगवेगळे पाच विश्वविक्रम त्यांच्या नावावर आहेत. सहावा विश्वविक्रम त्यांच्यापासून काही पावलेच दूर आहे. क्रिकेटमधील उत्कृष्ठ कार्यासाठी अमेरिकन विद्यापिठाची मानद डॉक्टरेट पदवी मिळाली असून युनायटेड नेशन्सच्या ग्लोबल टॅलेंट पूलचे सदस्य आहेत. तसेच वर्ल्ड पार्लमेंटचे महाराष्ट्र चॅप्टरचे अध्यक्षपद त्यांच्याकडेच असून त्यांच्याच संकल्पनेतून वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड जगभरातील वंचित घटकांना द्यायला सुरुवात झाली. कोरोना संक्रमण काळात अनेक गरजूंना मदत करताना अनेकांना प्रेरीत करण्यासाठी पुरस्कृत करताना स्वतःही विश्वविक्रमांच्या पुस्तकात झेप घेतली. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झालेल्या डॉ. विघावे यांना महाराष्ट्र सरकारचा मानाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण मिळाला आहे, शिवाय विश्वशांतीदूत( ग्लोबल पीस) अवॉर्ड प्राप्त झाला आहे.



**ओझर : खासदार राजाभाऊ वाजे यांचा सत्कार करताना नारायणराव वाजे. समवेत अरुण वारुंगसे, आयुब शेख, महेश कुटे, सचिन आढाव, खंडेराव शेटे, विजय कदम, भास्करराव तासकर आदी.**

# श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेच्या नावलौकिकाचा फायदा

## खासदार वाजे : सिद्धिविनायक पतसंस्थेचे पेशवे पतसंस्थेत विलीनीकरण

**ओझर : वार्ताहर**

सध्या सहकार क्षेत्राला घरघर लागली असून, उर्जितावस्था आणण्याची जबाबदारी संचालक मंडळ सभासदांची आहे. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे सहकारी पतसंस्थेच्या संचालकांनी ओझरच्या सिद्धिविनायक नागरी सहकारी पतसंस्थेच्या विलीनीकरणाचा निर्णय योग्यवेळी घेतला. दोन्ही संस्थांना व ठेवीदारांना परत ऊर्जितावस्थेत आणण्याचे काम केल्याने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे सहकारी पतसंस्थेच्या नावलौकिकाचा ओझरकर नागरिकांना निश्चित फायदाच होईल, असे प्रतिपादन खासदार राजाभाऊ वाजे यांनी केले.

ओझर येथील सिद्धिविनायक नागरी सहकारी पतसंस्थेचे विलीनीकरण श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे या पतसंस्थेत झाल्यानंतर खासदार वाजे यांनी ओझरच्या शाखेला सदिच्छा भेट दिली, यावेळी ते बोलत होते. दरम्यान, श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेच्या वतीने ठेवीदारांना त्यांच्या ठेवीची रक्कम देण्यास सुरुवात केली. यावेळी खासदार वाजे यांनी दोन्ही संचालक मंडळाचे अभिनंदन केले. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे सहकारी पतसंस्था अध्यक्ष नारायणराव वाजे यांनी खासदार वाजे यांचा सत्कार केला. पतसंस्थेच्या वतीने ठेवीदारांचा मेळावा घेण्यात आला होता. या मेळाव्यात अध्यक्ष नारायणराव वाजे यांनी ठेवीदार मागतील त्याच क्षणी त्यांचे पैसे देण्याची ग्वाही दिली होती. सोमवारी संस्थेने ओझर येथील आपल्या शाखेचा कारभार सुरू केला. पहिल्याच दिवशी खा. वाजे यांच्या हस्ते गरजवंत ठेवीदार यांची ठेव देण्यात आली. यावेळी बहुतांश ठेवीदारांनी ठेवीचे नूतनीकरण केल्याची माहिती व्यवस्थापक महेश कुटे यांनी दिली. याप्रसंगी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे सहकारी पतसंस्था उपाध्यक्ष अरुण वारुंगसे, मुख्य कार्यकारी अधिकारी आयुब शेख, महेश कुटे, सचिन आढाव, खंडेराव शेटे, विजय कदम, भास्करराव तासकर आदी उपस्थित होते.

# विक्रम सोलरला १५० मेगावॅट सोलर मॉड्यूल पुरवठ्याची ऑर्डर

**कोलकाता :**

भारतातील सर्वांत मोठ्या आणि सर्वाधिक विश्वासार्ह सोलर पीव्ही मॉड्यूल उत्पादकांपैकी एक असलेल्या विक्रम सोलर लिमिटेडला महाराष्ट्र सरकारचा उपक्रम असलेल्या महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेडकडून मोठी ऑर्डर मिळाली आहे. महाजेनकोच्या १५० मेगावॅट क्षमतेच्या अक्षय ऊर्जा प्रकल्पासाठी सोलर मॉड्यूल पुरविण्याची महत्त्वपूर्ण ऑर्डर मिळाल्याची घोषणा कंपनीने केली आहे.

या धोरणात्मक ऑर्डरमुळे उच्च-कार्यक्षमता सौर मॉड्यूलची कंपनीच्या प्रकल्प पोर्टफोलिओमध्ये भर पडणार आहे. या ऑर्डरमुळे भारतातील मान्यताप्राप्त मॉडेल्स आणि उत्पादकांच्या यादीत प्रमुख कंपन्यांपैकी एक कंपनी म्हणून कोलकाता येथे मुख्यालय असलेल्या विक्रम सोलरचे स्थान आणखी बळकट झाले आहे.

कंपनी १५० मेगावॅट क्षमतेच्या प्रगत एन-टाइप मॉड्यूलचा पुरवठा करणार आहे. हे मॉड्यूल त्यांच्या उच्च कामगिरी आणि ऊर्जा उत्पादनासाठी ओळखले जाते. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना प्रकल्प २.० अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील जळगाव आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये महाजेनकोच्या प्रकल्पांना हे मॉड्यूल पुरवले जाणार आहेत. तसेच या ऑर्डरअंतर्गत मॉड्यूलचे वितरण आर्थिक वर्ष २५-२६ मध्ये केले जाणार आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे महाराष्ट्राची अक्षय ऊर्जा क्षमता वाढणार आहे. तसेच कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत होणार असून, पर्यावरणीय शाश्वततेतही आणखी भर पडेल, अशी आशा आहे.

विक्रम सोलरचे अध्यक्ष ज्ञानेश चौधरी यांनी सांगितले, आम्हाला ही ऑर्डर मिळाल्याचा खूप अभिमान आहे. उच्च-कार्यक्षमतेच्या सौर पर्यायाव्दारे हरित भारताला सक्षम बनवण्याच्या आमच्या ध्येयात आम्ही आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. विक्रम सोलरवरील हा विश्वास एकप्रकारे गुणवत्ता, नावीन्य आणि शाश्वततेप्रती आम्ही दाखवत असलेल्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. महाराष्ट्राच्या वाढत्या अक्षय ऊर्जेच्या मागणीबाबत आम्ही खूप आशावादी आहोत.

# रत्नजडित दागिन्यांच्या शिपमेंटसाठी शिपरॉकेटची क्रिटिकालॉगसोबत भागीदारी

## ४० शहर आणि गावांतील ५९ कार्यरत हब्जसह २५० शहरांमधून पिकअप सेवा

**मुंबई : प्रतिनिधी**

**२४ एप्रिल २०२५: भारतातील आघाडीचे ई-कॉमर्स सक्षम करणारे प्लॅटफॉर्म शिपरॉकेटने क्रिटिकालॉग या लॉजिस्टिक्स कंपनीसोबत भागीदारी करत प्रीमियम श्रेणीतील शिपिंगमध्ये प्रवेश केला आहे. क्रिटिकालॉग ही कंपनी कस्टमाइज्ड क्रिटिकल लॉजिस्टिक्स उपाय सुविधा देते. त्यामध्ये लक्झरी गुड्स शिपमेंट समाविष्ट आहे. या भागीदारीतून सोनं आणि हिरेजडित दागिन्यांच्या शिपिंगबाबतच्या अत्यंत विशेष श्रेणीत शिपरॉकेटच्या प्रवेशाचे संकेत मिळत आहेत.**

विस्तृत नियोजन आणि अंमलबजावणीसह, क्रिटिकालॉग झिरो पिल्फरेज (चोरी किंवा नुकसान), सुरक्षित पॅकेजिंग, मजबूत खोल्यांमध्ये साठवणूक आणि सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करते. वेळेवर आणि उच्च मूल्य असलेल्या शिपमेंट हाताळण्यातील क्रिटिकालॉगची कौशल्ये आणि शिपरॉकेटचे अत्याधुनिक लॉजिस्टिक्स तंत्रज्ञान एकत्र येऊन दागिन्यांच्या व्यापाऱ्यांसाठी विनाअडथळा शिपिंग अनुभव देणार आहेत.

ही सेवा आधीच ५००० हून अधिक पिनकोड्सवर सुरू असून दिल्ली, मुंबई, चेन्नई यांसारख्या सर्व प्रमुख मेट्रो शहरांमध्ये उपलब्ध आहे. हिरे, सोनं आणि चांदीचे दागिने, तसेच सोनं व चांदीची नाणी आणि इतर उच्च-मूल्य वस्तू विकणारे अनेक व्यापारी ही सेवा आधीपासूनच वापरत आहेत.

छोट्या दागिने व्यापाऱ्यांसाठी लॉजिस्टिक्स सुलभ करणे

भारतातील सोनं आणि हिरे व्यापार GDP च्या ७% हून अधिक योगदान देतो आणि त्यामध्ये ३ लाखांहून अधिक व्यापारी सामील आहेत. B2C क्षेत्रात झालेल्या वाढीमुळे ई-कॉमर्समार्फत ही संख्या कैक पट वाढणार आहे. रत्ने आणि दागिने क्षेत्रातील लघु व मध्यम उद्योग (SMEs) या वाढीच्या अग्रभागी आहेत, परंतु त्यांना लॉजिस्टिक्स व ई-कॉमर्ससाठी सहाय्याची गरज आहे.

मार्च २०२५ मध्ये डहेपिशज्ञ. ले वर शिपरॉकेटने याआधीच अनेक ऑर्डर्स पूर्ण केल्या आहेत. प्रत्येक शिपमेंटचे सरासरी मूल्य ९०,००० रु. आहे. त्यातून उच्च-मूल्य असलेल्या वस्तूंची सुरक्षितपणे वाहतूक करण्याची क्षमता अधोरेखित होते. ही सेवा सध्या ५ लाख रु. पर्यंतच्या प्रीपेड शिपमेंटसाठी आणि ४९,९९९ रु. पर्यंतच्या कॅश ऑन डिलिव्हरी पर्यायासाठी उपलब्ध आहे.

या भागीदारीवर भाष्य करताना, शिपरॉकेटचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी साहिल गोयल म्हणाले, शिपरॉकेटमध्ये आम्ही भारतातील प्रत्येक व्यापाऱ्याला, मग तो लहान शहरातील असो किंवा मेट्रोमधील ई-कॉमर्सद्वारे जलद वाढीसाठी आवश्यक सुविधा निर्माण करत आहोत.

क्रिटिकालॉगसोबतची आमची भागीदारी ही लॉजिस्टिक्समध्ये अचूकता आणि विश्वास हवा असणाऱ्या आणि विशेषकरून दागिने विक्रेत्यांसाठी याच दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. ही भागीदारी छोट्या विक्रेत्यांना मोठ्या ब्रँड्सशी स्पर्धा करण्यास सक्षम बनवते.

शिपरॉकेट हा एक टेक प्लॅटफॉर्म असून विक्रेत्यांना अखंड उच्च-गती वेगाने डिलिव्हरी इंटिग्रेशन, प्रगत चेकआउट सोल्युशन्स आणि अत्याधुनिक मार्केटिंग साधने याद्वारे सक्षम करते. ही भागीदारी व्यापाऱ्यांना त्यांची उच्च-मूल्य ऑर्डर्स देशभरातील ४ लाखांहून अधिक व्यापाऱ्यांद्वारे आधीपासूनच वापरल्या जाणाऱ्या त्याच विश्वासार्ह शिपरॉकेट नेटवर्कद्वारे वाहतूक करण्यास सक्षम करेल.

### २५० शहरांमधून पिकअप सेवा

या भागीदारीमुळे प्रत्येक वस्तू काळजीपूर्वक हाताळली जाईल हे सुनिश्चित करत शिपरॉकेट दागिने व्यापाऱ्यांसाठी शिपिंग सुलभ करणार आहे. उच्च मूल्य उत्पादन हाताळणीमधील क्रिटिकालॉगच्या कौशल्याने प्रत्येक पॅकेज सुरक्षितरीत्या हाताळले जाईल. शिपरॉकेट सध्या दिल्ली, मुंबई, चेन्नई, पुणे आणि चंदीगड या शहरांमधील ४० गावांमध्ये ५९ कार्यरत हब्जसह २५० शहरांमधून पिकअप सेवा देत आहे.

गांवकरी
# तरुण
४
■ शुक्रवार,
दि. २५ एप्रिल २०२५



## प्रेम हे

**प्रेम हा शब्द जरी अडीच अक्षराचा असला तरी त्या शब्दात अनेक भावना गुंतलेल्या असतात. प्रेम ठरवून होत नाही. प्रेमाला कोणतीही ठराविक साचेबध्दता नाही. वय, रंग, रूप, जात, भाषा, प्रांत या सगळ्या सीमारेषा भेदण्याची शक्ती प्रेम या अडीच अक्षराच्या शब्दात असते.**



**काव्या देसाई**

प्रेम हे जगाला विसरायला भाग पाडत नाहीत तर स्वतःलाही विसरायला भाग पाडणारे प्रेम. पण काळ बदलला तसे प्रेमाचे स्वरूपही बदलत चालले आहे. पूर्वी एक दुजे के लिए असणारे प्रेम आता एक फुल दो माली असे झाले आहे. तारुण्याची चाहूल आणि त्यातून निर्माण होणारे आकर्षण, ओढ सगळंच मनाला हवंहवंसं वाटणार.

कवी मंगेश पाडगावकरांच्या कवितेत प्रेम म्हणजे प्रेम असतं आणि तुमचं आणि आमचं सेम असते, असे लिहिले. पण सध्याच्या काळात प्रत्येकाच्या प्रेमाचं स्वरूप बदलत चालले आहे. पहिल्यांदा प्रेमात पडणे आणि आयुष्यभर सोबत राहण्याच्या आणाभाका घेणे हे जणू आता दुर्मिळ झाले आहे. तू ही रे माझा मितवा म्हणत असताना ....तुही रे माझा कितवा असे म्हणण्याची स्थिती सध्या तरुणाईची आहे. आजच्या युगात सगळ्याच गोष्टी इन्स्टंट झाल्याने जणू प्रेम ही इन्स्टंट झाले आहे. इन्स्टंट प्रेमाचं आयुष्यही अल्प आहे. पहिलंवहिलं प्रेम किंवा प्रेमातील गांभीर्य कमी होत आहे. प्रेमाची व्याख्या बदलत भावनिकतेकडून प्रेम व्यावहारिकतेकडे जात आहे. त्यामुळे खरे प्रेम एकदाच होऊ शकते असे सांगणारे प्रेमवीर आता दिसत नाही. ऐसा पहिली बार हुआ असे म्हणणारी तरुणाई आता ऐसा दुसरी, तिसरी बार हुआ है असं म्हणताना दिसत आहेत. प्रेमात त्याग भावना संपून स्वार्थ भावनेला वाव दिला जात असल्याचे चित्र आहे.

प्रेमाविषयी असलेलं कुतूहल, मालिका, चित्रपट, कथा, कादंबऱ्यांतून पाहिलेलं, वाचलेलं प्रेमाचं स्वरूप आणि स्वतःचं असं प्रेमाविषयीचं कल्पनाविश्व आणि आजूबाजूला असणारे प्रेमाविषयीचे चित्र या सगळ्याची सरमिसळ होऊन प्रेमाचे स्वरूप बदलत आहे. प्रेम हे पवित्र बंधन आहे, असे मानणारी जुनी पिढी ते प्रेमाला फॅशन समजणारी नवी पिढी असे स्थित्यंतर प्रेमात घडवून आले आहे. प्रेम ठरवून होत नाही हे जरी खरे असले तरी प्रेमात अनेक वेळा भावनिक गुंतवणुकीबरोबरच शारीरिक गुंतवणूकही होत असते. कदाचित यातून अनेक समस्या निर्माण होऊन अनेक आयुष्य उद्ध्वस्त होत आहेत. सहज, सुंदर, प्रेमाच्या निर्मळ भावनेवर बदलत्या प्रेमाच्या व्याख्येमुळे मळभ येत आहे. कदाचित आजच्या प्रेमाचे स्वरूप पाहून

प्रेम म्हणजे काय असतं. जे फक्त शेवटपर्यंत तिच्यात आणि आपल्यात असतं, त्याच्यात आणि आपल्यात असतं. या कुसुमाग्रजांच्या कवितेतील ओळीतील अर्थ जणू आजच्या पिढीला अजून उमजला नाही. असेच सध्याच्या लव्ह बर्ड्सकडे पाहून वाटते.

## नोकरी

### इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी पुणे


पदाचे नाव : प्रोजेक्ट सायंटिस्ट-ई, प्रोजेक्ट सायंटिस्ट-III, प्रोजेक्ट सायंटिस्ट-II, प्रोजेक्ट सायंटिस्ट-I, वैज्ञानिक सहाय्यक.
एकूण रिक्त पदे : १७८ पदे.
नोकरी ठिकाण : पुणे.
वेतन/ मानधन : दरमहा रु. २९,२००/- ते रु. १,२३,१००/- पर्यंत.
अर्ज करण्याची पद्धत : ऑनलाइन.
अर्ज प्रक्रिया सुरू होण्याची तारीख : २२ एप्रिल २०२५.
अर्ज करण्याची शेवटची तारीख : १५ मे २०२५.
वेबसाइट : https://www.tropmet.res.in/

### राष्ट्रीय आरोग्य अभियान भंडारा भरती २०२५.

पदाचे नाव : ऑडिओलॉजिस्ट (NPPCD), डेंटल टेक्निशियन DEIC, पॅरा मेडिकल वर्कर (NLEP), वैद्यकीय अधिकारी (MBBS), जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (आयुष), MPW-पुरुष, स्टाफ नर्स, कीटकशास्त्रज्ञ (BOPHU), सार्वजनिक आरोग्य विशेषज्ञ (BPHU), प्रयोगशाळा तंत्रज्ञ (BPHU), फिजिशियन, प्रसूती आणि रोग विशेषज्ञ, रोग विशेषज्ञ त्वचारोगतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, ईएनटी विशेषज्ञ.
एकूण रिक्त पदे : ३२ पदे.
नोकरी ठिकाण : भंडारा.नोकरी
शैक्षणिक पात्रता : १२वी उत्तीर्ण, पदवी, पदव्युत्तर पदविका, डिप्लोमा, एम. एससी., जीएनएम/बीएससी, एमएस/डीओआरएल/डीएनबी/डीपीएम/एमडी/डीव्हीडी/डीसीएच/डीजीओ, एमपीएच/एमएचए/एमबीए आरोग्य, ऑडिओलॉजीमधील पदवी, एमबीबीएस.
वेतन/ मानधन : दरमहा रु. १७,०००/- ते रु. ६०,०००/- पर्यंत.
अर्ज करण्याची पद्धत : ऑफलाइन.
अर्ज प्रक्रिया सुरू होण्याची तारीख : २३ एप्रिल २०२५.
अर्ज करण्याची शेवटची तारीख : ९ मे २०२५.
अर्ज सादर करण्याचा पत्ता : जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद परिसर, भंडारा.
निवड प्रक्रिया : मुलाखत.
मुलाखतीची तारीख : ३० एप्रिल २०२५.
मुलाखतीची पत्ता : राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, भंडारा.

## MPSC नवीन वर्णनात्मक पॅटर्न

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २०२५ पासून राज्यसेवा या परीक्षेसाठी नवीन लेखी स्वरूपातील वर्णनात्मक पॅटर्न लागू केला आहे. त्याविषयी अधिक माहिती घेऊया.**



**डॉ. बापूराव हिरे**
**करिअर मार्गदर्शक**

सदर परीक्षा तीन टप्प्यात होते.

१) पूर्व परीक्षा - ४०० गुण (वस्तुनिष्ठ बहुपयोगी)

२) मुख्य परीक्षा - १७५० गुण ( भाषा ६०० गुण पात्रता) (लेखी परिक्षा)

३) मुलाखत - २७५ गुण

१) पूर्व परीक्षा - ४०० गुण या टप्प्यात दोन

पेपर घेतले जातात (२०० गुण प्रत्येक पेपर)

सामान्य अध्ययन-पेपर-१-१०० प्रश्न व २०० गुणांसाठी. या पेपरमध्ये इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, विज्ञान, चालू घडामोडी, पर्यावरण या विषयांचा समावेश असतो.

पेपर-२ हा CS-T अर्थात सिव्हिल सर्व्हिसेस ॲप्टिट्यूड टेस्ट असतो. यामध्ये ८० प्रश्न व २०० गुण असतात (प्रत्येक प्रश्न २.५ गुण), ८० प्रश्नांमध्ये साधारणतः २५ प्रश्न गणित व बुद्धिमत्ता या विषयावर ५० प्रश्न उतारे (पॅसेज) वर असतात, तर ५ प्रश्न निर्णय प्रक्रिया (डी.एम.) यावर असतात.

सामान्य अध्ययन पेपर व नागरी

सेवा कल चाचणी दोन्ही पेपरसाठी २ तास

प्रत्येकी कालावधी असतो व चार चुकीच्या

उत्तरामागे एक गुण वजा केला जातो.

(१/४ नकारात्मक पद्धत)

मुख्य परीक्षा- लेखी स्वरूपात

१) सामान्य अध्ययन-एक-२५० गुण, ३ तास कालावधी- इतिहास, भूगोल, सांस्कृतिक इतिहास इत्यादी.

२) सामान्य अध्ययन-दोन - २५० गुण, ३ तास कालावधी - राज्यशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध इत्यादी.

३) सामान्य अध्ययन-तीन- २५० गुण, ३ तास कालावधी, अर्थशास्त्र, तंत्रज्ञानावर भर- सामान्य अध्ययन-चार - २५० गुण, ३ तास कालावधी - नैतिकता, सचोटी इत्यादी.

७) निबंध - २५० गुण, ३ तास कालावधी- भाषा-एक-मराठी- ३०० गुण, ३ तास, २५ टक्के घेऊन पात्र, म्हणजे ३०० पैकी ७५ गुण मिळाले की बाकीचे पेपर तपासले जातील. मराठी व इंग्रजी भाषा फक्त २५ टक्के पात्र होण्यासाठी असतील, अंतिम गुण पकडले जाणार नाही.

७ ) भाषा-दोन-इंग्रजी- ३०० गुण, ३ तास- २५ टक्के गुण घेऊन पात्र.

८) वैकल्पिक विषय - ५०० गुण.

यामध्ये आपल्या आवडीचा विषय घेऊन चांगला अभ्यास करावा लागतो.

वैकल्पिकचे दोन पेपर होतात - प्रत्येक पेपर २५० गुणांचा असतो, असा पूर्ण एक वैकल्पिक विषय - ५०० गुणांसासाठी असतो.

मुलाखत - व्यक्तिमत्त्व चाचणी अंतिम टप्पा असतो - २७५ गुणांसाठी यामध्ये मुलाखत घेतली जाते.

मुख्यचे १७५० गुण (मराठी + इंग्रजी वगळता) व मुलाखतचे २७५ गुण असे २०२५ गुण मिळून अंतिम गुणवत्ता यादी जाहीर केली जाते.



### स्टायलिश ब्रेसलेट्स आणि बांगड्या

फंकी लूकसाठी विविध प्रकारचे ब्रेसलेट्स आणि बांगड्या खास असतात. बीडेड ब्रेसलेट्स, मेटल कफ ब्रेसलेट्स, लेदर ब्रेसलेट्स आणि स्टेटमेंट बांगड्या सध्या ट्रेंडमध्ये आहेत. हँडमेड किंवा एथनिक टच असलेली बांगडीसुद्धा कॉलेज लूकला हटके लूक देते.

### स्टेटमेंट रिंग्स

मोठ्या आणि डिझायनर अंगठ्या आजच्या कॉलेज तरुणींच्या फॅशनमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. विविध आकारांचे आणि रंगांचे स्टोन सेट असलेल्या रिंग्स, ऑक्सिडाइज्ड किंवा ॲनिमल थीम असलेल्या मोठ्या रिंग्स या सध्या फॅशनमध्ये आहेत.

### बिंधास्त ॲनकेल्ट्स आणि टो रिंग्स

पायाच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या ॲनकेल्ट्स आणि टो रिंग्स कॉलेज तरुणींमध्ये विशेष प्रिय आहेत. मोत्यांचे, ऑक्सिडाइज्ड किंवा चेन पॅटर्नमधील ॲनकेल्ट्स फंकी लूकसाठी परिपूर्ण आहेत.




## कल है

**स्ट्रेस कमी करा... भाग ३८**

**विलास पंचभाई**
**७७७४९५५८९२**

जल म्हणजे जीवन जगणे आणि जगणे म्हणजे आयुष्य. भूतलावर जे जे सजीव आहेत त्या सर्वांना पाण्याची गरज असते.. सर्वांसाठी पाणी म्हणजे जीवन आहे जे जे भूतलावर सजीव राहतात, त्या सर्वांसाठी जल है तो कल है म्हणजे पाणी असेल तर आपण उद्याच जीवन जगू शकतो, अशी भावना असते.त्यामध्ये मनुष्यप्राणी असो, निसर्ग असो, पशुपक्षी असो की अजून जलचर, सर्वांनाच पाणी आवश्यक असते..

शेतीसाठी पाणी लागते. उद्योगधंद्यासाठी पाणी लागते. घरातली धुणेभांडे, कपडे लत्ते जे जे काही स्वच्छ करायचं ठरवले त्यासाठी पाणी लागते... एक दिवस जरी का नळाला पाणी आले नाही किंवा पावसाळ्यात पाऊस लांबला तर स्ट्रेस वाढत जातो. संकटं वाढत जातात. चिडचिड होते. शिव्याशाप दिल्या जातात. काय मेल्याने आज पाणी सोडलं नाही, काय तो देव पावसाचे दिवस पण अजून पाण्याचा थेंब नाही. कोरडाठाक गेला महिना असे म्हणून आपण आपला राग व्यक्त करत असतो. आजही खेड्यापाड्यांमध्ये लांब लांब पायपीट करून पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. अनेक आदिवासी जिल्हे असे आहेत की, त्या ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. प्यायला पाणी नाही. विहिरींची पाण्याची पातळी अगदी खोल गेली आहे. अगदी पाणी काढतानाही तळ लागतो. एक हंडा मिळणे म्हणजे आयुष्याचं सोनं झाल्यासारखं फील येतो... ५/२५ लिटरमध्ये दिवस काढावा लागतो... काही ठिकाणी दोन दोन दिवस आठ दिवस पाणी येत नाही. धुळे-मनमाडसारखे शहर मराठवाड्यातील काही शहर आजही पाण्याविना वंचित आहेत. अनेक ठिकाणी पाणी अडवून पाण्याचे बंधारे बांधले आहेत. पण तरी वाढत्या तापमानामुळे जलसाठेही उष्णतेमुळे कोरडे होत आहेत. सूर्याच्या तापमानाचा परिणाम पृथ्वीवरच्या वातावरणावर होत आहे... पाणी जपून वापरणे एवढेच आपल्या हातात आहे. अजूनही काही ठिकाणी पाण्याची सुबत्ता आहे. त्या लोकांना पाण्याचे गांभीर्य नाही. घरासमोरील अंगणामध्ये पाण्याचे सडे, धुणीभांडी करण्यासाठी सतत चालू ठेवलेले नळ, गाडी वाहन पोर्च धुण्यासाठी नाहक वाया घालवलेले पाणी... थेंब थेंब पाण्याचा जरी वाचवला तरी लाखो लिटर पाणी बचत करू शकतो व तेच पाणी आपण झाडाझुडपांना, जनावरांना पिण्यासाठी व झाडे जगवण्यासाठी त्याचा वापर होऊ शकतो... टॉयलेट, बाथरूमच्या ठिकाणी प्रमाणात पाणी टाकून त्याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. ज्या ज्या ठिकाणी आपल्याला पाणी वाचवता येईल, त्या त्या ठिकाणी पाणी वाचवणे गरजेचे आहे. झाडं लावून झाडांची देखभाल करून त्यांची वाढ करून पाऊस पडण्यासाठी महत्त्वाचा भाग आहे....

कालच मी एका ठिकाणी वाचलं की -
गाडी लावण्यासाठी झाड हवं
मग एक तरी झाड लाव...!
आज सावलीसाठी झाडं शोधून सापडत नाही..
पूर्वी झाडाखाली माणसांची चावडी असायची..
याच चावडीवर अनेक गप्पागोष्टी, विचारांची देवाणघेवाण,
सुखदुःखाच्या गप्पा व्हायच्या...
पण आता माणसांना वेळ नाही..
पाणी आजच आपल्याला विकत घ्यावे लागते.

उद्याच्या पिढीला पाण्यासाठी सोन्याचा भाव मोजावा लागेल. ज्याच्याकडे पाणी त्याची सत्ता, तेच हुकूमत गाजवेल.. तेव्हा उद्याच्या पिढीला जर या संकटातून सावरायचं असेल तर आजच त्यांनी पाणी बचतीचे धडे द्यायला हवे. पाण्याचे महत्त्व विशद करायला हवे.....शाळेमध्ये देखील पाठ्यपुस्तकात पाणी वाचवा, पाणी अडवा याची महती सांगावी लागेल... पाणी हा नैसर्गिक खजाना आहे...गरज आहे ती नियोजनाची... आपल्या समाजाला पाण्यासाठी स्ट्रेस वाढवायचा नसेल. भविष्यात पाण्यासाठी डोळ्यात पाणी आणायचे नसेल तर आजच जल है तो कल है या मंत्राचा जप व कृती करावी लागेल...



## लोककला जिवंत ठेवण्यासाठी झटणारी महिला शाहीर



**मुलाखत**
**अशोक चांदुडे**

अन्यायाविरोधात जो क्रांतिकारी लढतो, त्या योद्ध्याचे जो आपल्या पोवाड्याच्या माध्यमातून गुणगान गातो त्यास शाहीर म्हटले जाते. ही शाहिरी परंपरा बाराव्या शतकातही ज्ञानेश्वरीमध्ये आम्ही गाऊ कीर्तीचे पोवाडे असल्याचे दिसते. चक्रधरस्वामींच्या काळातही शाहिरीचा उल्लेख आला आहे. आज लोककला ही रीलसच्या जमान्यात लोप पावत चालली आहे. मात्र, काही लोककलावंत आपली ही कला टिकवून ठेवण्यासाठी आजही धडपडत आहेत. त्यातीलच एक म्हणजे महिला शाहिर अनिता ऐवळे-खरात या होय.

सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील चिंचणी या गावात अनिता खरात यांचा जन्म झाला. घरची परिस्थिती अत्यंत बेताची. वडील विष्णू खरात हे तमाशात काम करायचे. वडिलांची इच्छा होती की, अनिता यांनी पण त्यांच्यासोबत तमाशात काम करावे. पण अनिता यांना तमाशात काम करण्याची इच्छा नव्हती. किल्लारी भूकंप झाला त्यावेळी भूकंप निधी संकलनावेळी शाहीर बापूराव विभूते भेटले. त्यांचे गुरू चिंचणीचे क्रांतीशाहीर र. द. दीक्षित त्यांच्या संघात वडील सहभागी झाले होते. भूकंप निधी गोळा करण्यासाठी विविध ठिकाणी कार्यक्रम घ्यावे लागत. त्यावेळी मी इयत्ता सहावीत शिकत होते. बुधगावला अंबुदेवी विभूते यांची प्रेरणा होती. सुरुवातीला अशोक विभूते येत असत शिकवायला. बुधगावला बोलवत असे, मात्र त्यावेळी तेथे जाणे शक्यच नव्हते. मग गावातीलच रघुनाथ दीक्षित यांच्याकडे दहा वर्षे शिकल्याचे त्या सांगतात. त्या रघुनाथ दीक्षित यांच्या एकमेव महिला शिष्य होत्या. घरात सोळा जणांचे कुटुंब. वडील, तीन आया व आम्ही पाच भावंडे असा आमचा परिवार. मी कसेबसे बारावीपर्यंत शिकले. मात्र, पुढे शिक्षण घेता आले नाही. २००६ साली माझे लग्न झाले. आष्ट्यामध्ये गुरुजींचे एक शिष्य होते तानाजी खुडे व त्यांचे मित्र संजय ऐवळे. ते हर्मोनिअम वाजवत असे. एका गाण्याच्या कॅसेटसाठी ते गुरुजींकडे आले होते. त्यावेळी आमची ओळख झाली. आमची रिहर्सल रूममध्येच भेट होत असे. त्यानंतर आम्ही लग्न केले. आम्हाला एक मुलगी आहे. ती अकरावीत शिकत आहे. तिलाही कलाक्षेत्रात फार रस आहे.

राज्यस्तरीय आत्माराम पाटील शाहिरी मंचतर्फे तिला उत्कृष्ट बालशाहीर पुरस्कार मिळाला आहे. कलेसाठी अनेक जणांनी आयुष्य वेचले आहे. प्रत्येकाकडून काहीतरी शिकले पाहिजे. माणूस हा आयुष्यभर विद्यार्थीच असतो. २०२१ साली कोल्हापूरला लोककला महोत्सव भरला होता. त्यात भारतातून केवळ १५० कलावंतांची निवड झाली होती. त्यामध्ये आमचाही सहभाग होता. लोककला महोत्सवाला मानवंदना देण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी ढोलकीवाला आला नव्हता. तेव्हा रात्री दोन वाजता माझे पती दुचाकीने एका गावी गेले व तेथून दुसरा ढोलकीवाला आणत असताना त्यांच्या डोळ्यात कायतरी गेले. ती रात्र कशीतरी काढली, सकाळी दुसऱ्या एका दवाखान्यात गेलो असता त्याने केवळ एक ड्रॉप दिला. तिसऱ्या दिवशी आम्ही कार्यक्रम आटोपून घरी गेलो. त्यावेळी एका डोळ्यांच्या स्पेशालिस्टकडे गेलो असता तीन दिवस बुबुळ फाटत गेल्याचे त्यांनी सांगितले. या आजाराच्या पायी ८० हजार रूपये खर्च केले. दोनदा बुबुळ बदलले, मात्र काहीच फायदा झाला नाही. २०२२ साली लोककला महोत्सव भरला होता. त्यातही त्यांनी सहभाग घेतला होता. त्यानंतर माझ्या पायाला लागले असता पतीदेवांनी माझी फार काळजी घेतली होती. २०२४ साली आजारपणाने माझ्या पतीचे निधन झाले. काळाने आमच्या कुटुंबावर मोठा घाला घातला. या धक्क्याने मी मानसिकरीत्या खचून गेले होते. या दरम्यानच्या काळात अंगावर चार लाखांचे कर्ज झाले होते. इतरवेळी पुढे असणारे राजकारणी मात्र यावेळी सगळ्यात मागे राहिले. पण यावेळी महाराष्ट्रातील शाहीर मदतीला धावून आले. त्यामध्ये शाहिर देवानंद माळी, शाहीर काशीनाथ दीक्षित, सुनील नलावडे, सांगलीचे सांबेगुरू, देवानंद माळी, अनंतकुमार साळुंखे, कोल्हापूरचे रंगराव पाटील, नाशिकचे उत्तम गायकर, सांगलीचे बजरंग आंबी, कोल्हापूरचे शाहीर सुभाष गोरे, पुण्याचे बाळासाहेब मालुसकर आदी शाहीर मंडळींनी मोठी मदत केली. आजही आम्ही भाड्याच्या घरात राहतो.

राज्यात आजही अनेक लोककलावंत शासकीय मदतीपासून वंचित आहे. अनेक कलावंतांची लोकसेवा करताना हयात निघून गेली. जेव्हा खरी मदतीची खरी गरज असते त्यावेळी कोणीही पाठीशी उभे राहत नाही. वारंवार सरकारी कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागतात, अशी खंत शाहीर अनिता ऐवळे-खरात यांनी बोलून दाखविली.

### मिळालेले पुरस्कार

- दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर (भारत सरकार) यांचा यंग टॅलेंटेड फोक आर्टिस्ट पुरस्कार
- माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यामार्फत शिवशाहीर पुरस्कार मुंबई (कुर्ला)
- लोकशाहीर वामनदादा कर्डक पुरस्कार, वैजापूर (छ. संभाजीनगर)
- शाहीर महर्षी आत्माराम पाटील मंचाचा राष्ट्रीय शाहीर पुरस्कार (छ. संभाजीनगर)
- श्री संत गाडगेबाबा ट्रस्ट (पंढरपूर) यांचा लोकशाहीर पुरस्कार
- सिनेअभिनेते विजय कडणे यांच्यामार्फत समाजसेवा गौरव पुरस्कार
- बाळासाहेब गलगले फाउंडेशनतर्फे बाळासाहेब गलगले पुरस्कार
- भा.ज.पा. सांस्कृतिक प्रकोष्ठ यांचा नवदुर्गा पुरस्कार
- शिवलीला फाउंडेशन(सांगली) तर्फे कलेचे शिलेदार पुरस्कार
  पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र भारत सरकार (राजस्थान) येथे शाहिरी सादर करण्याचा सन्मान
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार २०२५